महाराष्ट्र शासन

# कलाशिक्षक पदविका
## पुनर्रचित अभ्यासक्रम
## (ART TEACHERS DIPLOMA, REVISED SYLLABUS )

### प्रथम व द्वितीय वर्ष

**कलासंचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
डॉ. दादाभाई नौरोजी मार्ग, मुंबई - ४०० ००१



एन २२३--१

**कलाशिक्षक पदविका पुनर्रचित अभ्यासक्रम** (प्रथम व द्वितीय वर्ष)
**Art Teachers Diploma Revised Syllabus** (First & Second Year)

(To be introduced in Art Teachers Diploma First & Second Year Art Teachers Education Course from the academic year 2021-2022 and 2022-2023 respectively.)


- **निर्मिती व प्रकाशक :**
  कलासंचालनालय, महाराष्ट्र राज्य,
  डॉ. दादाभाई नौरोजी मार्ग, मुंबई -४०० ००१

- **संपादक :**
  **श्री राजीव मिश्रा**
  प्र. कलासंचालक,
  कलासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई -४०० ००१

- **कार्यकारी संपादक :**
  **श्री विनोद रं. दांडगे**
  प्र. उपकलासंचालक, (प्रशासन ),
  कलासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई -४०० ००१

- **निमंत्रक :**
  **श्री भास्कर ना. तिखे**
  प्र. निरीक्षक, चित्रकला व शिल्प,
  महाराष्ट्र राज्य, मुंबई -४०० ००१

- **समन्वयक :**
  **श्री संदीप म. डोंगरे**
  सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प,
  विभागीय कार्यालय, नागपूर

  **श्रीमती आरती ध. श्रावस्ती**
  सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प,
  विभागीय कार्यालय, मुंबई -४०० ००१

  **श्री. अनिल द. सोनवणे**
  सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प,
  विभागीय कार्यालय, औरंगाबाद

  **श्री. नागेश म. वाघमोडे**
  परीक्षा नियंत्रक,
  कलासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई -४०० ००१

- **प्रथमावृत्ती :** डिसेंबर २०१९
- **प्रती :** १०००
- **मुद्रक :** शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई


- सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

# मनोगत

कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई दृश्यकला व ललित कलेतील पदविका, पदवी व पदव्युत्तर स्तरावरील कलाशिक्षण व प्रशिक्षण देणारी कलासंस्था व कलामहाविद्यालयांचे व्यवस्थापन सांभाळणारी एक प्रशासकीय संस्था आहे. सध्या सन १९९९ पासून पुनर्रचित केलेला कलाशिक्षक पदविका (Art Teachers Diploma ) हा दोन वर्षाचा अभ्यासक्रम विविध कला महाविद्यालयात राबविण्यात येत आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, अध्यापक शिक्षणाविषयीचे राष्ट्रीय धोरण व बदलत्या परिस्थितीनुरूप या अभ्यासक्रमाचे विकसन करण्याविषयी कलावंत, विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ, व्याख्याते, अधिव्याख्याते, शिक्षक इत्यादिंचा आग्रह सुरू होता. त्यानुसार सन २०१६ पासून या अभ्यासक्रमाचे विकसन व पुनर्रचना करण्यासाठी कलासंचालनालयाच्या अधिपत्याखाली सर्व स्तरावरील तज्ज्ञ सदस्यांची समिती स्थापन केली. या समितीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, राष्ट्रीय व राज्य अभ्यासक्रम आराखडा, सर्व स्तरावरील शिक्षक प्रशिक्षणांच्या अभ्यासक्रमांची तातडीने पुनर्रचना करावी अशी मार्गदर्शक सूचना ज्यामध्ये अधोरेखित केली आहे असा अध्यापक शिक्षणाचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, शासनाचे विविध निर्णय, धोरण व मार्गदर्शक तत्त्वानुसार प्रस्तुत अभ्यासक्रम तयार केला आहे.

शालेय शिक्षणातील विविध आव्हाने व गरजा लक्षात घेऊन अभ्यासक्रमात भाषा अध्यापनशास्त्र, माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) या विषयांचा नव्याने समावेश केला आहे. अध्यापनातील नवनवीन तंत्रे, आधुनिक तंत्रज्ञान, ज्ञानरचनावाद, नवनिर्मितीसाठी शैक्षणिक साधने हाताळण्याचे कौशल्य व मूल्यमापन पध्दती याविषयी अधिक माहिती या अभ्यासक्रमातून मिळणार आहे.

शालेय शिक्षणातील कलाशिक्षण व कार्यानुभव या विषयांशी सहसंबंध या अभ्यासक्रमातून जोडला आहे. कार्यानुभव अंतर्गत व्यावसायिक संधींना व आवश्यक अशा मूलभूत कौशल्यांना प्राधान्य देणारे विषय प्रस्तुत अभ्यासक्रमात समाविष्ट केलेले आहेत. दोन वर्षांच्या कालावधीत या अभ्यासक्रमातील सैध्दांतिक विषयांबरोबरच प्रात्यक्षिक कार्य, वर्गकाम, स्वाध्याय, प्रकल्प, सूक्ष्मपाठ, सरावपाठ, मौखिक परीक्षा, सहशालेय कार्यक्रमांतून प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाचे अध्यापकीय व्यक्तिमत्त्व अधिक समृध्द होणार आहे. प्रचलित व नव्याने समाविष्ट केलेल्या विषयांमधून शास्त्रशुध्द अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे. प्राधान्याने कलाशिक्षक म्हणून व्यक्तिमत्त्व घडवण्याबरोबरच कलाक्षेत्रातील व्यावसायिक संधी प्राप्त करण्याची व कला विषयातील उच्च शिक्षणातील संधींना आवश्यक अशा मूलभूत कौशल्यांना विकसित करण्याच्या दृष्टीने हा अभ्यासक्रम पूरक ठरेल.

या अभ्यासक्रमाबरोबर परिशिष्टे, सूक्ष्मपाठ टाचण नमुना, सराव पाठ व निरीक्षण पत्रक नमुना, स्वाध्याय नोंद पत्रक, गुणदान योजना, गुणपत्रक नमुना इत्यादी सहपत्रके दिलेली आहेत. त्यामुळे सर्व कलामहाविद्यालयात अभ्यासक्रम राबवताना एकसूत्रीपणा निर्माण होईल.

तज्ज्ञांनी तयार केलेल्या अभ्यासक्रमाचे कलाक्षेत्रातील ४६ नामवंत व्यक्तींनी समीक्षण केले आहे. तसेच वेबसाईटवर अभ्यासक्रम अपलोड करून कलाशिक्षक, कलाप्रेमी, चित्रकार व इतर जनसामान्यांना वाचन व अवलोकनार्थ उपलब्ध करून दिला. त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचनांचा साधक-बाधक विचार करून अभ्यासक्रमाला अंतिम स्वरूप दिले. संबंधित कला महाविद्यालयातील व्याख्याते, अधिव्याख्याते यांना उद्बोधन वर्गातून या अभ्यासक्रमाची सखोल माहिती दिली जाईल. प्रस्तुत अभ्यासक्रमाची त्वरित अंमलबजावणी करण्याचा मानस होता, परंतु कोविड-१९ आजाराचा वाढता प्रादुर्भाव आणि लॉकडाऊनमुळे सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षापासून कलाशिक्षक पदविका प्रथम वर्ष आणि २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षापासून द्वितीय वर्ष अभ्यासक्रम लागू केला जाणार आहे.

प्रस्तुत अभ्यासक्रम पुनर्रचित करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या समिती सदस्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक व अभ्यासूवृत्तीने वारंवार संबंधितांशी चर्चा करून या अभ्यासक्रमाची मांडणी केली आहे. तसेच या कामात समीक्षक, कलाप्रेमी अध्यापक, प्राध्यापक आणि ज्या अधिकारी, कर्मचारी वर्ग व इतरांनी सहकार्य केलेले आहे त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करण्यात मला आनंद वाटतो. या अभ्यासक्रमातून कलात्मक अभिरूची व पूरक गुणांची जोपासना करणारा आणि अध्ययनशील, सर्जनशील, कार्यकुशल, बालस्नेही, तंत्रस्नेही कलाशिक्षक तयार होईल असा आशावाद आहे. सर्व स्तरातून या अभ्यासक्रमाचे स्वागत होईल अशी अपेक्षा व्यक्त करून मनोगतास पूर्णविराम देतो.

**राजीव मिश्रा**
प्र. कलासंचालक
कलासंचालनालय, महाराष्ट्र राज्य
डॉ. दादाभाई नौरोजी मार्ग, मुंबई.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ०६ - ०८ |
| २ | अभ्यासक्रमाची ठळक वैशिष्ट्ये | ०९ |
| ३ | अभ्यासक्रमाचा दृष्टिकोन | १० |
| ४ | अभ्यासक्रमाची उद्‌दिष्टे | १० |
| ५ | प्रवेशासाठी विहित अर्हता | ११ |
| ६ | अभ्यासक्रम आराखडा - प्रथम वर्ष | १२ |
| ७ | विषय योजना - प्रथम वर्ष | १२ |
| ८ | अभ्यासक्रम आराखडा - व्दितीय वर्ष | १३ |
| ९ | विषय योजना - व्दितीय वर्ष | १३ |
| १० | विषयनिहाय तासिका / गुण विभागणी व परीक्षा पध्दती - प्रथम वर्ष | १४ |
| ११ | विषयनिहाय तासिका / गुण विभागणी व परीक्षा पध्दती - व्दितीय वर्ष | १५ |
| १२ | अभ्यासक्रमातील महत्त्वाचे बदल | १६ - १७ |
| १३ | अभ्यासक्रम / पाठ्यक्रम - प्रथम वर्ष | १८ - ५६ |
| १४ | अभ्यासक्रम / पाठ्यक्रम - व्दितीय वर्ष | ५७ - १०४ |
| १५ | **परिशिष्टे ...** | - |
| | १. माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान - पार्श्वभूमी | १०५ - १०६ |
| | २. भाषा अध्यापनशास्त्र - पार्श्वभूमी | १०७ |
| | ३. NCF / SCF मधील कलाशिक्षणातील अपेक्षा | १०८ |
| | ४. राज्य अभ्यासक्रम आराखडा - धोरणात्मक शिफारसी | १०९ |
| | ५. गाभाघटक / जीवन-कौशल्ये / सामाजिक व राष्ट्रीय मूल्ये | ११० - ११२ |
| १६ | **सहपत्रे ...** | - |
| | १. स्वाध्याय नोंदपत्रक नमुना - प्रथम वर्ष | ११३ - ११४ |
| | २. स्वाध्याय नोंदपत्रक नमुना - व्दितीय वर्ष | ११५ - ११६ |
| | ३. सूक्ष्मपाठ टाचण नमुना | ११७ - ११८ |
| | ४. सरावपाठ टाचण नमुना | ११९ - १२२ |
| | ५. सरावपाठ निरीक्षण पत्रक नमुना | १२३ - १२४ |
| १७ | उच्च कला परीक्षा विषयनिहाय गुणदान योजना (प्रथम वर्ष) | १२५ |
| १८ | उच्च कला परीक्षा विषयनिहाय गुणदान योजना (व्दितीय वर्ष) | १२६ |
| ● | संक्षिप्त शब्द सूची | १२७ |
| ● | श्रेयनामावली | |

# प्रस्तावना

कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रमाची यापूर्वी सन १९९९ ला रचना करताना तत्कालीन शैक्षणिक गरजा, आणि शिक्षणात मान्य झालेल्या काही महत्त्वपूर्ण बाबी लक्षात घेऊन अभ्यासक्रमाची फेररचना करण्यात आली. काळानुरूप बदलत जाणाऱ्या शिक्षण व समाजातील गरजा, आशा-आकांक्षा, वैज्ञानिक प्रगती, सामाजिक व सांस्कृतिक घडामोडी, शिक्षणक्षेत्रातील प्रगती, राष्ट्रीय व राज्यातील धोरणे इत्यादी सर्वच घटक गतिमान असल्याने अनेकवेळा परिस्थितीनुरूप अभ्यासक्रमाची निर्मिती किंवा पुनर्रचना करणे गरजेचे ठरते. अशा गरजेतूनच **कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रमाचे** (Art Teacher's Diploma) विकसन करून पुनर्रचना करण्यात येत आहे. प्रस्तुत पदविका अभ्यासक्रमाची पुनर्रचना करताना-

१) राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा-२००५ (NCF-2005)
२) राज्य अभ्यासक्रम आराखडा-२०१० (SCF-2010)
३) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ (RTE Act-2009)
४) अध्यापक शिक्षणाचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा- २००९ (NCFTE-2009)
५) प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ (Primary Edn. Syllabus-2012)
६) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन संबंधी शासननिर्णय (CCE)
७) जीवन कौशल्यांवर आधारित शिक्षक मार्गदर्शिका (Life Skills)

इत्यादीं पूरक दस्तावेजांचा परामर्श घेऊन त्यांतील मार्गदर्शक सूचनांचा अभ्यासक्रम विकसन करताना विचार करण्यात आला आहे.

विविध राष्ट्रीय/राज्य व शैक्षणिक धोरणे, गाभाघटक जागतिक आरोग्य संघटनेने निश्चित केलेली जीवन-कौशल्ये, वैयक्तिक, सामाजिक व राष्ट्रीय मूल्ये, शालेय शिक्षणातील कलाविषयाचे स्वरूप, महत्त्व आणि विविध आव्हाने, आधुनिक तंत्रज्ञान व ज्ञानतंत्राचा शिक्षण प्रक्रियेत होणारा वापर लक्षात घेतला आहे. या प्रशिक्षणातून **'कलाशिक्षक'** म्हणून प्रशिक्षणार्थीचे व्यक्तिमत्त्व अधिक समृध्द व संपन्न कसे होईल याचा प्राधान्याने विचार केला आहे.

कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम विकसनासाठी कलासंचालनालयाचे अधिपत्याखाली एक **अभ्यासक्रम पुनर्रचना समिती** स्थापन करण्यात आली. या समितीमध्ये मा. कलासंचालक, निरीक्षक (चित्रकला व शिल्प), परीक्षा नियंत्रक, अधिष्ठाता -शासकीय कला संस्था, सहाय्यक कला निरीक्षक, चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य, ज्येष्ठ अधिव्याख्याता, सहा. अधिव्याख्याता, महाविद्यालयीन शिक्षक संघटना प्रतिनिधी तसेच प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अभ्यासक्रम पुनर्रचना समिती सदस्य, प्राथमिक शिक्षण पदविका अभ्यासक्रम समिती सदस्य आणि कलाअध्यापनाचे प्रदीर्घ अनुभवी ज्येष्ठ व निवृत्त मुख्याध्यापक इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे. गरजेनुसार वेळोवेळी ज्येष्ठ कलाशिक्षण तज्ज्ञांना निमंत्रित करून त्यांचेही निमंत्रित सदस्य म्हणून सहभाग व मार्गदर्शन घेण्यात आले. या समितीद्वारे प्रस्तुत अभ्यासक्रमासाठी आराखड्याचे प्रारूप तयार करून कलाशिक्षक

अभ्यासक्रमाच्या प्रथम व द्वितीय वर्ष अभ्यासक्रमासाठी विषय योजना, घटक/उपघटक, अभ्यासक्रम/पाठयक्रम, गुणदान योजना, परीक्षा पध्दती इत्यादीचे विकसन करून पुनर्रचना केली आहे.

प्रस्तुत पदविका अभ्यासक्रमातील रेखा व रंगकला, संकल्पचित्र, रंग, कार्यानुभव, कलाभिव्यक्ती, भारतीय कलेचा इतिहास, शैक्षणिक मानसशास्त्र व शिक्षणशास्त्र इत्यादी पूर्वीचे विषय कायम ठेवून **पाश्चिमात्य कलेचा इतिहास, भाषा अध्यापनशास्त्र आणि माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान** (ICT) **इत्यादी घटक विषयांचा अभ्यासक्रमात नव्याने समावेश करण्यात आला आहे. सोबतच शालेय कलाशिक्षण अभ्यासक्रमातील चित्र-शिल्प, संगीत** (गायन-वादन-नृत्य) **व नाट्य इत्यादी ललित कला आणि कार्यानुभव विषयाशी सहसंबंध** (Co-relation) **जोडला आहे.** त्यामुळे प्रशिक्षण काळातच संबंधित प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाला शालेय कलाशिक्षण व कार्यानुभवातील घटकविषयांचा परिचय होणार आहे. **'कृतिद्वारा शिक्षण'** संकल्पनेवर आधारित असलेल्या या विषयांकरीता प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाचा ज्ञानरचनावादी दृष्टिकोन (Constructivism) विकसित करण्यास, मुक्ताविष्कार आणि सर्जनशील नवनिर्मितीला संधी मिळेल या हेतूने सर्वसमावेशक अशा अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे.

अभ्यासक्रमातील इतिहास (कला व संस्कृती), शैक्षणिक मानसशास्त्र व बालकला, शालेय शिक्षण, कलाशिक्षण व मूल्यमापन इत्यादी सैद्धांतिक विषयांसोबतच भाषा अध्यापनशास्त्र (Language Teaching Methodology) आणि माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) या विषयांची गरज लक्षात घेऊन अभ्यासक्रमात नव्याने समावेश झाल्याने भाषा अध्यापनशास्त्र (Language Teaching Methodology) विषयामधून शालेय विषयांना अनुरूप अध्यापन शास्त्राचा अभ्यास होतो, तर जागतिकीकरणाची आव्हाने पेलण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा अध्ययन-अध्यापनात सक्षमपणे उपयोग करण्याची कौशल्ये विकसित होण्यासाठी माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) विषयाची मदत होणार आहे. माहिती संप्रेषण तंत्रज्ञान हा स्वतंत्र विषय न ठेवता प्रत्येक प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाला कलाध्यापनात ICT अंगभूत घटक वापरण्याचे कौशल्य दृढ व्हावे असा दृष्टिकोन ठेवून नवनिर्मितीसाठी आनुषंगिक साधन-साहित्य हाताळण्याचे कौशल्य, नवनवीन तंत्रे व आधुनिक तंत्रज्ञान वापरासाठी प्रोत्साहित करून **'तंत्रस्नेही'** शिक्षक निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

भावी कलाशिक्षकांमध्ये सर्जनशीलतेचा विकास होऊन संशोधकवृत्ती रूजविण्यासाठी अभ्यासक्रमाच्या प्रथम व द्वितीय वर्षात अनुक्रमे **' दृश्यकला '** (Visual Art) आणि **' ललित कला '** (Fine Arts) यावर आधारित **प्रकल्प** (Project) करण्याची संधी प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाला देण्यात आलेली आहे. तसेच RTE Act-२००९ मधील कलम २९ (२) मधील **' सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन'** पद्धतीचा शालेय शिक्षणात वापर केला जातो ही बाब प्रस्तुत प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम तयार करताना लक्षात घेतली आहे.

ललित कलेतील कलाप्रकारांचे मुक्ताविष्कार पद्धतीने सादरीकरण करताना विविध सांस्कृतिक, सामाजिक मूल्ये, जीवन-कौशल्ये, सांस्कृतिक वारशाचे जतन व पर्यावरणविषयक जाणीवा अभ्यासक्रमातून प्रतीत होतात. तसेच राज्यातील, परिसरातील व स्थानिक पातळीवरील बहुविध कला, कलापरंपरा, कलावंत यांचा जवळून

परिचय व अभ्यास करण्याची संधी मिळते त्यामुळे प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकांच्या व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच त्यांच्यातील व्यावसायिक दृष्टीकोन व कौशल्ये विकसित करण्यास मदत होणार आहे.

दोन वर्षांच्या कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रमातून प्राथमिक (इयत्ता १ ते ५ वी) आणि उच्च प्राथमिक (इयत्ता ६ ते ८ वी) अशा दोन्ही स्तरावरील प्रभावी कलाध्यापनासाठी अध्ययनशील, कार्यकुशल, सर्जनशील, तंत्रस्नेही अशा बहुआयामी कलाशिक्षकांची जडणघडण व्हावी तसेच त्यांना व्यावसायिक क्षमता आणि कौशल्य विकासाची संधी मिळावी यादृष्टीने अभ्यासक्रमात सुधारणा करून पुनर्रचना केलेली आहे.

दोन वर्षांच्या कालावधीत हे प्रशिक्षण पूर्ण होणार असून अभ्यासक्रमातील सैद्धांतिक विषयांबरोबरच प्रात्यक्षिक कार्य, वर्गकाम, स्वाध्याय, लेखीकाम, प्रकल्प, सूक्ष्मपाठ, सरावपाठ, मौखिक परीक्षा यातून प्रशिक्षणार्थीचे कलाशिक्षक म्हणून व्यक्तिमत्त्व समृद्ध होणार आहे.

प्रशिक्षणाच्या प्रथम वर्षासाठी १००० गुण व द्वितीय वर्षासाठी १००० गुण असे एकूण २००० गुणांची गुणदान योजना आहे. प्रशिक्षणार्थीचे वार्षिक वर्ग प्रात्यक्षिक, लेखी स्वाध्याय (Tutorial) सूक्ष्मपाठ, सरावपाठ इत्यादीचे गुणदान महाविद्यालय स्तरावर अंतर्गत पद्धतीने केले जाणार असून प्रशिक्षणार्थीची वर्ग उपस्थिती, अंतर्गत व प्रात्यक्षिक कार्य, लेखी परीक्षांमध्ये निश्चित केलेले किमान गुण प्राप्त करणे अनिवार्य असून त्यावर परीक्षेतील यशस्विता अवलंबून आहे.

कल्पकता, सर्जनशीलता आणि कलात्मकता अंगी असणाऱ्यांना चित्रकलेच्या पायाभूत आणि शास्त्रशुद्ध अभ्यासाची जोड मिळाली तर त्यांना दृश्यकला क्षेत्रात कलाध्यापनासह अनेक संधी उपलब्ध आहेत. कलाशिक्षक पदविकेच्या दोन वर्षाच्या अभ्यासक्रमात कलाक्षेत्रातील व्यावसायिक संधींना लागणाऱ्या पायाभूत कौशल्यांना प्राधान्य देण्यात आले आहे. ए. टी. डी. नंतर कलाशिक्षक म्हणून असणारी संधी ही प्राधान्याने असली तरी हा अभ्यासक्रम अधिक व्यवसायाभिमुख आहे. शाळेत कलाशिक्षक होण्यासाठी पात्रता असणारा हा अभ्यासक्रम कालानुरूप बदलत जाणारा आणि लवचिक स्वरूपाचा आहे. कलाशिक्षक होऊ इच्छिणाऱ्यांसाठी हा अभ्यासक्रम कलेकडे अधिक डोळसपणे पहायला लावणारा आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमातून जीवनाकडे पाहण्याची दृष्टी प्रगल्भ व कलात्मक असेल. कलेच्या अंगाने सामाजिक, सांस्कृतिक बांधिलकी जपणारा हा अभ्यासक्रम कलाक्षेत्राला अधिक लोकाभिमुख बनविणारा आहे.

कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास उच्चकला शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे त्याला दृश्यकलेतील विविध पदवी-पदविका अभ्यासक्रमाकडे जाता येईल.

-------------------

## ■ अभ्यासक्रमाची ठळक वैशिष्ट्ये :

**या अभ्यासक्रमातून :-**

- कलाविष्काराची विविध माध्यमे, साहाय्यभूत साधन - साहित्य व तंत्राचा कौशल्यपूर्ण वापर करण्यास प्रोत्साहन मिळणार आहे.
- सौंदर्याभिरुची, कलारसास्वाद अशा सृजनात्मक गुणांच्या विकासाची संधी मिळणार आहे.
- पारंपरिक, कलात्मक आणि सांस्कृतिक वारसा स्थळांचे निरीक्षण व अभ्यास करण्याची संधी या अभ्यासक्रमातून मिळणार आहे.
- अभ्यासक्रमात उपक्रम आणि प्रकल्प निर्मितीस संधी दिल्यामुळे प्रशिक्षणार्थींना स्वयंअध्ययन व ज्ञानरचनावादी नवनिर्मितीचा आनंद मिळणार आहे.
- पर्यावरण विषयक जाणीव - जागृती व आस्था निर्माण होईल अशा घटकांचा अभ्यासक्रमात समावेश आहे.
- कलाभिव्यक्तीच्या आत्मप्रकटीकरणातून सौंदर्यदृष्टी, कल्पकता, प्रयोगशीलता, सर्जनशीलता वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न केला आहे.
- प्रस्तुत अभ्यासक्रमाव्दारे भारतीय व पाश्चिमात्य कला इतिहास तसेच स्थानिक परिसरातील कलाप्रकार, कला परंपरा, कलावंत इत्यादींचा अभ्यास करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.
- विविध कलात्मक कौशल्ये आत्मसात करून त्यांचा उपयोग कला अध्यापनासाठी करण्याची क्षमता निर्माण करण्यास मदत होणार आहे.
- अध्ययन - अध्यापनात आधुनिक तंत्रे, साधन - साहित्य व अद्ययावत तंत्रज्ञान वापरासाठी प्रोत्साहन व संधी मिळणार आहे.
- कलाशिक्षणाच्या विविध पैलूंचा उपयोग करून राष्ट्रीय धोरणे, स्त्री-पुरुष समानता, समता आणि धर्मनिरपेक्षता यांसारख्या मूल्यांची जाणीव व संवर्धनाची संधी प्राप्त करून दिली आहे.
- व्यावसायिक दृष्टीकोन, क्षमता निर्माण करून आत्मविश्वास वाढविण्यास मदत होणार आहे.
- प्रस्तुत अभ्यासक्रम शालेय शिक्षणातील प्राथमिक स्तरावरील **'कलाशिक्षण'** व **'कार्यानुभव'** विषयांशी सहसंबंध (Co-relation) जोडणारा आहे.
- भाषा अध्ययन-अध्यापनातून कला विषय इतर विषयाला पूरक ठरणार आहे.
- अपेक्षित व्यावसायिक अर्हता प्राप्त करताना प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाची क्षमता, कौशल्ये व शैक्षणिक बांधिलकी यांचा विकास करण्यास मदत होणार आहे.
- समाजोपयोगी उत्पादक कार्याचे महत्त्व जाणून त्यात सहभागी होण्यास संधी व प्रोत्साहन मिळणार आहे.
- उच्च कलाशिक्षणासाठी प्रोत्साहन मिळणार आहे.

## ▪ अभ्यासक्रमाचा दृष्टिकोन (Vision) :-

आनंदी जीवनासाठी सदैव जागरूक राहून कलात्मक अभिरुची व पूरक गुणांची जोपासना करणारा आणि अध्ययनशील, सर्जनशील, कार्यकुशल, बालस्नेही व तंत्रस्नेही कलाशिक्षक घडविणे.

## ▪ अभ्यासक्रमाची उद्दिष्टे :-

१) शालेय शिक्षणातील प्राथमिक स्तरावरील कलाशिक्षण-कार्यानुभव विषयक मूलभूत गरजा लक्षात घेऊन प्रभावी अध्यापनासाठी कार्यकुशल व सक्षम प्रशिक्षणार्थी कलाशिक्षक घडविणे.

२) प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकांमधे सर्जनशीलता, प्रयोगशीलता व ज्ञानरचनावादी दृष्टिकोन वृध्दिंगत करणे.

३) विद्यार्थ्यांविषयी संवेदनशीलता बाळगणारे प्रशिक्षणार्थी कलाशिक्षक निर्माण करणे.

४) अध्ययनामध्ये सुलभकाची भूमिका पार पाडू शकतील असे सक्षम प्रशिक्षणार्थी कलाशिक्षक घडविणे.

५) अभ्यासक्रमातील गाभाघटक, जीवनमूल्ये, जीवनकौशल्ये व भारतीय संविधानाची जाण असणारा व त्यांची रूजवणूक करणारा प्रशिक्षणार्थी कलाशिक्षक घडविणे.

६) विविध कलागुणांबरोबर भाषिक कौशल्यांची जोपासना करणारा प्रशिक्षणार्थी कलाशिक्षक घडविणे.

७) कलात्मकता, कार्यसंस्कृती, श्रमप्रतिष्ठा तसेच माहिती तंत्रज्ञान व आधुनिक तंत्राचा अंगिकार करणारे प्रशिक्षणार्थी कलाशिक्षक घडविणे.

८) अद्ययावत ज्ञानाची कास धरणारे, अध्यापन कौशल्यावर प्रभुत्व असणारे आणि व्यवसायनिष्ठा जोपासणारे प्रशिक्षणार्थी कलाशिक्षक घडविणे.

*निश्चित केलेली शैक्षणिक ध्येये साध्य करण्यासाठी साहाय्यकारी ठरणाऱ्या क्षमता विकसित करण्याचा अभ्यासक्रम हा आराखडा आहे. मानवी क्षमतांच्या बहुविधतेची व्याप्ती विशाल आहे आणि शिक्षणाद्वारे त्या सर्वांचा विकास करणे शक्य होईल असे नाही. त्यामुळे ज्या क्षमता आपल्या उद्दिष्टांच्या दृष्टीने आवश्यक व महत्त्वपूर्ण आहेत, ज्यात पुढे विकासाला वाव आहे आणि ज्याबाबत आपणास काही अध्यापनशास्त्रीय ज्ञान आहे अशा क्षमतांबाबतच आपण विचार करणार आहोत.* (पान क्र. ३०) ***राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा -२००५***

*बदलत्या काळानुसार बदलत्या परिस्थितीचे प्रतिबिंब शिक्षणात उमटणे आवश्यक असते. तरच शिक्षणातून राष्ट्राला, समाजाला, उपयोगी असे मनुष्यबळ उपलब्ध करून देणे शक्य होते. त्यादृष्टीने अध्यापक शिक्षक अभ्यासक्रमातून हे सामाजिक बदल टिपले गेले पाहिजेत* (पान क्र. १२) ***(NCFTE -2009)***

*शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, समावेशक शिक्षण, ज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झपाट्याने होणारे बदल, अध्ययन पद्धतीतील अपेक्षित बदल, या सर्व बाबी लक्षात घेता, अभ्यासक्रमातही बदल करणे अपरिहार्य झाले आहे. अभ्यासक्रमाची उपयुक्तता, व्यावहारिकता आणि कालसुसंगतता या बाबी सतत पडताळून पाहिल्या पाहिजेत. त्याचबरोबर अभ्यासक्रमाची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत आहे ना आणि त्यातून शिक्षणाची अपेक्षित उद्दिष्टे साध्य होत आहे ना, हेही सतत पाहिले पाहिजे.* (पान क्र. २०) ***राज्य अभ्यासक्रम आराखडा -२०१०***

- **कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विहित अर्हता :-**

कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष वर्गातील प्रवेशाकरीता उमेदवार उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १२ वी) उत्तीर्ण असावा, तसेच महाराष्ट्र राज्य कलासंचालनालयाद्वारे आयोजित इंटरमिजिएट ग्रेड ड्रॉईंग परीक्षा उत्तीर्ण असणे किंवा प्रविष्ट असणे आवश्यक असून त्याच वर्षात तो इंटरमिजिएट परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. संबंधित विद्यार्थी इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा त्याच वर्षात उत्तीर्ण न झाल्यास सदर विद्यार्थ्याने घेतलेला प्रवेश रद्द समजण्यात येईल. (शा.नि.क्र.एडीआर. २००७/(११४/०७) अ / तांशि-७, दि. ३१/०८/२००७). **मूक, बधीर व अंध उमेदवारास कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रमात प्रवेश देता येणार नाही.**

प्रथम वर्ष अभ्यासक्रम उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यास कलाशिक्षक अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षाला गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाईल. तसेच शासन निर्णय क्रमांक एडीआर २००७/(११४/०७) ड/तांशि.७ नुसार कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना दोन विषयासाठी ए. टी. के. टी. ची सवलत फक्त एकदाच देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. प्रवेशासाठीचे इतर सर्व नियम पदविका अभ्यासक्रम प्रवेश पात्रता नियमावलीच्या पत्रकात सविस्तरपणे नमूद करण्यात आलेले असून शासन/कलासंचालनालयाचे निर्णयानुसार वेळोवेळी होणारे बदल प्रस्तुत पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी लागू राहतील.

----------------



एन २२३--२अ

### कलाशिक्षक पदविका

## अभ्यासक्रम आराखडा - प्रथम वर्ष

| | | |
|---|---|---|
| • एकूण गुण - १००० | - | सैद्धांतिक : ४०० + प्रात्यक्षिक : ६०० |
| • एकूण कामाचे दिवस | - | २२० दिवस ( परीक्षा कालावधीसह ) |
| • एकूण उपलब्ध आठवडे | - | ३३ आठवडे (सैद्धांतिक व प्रात्यक्षिक भागाचे प्रमाण ४० : ६० % ) |
| • प्रात्यक्षिक कार्यासाठी दिलेले दिवस | - | १३० दिवस |
| • अध्यापनासाठी दिलेले दिवस | - | ७० दिवस |
| • परीक्षेचा कालावधी | - | २० दिवस |
| • आठवड्याच्या तासिका | - | ३६ तास ( ६० मिनिटांची एक तासिका याप्रमाणे ) |

## विषय योजना (Subject Scheme)

| | |
|---|---|
| 01 **Drawing & Painting**<br>• Memory & Imagination<br>• Object Drawing (Manmade & Nature)<br>• Perspective Drawing<br>• Outdoor Study (Sketching & Landscape)<br>• Blackboard Drawing & Calligraphy | ०१ **रेखा व रंगकला**<br>• स्मरणचित्र/कल्पनाचित्र<br>• वस्तुचित्रण (मानवनिर्मित व नैसर्गिक )<br>• यथादर्शन चित्रण<br>• बहि:स्थल अभ्यास (रेखांकन व निसर्गचित्रण)<br>• फलकरेखन व अक्षरलेखन |
| 02 **Design**<br>• Fundamentals of Art<br>• 2D & 3D Design | ०२ **संकल्पचित्र**<br>• कलेचे मूळ घटक<br>• व्दिमित व त्रिमित संकल्प |
| 03 **Colour**<br>• Theory & Practical | ०३ **रंग**<br>• सैध्दांतिक व प्रात्यक्षिक |
| 04 **Work-Experience**<br>• a) Clay Work<br>• b) Paper & Cardboard Work | ०४ **कार्यानुभव**<br>• अ) मातकाम<br>• ब ) कागद व पुठ्ठाकाम |
| 05 **Theory**<br>• Indian History (Art & Culture)<br>• Educational Psychology & Child Art<br>• Language Teaching Methodology | ०५ **सैद्धांतिक**<br>• भारतीय इतिहास (कला व संस्कृती )<br>• शैक्षणिक मानसशास्त्र व बालकला<br>• भाषा अध्यापनशास्त्र |
| 06 **Art Expression**<br>• Dance / Drama / Music | ०६ **कलाभिव्यक्ती**<br>• नृत्य / नाट्य / संगीत |
| 07 **Class Work** | ०७ **वर्गकाम** |
| 08 **Project** | ०८ **प्रकल्प** |
| 09 **Micro Teaching** | ०९ **सूक्ष्म अध्यापन** |

कलाशिक्षक पदविका

## अभ्यासक्रम आराखडा - द्वितीय वर्ष

- **एकूण गुण - १०००** - **सैद्धांतिक : ४०० + प्रात्यक्षिक : ६००**
- **एकूण कामाचे दिवस** - **२२० दिवस** ( परीक्षा कालावधीसह )
- **एकूण उपलब्ध आठवडे** - **३३ आठवडे** (सैद्धांतिक व प्रात्यक्षिक भागाचे प्रमाण ४० : ६० % )
- **प्रात्यक्षिक कार्यासाठी दिलेले दिवस** - **१३० दिवस**
- **अध्यापनासाठी दिलेले दिवस** - **७० दिवस**
- **परीक्षेचा कालावधी** - **२० दिवस**
- **आठवड्याच्या तासिका** - **३६ तास** ( ६० मिनिटांची एक तासिका याप्रमाणे )

## विषय योजना (Subject Scheme)

| | |
|---|---|
| 01 **Drawing & Painting**<br>• Memory / Imagination Drawing<br>• Head Study<br>• Time Sketch<br>• Perspective Drawing<br>• Outdoor Study (Sketching & Landscape) | ०१ **रेखा व रंगकला**<br>• स्मरणचित्र/कल्पनाचित्र<br>• व्यक्तिशीर्ष<br>• व्यक्ती रेखांकन<br>• यथादर्शन चित्रण<br>• बहि:स्थल अभ्यास-रेखांकन व निसर्गचित्रण |
| 02 **Design**<br>• Organization<br>• Pictorial Composition<br>• Functional Design<br>• Print-Making<br>• Poster Design | ०२ **संकल्पचित्र**<br>• मांडणीचित्र<br>• चित्रात्मक संकल्प<br>• कार्यात्मक संकल्प<br>• मुद्राचित्रण<br>• भित्तीपत्रक |
| 03 **Still Life** | ०३ **स्थिरचित्र** |
| 04 **Work-Experience**<br>a) ICT<br>**b) Any one of the following**<br>• Educational Teaching Material<br>• Stage & Functional Decoration<br>• Mural Painting<br>• Interior Decoration<br>• Doll & Mask Making<br>• Screen Printing | ०४ **कार्यानुभव**<br>**अ)** माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान<br>**ब) खालील पैकी कोणताही एक विषय-**<br>• शैक्षणिक साहित्य निर्मिती<br>• नेपथ्य व प्रसंगात्मक सजावट<br>• भित्तीचित्रण<br>• अंतर्गत सजावट<br>• बाहुली व मुखवटे काम<br>• जाळीमुद्रण |
| 05 **Theory**<br>• Western History (Art & Culture)<br>• Edn. Psychology & Edn. Theory<br>• School Edu., Art Edu. & Evaluation | ०५ **सैध्दांतिक**<br>• पाश्चिमात्य इतिहास (कला व संस्कृती )<br>• शैक्षणिक मानसशास्त्र व शिक्षणशास्त्र<br>• शालेय शिक्षण, कलाशिक्षण व मूल्यमापन |
| 06 **Art Expression** -Viva | ०६ **कलाभिव्यक्ती** - मौखिक परीक्षा |
| 07 **Class Work** | ०७ **वर्गकाम** |
| 08 **Project** | ०८ **प्रकल्प** |
| 09 **Practice Lesson** | ०९ **सरावपाठ** |

# कलाशिक्षक पदविका - पुनर्रचित अभ्यासक्रम

## (प्रथम वर्ष )

## विषयनिहाय तासिका / गुण विभागणी व परीक्षा पध्दती

| Sr. No. | Subject / Unit / Sub - unit | No. of Min. Asgmt. | No. of Min. Tutorial | Max. Marks | Teaching Hrs. Practical | Teaching Hrs. Theory | Teaching Hrs. Total | Exam. Hrs. | Marks | Evaluation |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | **Drawing & Painting** | | | | | | | | | |
| | • Memory & Imagination. | 10 | -- | 100 | 100 | 10 | 110 | 04 | 100 | H. A. E. |
| | • Object Drawing (Manmade & Nature) | 10 | -- | 100 | 100 | 10 | 110 | 05 | 100 | H. A. E. |
| | • Perspective Drawing. | 08 | -- | 80 | 55 | 05 | 60 | -- | -- | Internal |
| | • Outdoor Study (Sketching & Landscape) | 04 | -- | 40 | 45 | 05 | 50 | -- | -- | Internal |
| | • Blackboard Drawing & Calligraphy | 04 | -- | 40 | 45 | 05 | 50 | | | |
| 02 | **Design** | | | | | | | | | |
| | • Fundamentals of Art | 05 | -- | 50 | 50 | 15 | 65 | | | |
| | • 2D & 3D Design | 11 | -- | 110 | 105 | 10 | 115 | 05 | 100 | H. A. E. |
| 03 | **Colour** | | | | | | | | | |
| | • Theory & Practical | 08 | 04 | 120 | 70 | 30 | 100 | -- | -- | -- |
| 04 | **Work-Experience** | | | | | | | | | |
| | • a) Clay Work | 10 | -- | 100 | 50 | 10 | 60 | 05 | 50 | External |
| | • b) Paper & Cardboard Work | 10 | -- | 100 | 50 | 10 | 60 | 05 | 50 | External |
| 05 | **Theory** | | | | | | | | | |
| | • Indian History (Art & Culture). | -- | 04 | 40 | -- | 80 | 80 | 03 | 100 | H. A. E. |
| | • Education Psychology & Child Art | -- | 04 | 40 | -- | 80 | 80 | 03 | 100 | H. A. E. |
| | • Language Teaching Methodology | -- | 04 | 40 | -- | 70 | 70 | 03 | 100 | Internal Exam. |
| 06 | **Art Expression** (Dance / Drama / Music) | -- | 04 | 40 | 10 | 60 | 70 | 03 | 100 | H. A. E. |
| | **Total** | **80** | **20** | **1000** | | | | | | |
| 07 | **Class Work** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | 100 | Internal |
| 08 | **Project** | 01 | | -- | 50 | 10 | 60 | -- | 50 | External |
| 09 | **Micro Teaching** | 2+2+8 Lesson | | ---- | 50 | 10 | 60 | -- | 50 | Internal |
| | | | | **Total** | **780** | **420** | **1200** | -- | **1000** | -- |

(टिप : १) अध्यापनासाठी निर्धारित केलेल्या घटकनिहाय सैध्दांतिक/प्रात्यक्षिक) तासिकांच्या संख्येत स्थानिक पातळीवर गरजेनुसार किरकोळ बदल करण्यास हरकत नाही. परंतु वार्षिक तासिकांच्या एकूण संख्येत बदल होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२) स्वाध्याय करिता १/४ इंपेरियल (११ इंच X १५ इंच) आकाराचा ड्रॉइंग कागद वापरावा.

| | | | |
|---|---|---|---|
| **कामाचे एकूण दिवस** | - | **२२० दिवस** | (प्रथमसत्र परीक्षा व वार्षिक परीक्षेसह) |
| **एकूण गुण** | - | **१०००** | प्रात्यक्षिक ६०० गुण (परीक्षेचे ५०० + वर्गकाम प्रात्यक्षिक १०० गुण) |
| | | | सैद्धांतिक ४०० गुण (परीक्षेचे ३०० गुण + १०० भाषा अध्यापनशास्त्र अंतर्गत गुण) |

# कलाशिक्षक पदविका - पुनर्रचित अभ्यासक्रम

## ( द्वितीय वर्ष )

## विषयनिहाय तासिका / गुण विभागणी व परीक्षा पध्दती

| Sr. No. | Subject / Unit / Sub - unit | No. of Asgmt. | Min. Tutorial | Max. Marks | Teaching Hrs. Practical | Theory | Total | Exam. Hrs. | Marks | Evaluation |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | **Drawing & Painting** | | | | | | | | | |
| | • Memory / Imagination Drawing | 10 | -- | 100 | 80 | 20 | 100 | 04 | 50 | H. A. E. |
| | • Head Study | 10 | -- | 100 | 125 | 15 | 140 | 10 | 50 | H. A. E. |
| | • Time Sketch | 10 | | 100 | 65 | 15 | 80 | 05 | 50 | H. A. E. |
| | • Perspective Drawing | 06 | -- | 60 | 15 | 05 | 20 | -- | -- | -- |
| | • Outdoor Study (Sketching & Landscape) | 05 | -- | 50 | 50 | 10 | 60 | -- | -- | -- |
| 02 | **Design** | -- | - | -- | 140 | 40 | 180 | 10 | 100 | H. A. E. |
| | • Organization | 05 | -- | 50 | | | | | | |
| | • Pictorial Composition | 05 | -- | 50 | प्रस्तुत घटकांवर आधारित परीक्षा घेतली जाईल. | | | | | |
| | • Functional Design | 05 | -- | 50 | | | | | | |
| | • Print-Making | 02 | -- | 20 | | | | | | |
| | • Poster Design | 02 | -- | 20 | | | | | | |
| 03 | **Still Life** | 10 | -- | 100 | 110 | 30 | 140 | 10 | 100 | H. A. E. |
| 04 | **Work-Experience** | | | | | | | | | |
| | **a) ICT -** (Information & Communication Technology) | -- | 05 | 50 | 50 | 10 | 60 | 03 | 50 | Internal Exam. |
| | **b) Any One of the following -** | 05 | -- | 50 | 50 | 10 | 60 | 05 | 50 | External |
| | • Educational Teaching Material | | | | | | | | | |
| | • Stage & Functional Decoration | | | | | | | | | |
| | • Mural Painting | | | | | | | | | |
| | • Interial Decoration | | | | | | | | | |
| | • Doll & Mask Making | | | | | | | | | |
| | • Screen Printing | | | | | | | | | |
| 05 | **Theory** | | | | | | | | | |
| | • Western History (Art & Culture). | -- | 05 | 50 | -- | 80 | 80 | 03 | 100 | H. A. E. |
| | • Edu. Psychology & Edn. Theory | -- | 05 | 50 | -- | 80 | 80 | 03 | 100 | H. A. E. |
| | • School Education., Art Edu. & Evaluation. | -- | 05 | 50 | -- | 80 | 80 | 03 | 100 | Internal Exam. |
| 06 | **Art Expression** - Practical | 05 | -- | 50 | 30 | 10 | 40 | Max. 10 Min. | 50 | External |
| | **Total** | **80** | **20** | **1000** | | | | | | |
| 07 | **Class Work** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | 100 | Internal Marks |
| 08 | **Project** | 01 | | -- | 30 | 10 | 40 | -- | 50 | External |
| 09 | **Practice Lesson** | 2 + 2 + 12 | | -- | 50 | 10 | 60 | -- | 50 | Internal Marks |
| | | | | **Total** | **780** | **420** | **1200** | -- | **1000** | -- |

(टिप : १) अध्यापनासाठी निर्धारित केलेल्या घटकनिहाय सैध्दांतिक/प्रात्यक्षिक) तासिकांच्या संख्येत स्थानिक पातळीवर गरजेनुसार किरकोळ बदल करण्यास हरकत नाही. परंतु वार्षिक तासिकांच्या एकूण संख्येत बदल होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२) स्वाध्याय करिता १/२ इंपेरियल (१५ इंच X २२ इंच) आकाराचा ड्राईंग कागद वापरावा.

| | | | |
|---|---|---|---|
| **कामाचे एकूण दिवस** | - | **२२० दिवस** | (प्रथमसत्र परीक्षा व वार्षिक परीक्षेसह) |
| **एकूण गुण** | - | **१०००** | प्रात्यक्षिक ६०० गुण (परीक्षेचे ५०० + वर्गकाम प्रात्यक्षिक १०० गुण) |
| | | | सैद्धांतिक ४०० गुण (परीक्षेचे ३०० गुण वर्गकाम टयुटोरियल १००गुण ) |

## ■ अभ्यासक्रमातील महत्त्वाचे बदल :-

प्रस्तुत अभ्यासक्रम विकसित करताना अभ्यासक्रमातील प्रथम आणि द्वितीय वर्षातील निरनिराळे विषय, घटक व उपघटक यांतील आशयाचा एकत्रित विचार करून आशयाची मांडणी एकात्मरितीने करण्यात आलेली आहे. प्रथम आणि द्वितीय वर्ष अभ्यासक्रमातील विषय योजना ठरविताना प्रत्येक वर्षी एकूण नऊ विषयांची ठळकपणे योजना करण्यात आलेली असून त्यामध्ये संबंधित घटक, उपघटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. अभ्यासक्रमातील बहुतांशी घटक-उपघटकात फारसे बदल न करता गरजेनुसार त्यांच्या स्वरूपात बदल करून ते आहेत तसेच ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

अभ्यासक्रमातून तयार होणारे कलाशिक्षक शालेय कलाशिक्षण व कार्यानुभव अभ्यासक्रमालाही पूर्णपणे परिचित असणे आवश्यक आहे. म्हणून प्राथमिक शालेय अभ्यासक्रमामध्ये निश्चित केलेल्या **कलाशिक्षण** व **कार्यानुभव** अभ्यासक्रमाशी प्रस्तुत अभ्यासक्रमाचा सहसंबंध (Co-relation) जोडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

- **व्यक्तिशीर्ष :**

सन १९९९ पूर्वीच्या कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रमात असलेला व्यक्तिशीर्ष हा विषय कलाशिक्षक पदविका द्वितीय वर्ष अभ्यासक्रमात पुन्हा नव्याने समावेश केलेला आहे. या विषयाच्या अभ्यासातून प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाला शालेय अध्यापनात दिनविशेष निमित्ताने थोरांची व्यक्तिचित्रणे फलकावर प्रभावीपणे साकारण्याची व मानवी शरीररचनेतील व्यक्तिरेखांकन या विषयात चेहऱ्याचे महत्त्व यादृष्टिनेही अचूक अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे. उच्च कलाशिक्षणातील पायाभूत अभ्यास व व्यावसायिक दृष्टिकोनाची पायाभरणी विकसित होण्यासाठी मदत मिळेल.

- **कलेचा इतिहास :**

प्रथमवर्ष अभ्यासक्रमात **'भारतीय इतिहास'** (कला व संस्कृती) तर द्वितीयवर्ष अभ्यासक्रमामध्ये **'पाश्चिमात्य इतिहास'** (कला व संस्कृती) अशी रचना करून भारतीय कला इतिहासाबरोबरच पाश्चात्य कलेचा अभ्यास करण्याची संधी अभ्यासक्रमातून दिलेली आहे.

- **भाषा अध्यापनशास्त्र :**

कलाशिक्षकाचे व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध व्हावे, तसेच कलाशिक्षण विषयाचे अध्ययनाबरोबरच अध्यापनही अधिक प्रभाविपणे करता यावे यादृष्टीने प्रथम वर्ष अभ्यासक्रमात **'भाषा अध्यापनशास्त्र'** या विषयाचा स्वतंत्रपणे समावेश करण्यात आलेला आहे. कलेबरोबर भाषेचा अभ्यास केल्याने एक वैचारिक बैठक तयार होते, बहुश्रुतता येते. सौंदर्यदृष्टी, रसिकता, सहृदयता इत्यादी अंगे विकसित होतात. प्राथमिक विषय अध्यापनाचे कौशल्य प्राप्त झाल्याने कला-कार्यानुभवाच्या तासिकांबरोबर भाषा विषयाचे देखील प्रभावीपणे अध्यापन करता येईल.

- **कार्यानुभव :**

प्राथमिक शालेय शिक्षणातील **'कृतिद्वारा शिक्षण'** संकल्पनेवर आधारित असलेल्या कार्यानुभवाशी प्रस्तुत अभ्यासक्रमाचा सहसंबंध जोडला आहे. त्यामुळे सेवापूर्व प्रशिक्षण काळातच संबंधित प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाला कार्यानुभवातील घटक-उपघटकांचा परिचय होऊन शिक्षकाचा

ज्ञानरचनावादी दृष्टिकोन विकसित होण्यास व मुक्ताविष्कार आणि सर्जनशील नवनिर्मितीला संधी मिळणार आहे. तसेच प्रशिक्षणार्थीचा व्यावसायिक दृष्टिकोन व आत्मविश्वास वाढीस लागणार आहे.

प्रथम वर्ष अभ्यासक्रमातील अ) मातकाम, ब) कागद व पुठ्ठाकाम या घटकांबरोबरच द्वितीय वर्ष अभ्यासक्रमात अ) माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान हा घटक अनिवार्य स्वरूपाचा असून ब) विभागात १) शैक्षणिक साहित्य निर्मिती, २) नेपथ्य व प्रसंगात्मक सजावट, ३) भित्तीचित्रण, ४) अंतर्गत सजावट, ५) बाहुली व मुखवटे काम, ६) जाळीमुद्रण इत्यादी घटकांचा अभ्यासक्रमात समावेश केला असून या विभागातील आवडीच्या कोणत्याही एका घटकाची महाविद्यालयाला निवड करण्याची संधी प्रस्तुत अभ्यासक्रमातून दिलेली आहे.

अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षाकरीता कार्यानुभव अंतर्गत **अ) 'माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान'** (Information & Communication Technology ) या घटकविषयाचा अभ्यासक्रमात नव्याने समावेश करण्यात आलेला आहे. शिक्षण प्रकियेतील आदान-प्रदानाचे एक अद्ययावत व प्रभावी साधन (तंत्र) म्हणून याकडे पाहिले जाते. तंत्रज्ञानाच्या गतीमान युगात अद्ययावत ज्ञान मिळविणे ही काळाची गरज आहे. ज्ञानप्राप्तीसाठी माहितीचे विविध स्रोत शोधणे, वापर करणे, प्राप्त माहितीचे आदान-प्रदान करून ती माहिती साठवून तिचा पुनर्वापर करण्यासाठी माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे. त्यामुळे प्रस्तुत अभ्यासक्रमातून **'तंत्रस्नेही'** व **'शोधकवृत्तीचा'** सक्षम कलाशिक्षक निर्माण होणार आहे.

कार्यानुभवातील वरील सर्व घटक-उपघटकांचा शालेय स्तरावरील कार्यानुभव विषय अभ्यासक्रमासोबत सहसंबंध (Co-relation) जोडल्याने प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाला शालेय स्तरावरील कार्यानुभव विषयाचा परिचय होऊन विषय अध्यापनासाठी अपेक्षित असलेले कौशल्य व क्षमता प्राप्त होणार आहे.

- **प्रकल्प :**

प्रात्यक्षिकाची प्रत्यक्ष कार्यवाही, निवेदन किंवा अहवाल लेखन आणि सादरीकरणाचे कौशल्य विकसित करण्याची संधी मिळावी, तसेच भावी कलाशिक्षकांमध्ये सर्जनशीलतेचा विकास होऊन संशोधक वृत्तीचे बीजारोपण होण्यासाठी आणि स्वयंअध्ययनाद्वारे नवविचार, नवीन कल्पना रुजाव्यात यादृष्टीने कला शिक्षक पदविका अभ्यासक्रमात **'प्रकल्प'** (Project ) विषयाच्या स्वरूपात बदल करण्यात आला आहे.

अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात 'दृश्यकला' (Visual Art) आणि द्वितीय वर्षात **' ललित कला '** (Fine Arts) यावर आधारित प्रकल्प लेखनासाठी दिलेले मुद्दे आणि मार्गदर्शक सूचनांचे आधारे प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाने स्वयंअध्ययनावर आधारित **'प्रकल्प'** (Project ) पूर्ण करणे अपेक्षित आहे.

- **कलाभिव्यक्ती :**

शालेय स्तरावरील कलाशिक्षण विषयाचे अध्यापन करताना दृश्य कलेबरोबरच इतर ललित कलांचे आविष्कारही शालेय विद्यार्थ्यांकडून करून घेण्याची जबाबदारी कलाशिक्षकाची आहे. त्यासाठी शालेय कलाशिक्षणातील सर्व कलांमधील प्राथमिक स्वरूपाचा किमान अनुभव घेणे ही प्रशिक्षणार्थीची आता गरज आहे. प्रस्तुत अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षात प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाने कलाभिव्यक्ती विषयाची तात्त्विक माहिती आत्मसात करून द्वितीय वर्षात ललित कलांमधील प्रात्यक्षिकाचा अनुभव घ्यावयाचा आहे. कलाभिव्यक्ती विषयाच्या मौखिक परीक्षेतून प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकांकडूनही अशाप्रकारचे सादरीकरण करून घेणे अपेक्षित आहे.

---------------

## १. विषय - रेखा व रंगकला (Drawing & Painting)

### घटक - स्मरणचित्र / कल्पनाचित्र ( Memory / Imagination Drawing )

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| 10 | PRACTICAL | -- | 04 | 110 | 100 | H.A.E. |

**प्रस्तावना :-** पाहिलेल्या किंवा अनुभवलेल्या घटना, प्रसंगांना चित्ररूप देत असताना स्मरणशक्तीला चालना मिळत जाते. एखाद्या प्रसंगातील नेमकेपणा निवडता येणे आणि त्याला चित्ररूप देणे महत्त्वाचे असते. हे करीत असताना विविध माध्यम तंत्राचा व विषयानुरूप चित्ररचनेचा या विषयात अभ्यास होणे अपेक्षित आहे. ओळखीच्या विविध घटकांची व आशयाची आपल्या कल्पनाविलासाने मांडणी केल्यास एक वेगळीच गंमत अनुभवायला मिळते. विसंगत वस्तू-घटकांची सुयोग्य मांडणी केल्याने सुसंगती निर्माण होते. अशा प्रयोगाद्वारे सर्जनशीलता वाढीस लागेल. स्वैर कल्पनांचा सर्जनशील आविष्कार कल्पना चित्रातून साधता येणार आहे.

### स्मरणचित्र -

- **उद्दिष्टे :-**
  - अनुभवलेल्या किंवा पाहिलेल्या प्रसंगाचे स्मरणाने चित्रण करणे.
  - विविध प्रकारचे दैनंदिन प्रसंग, घटना, दृश्य, अभिनय इत्यादींचे चित्रण करणे.
  - निरीक्षण व स्मरणशक्तीचा विकास घडवून आणणे.
  - स्मृतिप्रतिमांना चित्ररुप देवून वस्तूनिष्ठतेपर्यंत जाण्याचा प्रयत्न करणे.
  - प्रसंगानुरुप चित्रात वातावरणनिर्मिती व अनुरूप रंगयोजना करण्याची क्षमता निर्माण करणे.
  - विविध माध्यमे, साहाय्यभूत साधन- साहित्य व तंत्राचा कौशल्यपूर्ण वापर करून विद्यार्थ्यांच्या प्रयोगशील व शोधक वृत्तीला चालना देणे.
  - स्वनिर्मितीतून आनंद घेण्याची संधी उपलब्ध करुन देणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम -**

  **१) शीघ्र रेखाटनाव्दारे सराव**
  - सभोवतालच्या विविध घटक- वस्तूंचे निरीक्षण करुन रेखाटन.
  - शरीरशास्त्रीय घडण आणि प्रमाण यांचा विविध रंग माध्यमातून अभ्यास व सराव.

  **२) अविस्मरणीय प्रसंगाचे चित्रण**
  - पूर्वी अनुभवलेल्या व स्मरणात राहिलेल्या एखाद्या अविस्मरणीय प्रसंगाचे चित्रण.
  - विविध प्रसंगातील वास्तवानुसारी रेखाटन करताना प्रमाणबध्दता, पोत, छायाप्रकाश, रंगसंगती, सूचक व पूरक घटक इत्यादीचे चित्रण.

**३) अभिनयाव्दारे सादरीकरण व चित्रण**

- मानवाकृतीच्या चेहऱ्यावरील भाव, लकब, वेशभूषा, लय इत्यादी निरीक्षणाव्दारे चित्रण.
- विद्यार्थ्यांना वैयक्तिक किंवा गटाने एखादी घटना किंवा प्रसंगाचे सादरीकरण करायला सांगून त्याचे चित्रण.

**४) दैनंदिन प्रसंग**

- दैनंदिन व्यवहारामध्ये घडणाऱ्या विविध घटनाक्रमातील प्रसंगाचे चित्रण.
- प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष घेतलेले अनुभव आणि त्या अनुभवाचे दृश्यरूपात निरीक्षणाव्दारे चित्रण.

**५) सण, समारंभ, उत्सव, खेळ इत्यादी.**

- परिसरात साजरे होणारे विविध सण, समारंभ, उत्सव, खेळ यांसारख्या सामूहिक व सार्वजनिक प्रसंगावर आधारित चित्रण.

## कल्पनाचित्र -

- **उद्दिष्टे :-**
  - कल्पनाशक्तीचा विकास घडवून आणणे.
  - काल्पनिक कथा, गोष्टी, कविता, साहस कथा इत्यादीवर आधारित चित्रण करणे.
  - स्वनिर्मिती व नवनिर्मितीस प्रोत्साहन देणे.
  - स्वनिर्मित चित्राबद्दल स्वतःचे विचार (स्वमत) व्यक्त करणे / चित्राचे वर्णन करणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम -**

१) ऐतिहासिक व पौराणिक कथा विषयावरील चित्रण.(तत्कालीन वेशभूषा, केशभूषा शरीरयष्टी इत्यादिंच्या रेखाटनातून विविध व्यक्तिरेखांचे काल्पनिक चित्रण)

२) कथा, गोष्टी, पंचतंत्रातील कथा व साहस कथा इत्यादींवर आधारित चित्रण.

३) शोध नव्या जगाचा, परग्रहावरील सृष्टी, पाण्याखालील जग, परग्रहावरील जीवन यांसारख्या कल्पक विश्वाचे चित्रण.

- **मार्गदर्शक सूचना :-**

१) अभ्यासक्रमातील प्रत्येक उपघटकावर किमान एकतरी स्वाध्याय घेण्यात यावा.

२) चित्रणात वातावरणनिर्मितीसाठी सूचक व पूरक घटकांचा समावेश असावा.

३) विषयाच्या आवश्यकतेनुसार रचना, परस्पर प्रमाण, पुरोभूमी व पार्श्वभूमी अपेक्षित आहे.

४) स्मरणचित्र / कल्पना चित्रणात किमान तीन मानवाकृती असाव्यात.

५) विषयानुरूप रंगसंगती, रंगकाम, यथार्थदर्शन कौशल्यपूर्ण असावे.

**गुणदान योजना :-**

| मांडणी /रचना | प्रमाण बध्दता | यथादर्शन | कल्पकता | सादरीकरण | माध्यम कौशल्य | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

☞ **संदर्भ ग्रंथ :-**


१) रेखाकंन ते रेखाचित्र - वासुदेव कामत

२) स्केचिंग - प्रताप मुळीक

३) स्केचिंग ॲण्ड ड्रॉईंग - शिवाजी तुपे

४) स्केचिंग ॲण्ड ड्रॉईंग - संजय शेलार

५) स्मरणचित्रे - ज. पा. आपटे

६) Drawing and Anatomy - Victor Perard

७) Drawing and Anatomy - Andrew Loomis

८) Free Drawing - M. M. Mehta & V. S. Adurkar - Grace Prakashan, Mumbai




कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - प्रथम वर्ष

**विषय - रेखा व रंगकला (Drawing & Painting)**

**घटक - वस्तुचित्रण (मानवनिर्मित व नैसर्गिक) Object Drawing ( Manmade & Nature)**

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| 10 | PRACTICAL | -- | 05 | 110 | 100 | H.A.E. |

**प्रस्तावना :-** निसर्ग व मानवनिर्मित वस्तूंचे सूक्ष्म निरीक्षण करून वास्तवानुसार रेखाटन करता येणे हे चित्रकलेत अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा रेखाटनातून एखाद्या वस्तुचे निरीक्षण करण्याची क्षमता वाढीस लागते. वस्तुंचे आकार, आकारमान, रंग, पोत, घनता, मिती आणि त्यावर पडलेला छायाप्रकाश इत्यादींचा अचूक अभ्यास करण्याची संधी प्राप्त होणार आहे. दोन वस्तुमधील भिन्नता ही त्याच्या रंग, पोत, आकार, घाट यावर ठरत असते. एखादी वस्तू हुबेहूब रेखाटन करत असताना ही जाणीव अप्रत्यक्षरित्या मिळणार आहे.

- **उद्‌दिष्टे :-**

१) निसर्ग व मानवनिर्मित घटक-वस्तूंचे प्रमाणबद्ध व अचूक रेखांकन करण्याचे कौशल्य आत्मसात करणे.
२) वस्तुंची सुयोग्य मांडणी व चित्र अवकाशाचा अभ्यास करणे.
३) वस्तुवरील प्रकाशाचा परीणाम व छायाभेदाचा अभ्यास करणे.
४) वस्तूचा आकार, रंग, रंगछटा व पोत यांचा अभ्यास करणे.
५) विविध रंग माध्यमे व तंत्र वापरण्याची संधी देणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**

१) मूलभूत घनाकार व त्यावर आधारित मानवनिर्मित व नैसर्गिक घटकांचे प्रमाणबद्ध रेखाटन व चित्रण.
२) नैसर्गिक वस्तूंचा बाह्याकार, रचना व पोत इत्यादिंचे अभ्यासात्मक चित्रण.
३) एक अथवा दोन वस्तूंची सुयोग्य मांडणी व रेखाटनाचा सराव.
४) विविध पृष्ठभागावर प्रकाशामुळे निर्माण होणाऱ्या छायाभेदाचा अभ्यास.
५) पेन्सिल, रंगीत पेन्सिली, पेन, शाई, पेस्टल, चारकोल, क्रेऑन्स जलरंग यांसारख्या रंग माध्यमातून रेखाटन व चित्रण.
६) धातू, काच, कागद, प्लॅस्टिक, लाकूड इ. माध्यमात बनविलेल्या मानवनिर्मित वस्तू व खरबरीत, गुळगुळीत पोत असलेल्या नैसर्गिक वस्तूंचा अभ्यास. (उदा. ग्लास, मग, बकेट, बाऊल, दगड, फुले, फळे, पाने, शंख, शिंपले इत्यादी.)
७) वस्तुंचे परस्पर प्रमाण व त्यावरील रंगछटांच्या परिणामांचा अभ्यास.

- **मार्गदर्शक सूचना :-**
  १) सराव स्वाध्याय हे मुख्य स्वाध्यायांचे व्यक्तिरिक्त असणे आवश्यक आहे.
  २) विविध रंग माध्यमांचा समावेश आवश्यक आहे.
  ३) प्रमाण, रंग, पोत, इत्यादींचा विचार करुन घटक वस्तूंची निवड करावी.
  ४) वस्तूंचे आकार व रंगांमध्ये विविधता असावी.
  ५) मानव व निसर्गनिर्मित वस्तूंचा आंतर्बाह्य रचना अभ्यास आवश्यक आहे.


**गुणदान योजना -**

| अचूक रेखांकन | मांडणी | परिणामकारकता | छायाभेद | माध्यम कौशल्य/तंत्र | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | १० |

टीपप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

☞ **संदर्भ ग्रंथ :-**


१) Drawing from the book of Nature - Dennis-Klocek.
२) Art Book Object Drawing - Ariella Belle.
३) Object Drawing - Michelle MaGee.
४) How to Draw an Object - Soizic Mouton.

कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - प्रथम वर्ष

## १. विषय - रेखा व रंगकला (Drawing & Painting)

## घटक - यथादर्शन चित्रण (Perspective Drawing)

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| 08 | PRACTICAL | -- | -- | 60 | -- | Internal |

**प्रस्तावना :-** निसर्गातील प्रत्येक वस्तूचे रेखाटन करीत असताना दिसते तसे रेखाटन करणे अपेक्षित आहे. वस्तूंचे दृश्यरूप हे रंग, पोत, छटा आणि आकार- आकारमानातून स्पष्ट होत असते. यथादर्शनामध्ये वातावरणानुसार आणि रेषात्मक यथादर्शनाचा अभ्यास केला जातो. रेषात्मक यथादर्शनातून वस्तुंचा बाह्याकार आणि वातावरणानुसार वस्तुंच्या रंगछटांचा अभ्यास होतो. साध्या सोप्या वस्तु-घटकांचे अनेक बिंदुंतून रेखाटन करता येईल. उदा. रेल्वे स्टेशन, एस. टी. बस, रेल्वे रूळ, इमारती, विविध घनाकार इत्यादी.

- **उद्दिष्टे :-**
  १) निरीक्षणशक्तीचा विकास करणे.
  २) वास्तवानुसार चित्रणाची दृष्टी निर्माण करणे.
  ३) विविध दृश्यपातळ्यांचा अभ्यास करणे.
  ४) विविध यांत्रिक साधनांची सुयोग्य हाताळणी करण्याचे कौशल्य संपादन करणे.
  ५) घनाकारांचे व्दिमित पृष्ठभागावर चित्रण करण्याचे तंत्र संपादित करणे.
  ६) वातावरणीय यथादर्शनाचा अभ्यास करणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**
  १) विलय बिंदू व क्षितिज रेषांचा वापर करून वेगवेगळ्या दृश्यपातळ्यांवर घनाकाराचे रेखाटन.
  २) दिलेल्या घटकांचे अनुविक्षेप व उद्विक्षेप काढून प्रक्षेपण रेखांकन.
  ३) शास्त्रशुध्द पदधतीने एक विलय बिंदू (समांतर) यथादर्शनात्मक चित्रण. (उदा. चित्रपृष्ठ, भूपृष्ठ, क्षितिज रेषा, विलय बिंदू, अनुविक्षेप, उद्विक्षेप)
  ४) शास्त्रशुध्द पद्धतीने कोनात्मक यथार्थदर्शन चित्रण.
  ५) यथादर्शनातील घटक वापरून निरीक्षणात्मक चित्रण. (उदा. कुंपण, घराचा अंतर्भाग, आद्याक्षरे इत्यादी.)

- **मार्गदर्शक सूचना :-**
  १) त्रिकोणी गुण्या, सेट्स्क्वेअर, स्केल यांसारखी साधने हाताळण्याचा प्रात्यक्षिकाव्दारे सराव करुन घ्यावा.

२) यथादर्शन व्यक्तिरिक्त इतर विषयांमध्ये (उदा. स्मरणचित्र, निसर्गचित्र, मानव व निसर्ग निर्मित) यथादर्शनांच्या घटकांचा वापर करण्याकरीता विद्यार्थ्यांना अधिक प्रोत्साहन द्यावे.

- **गुणदान योजना :-**

| आरेखन कौशल्य | अचूकता | सादरीकरण / सफाईदारपणा | एकूण गुण |
|---|---|---|---|
| | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) पर्स्पेक्टीव्ह ड्रॉईंग - मिलिंद मुळीक, जोत्स्ना प्रकाशन, पुणे

२) Perspective Drawing Hand Book - Joseph D,amelio.

३) Perspective Drawing- Ernest Norling.

४) Perspective - Jay Doblin.

५) Perspective for Art Students - R. G. Hatlon.

६) Perspective Made Easy - Earnest R. Norling.

७) Basic Perspective Drawing - John Montague.

८) The Complete Guide to Perspective Drawing - Craig Attebery.

९) How to Draw Perspective - Mark Bergin.

१०) Perspective for the absolute Beginners - Mark & Mery Willenbrink.




कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - प्रथम वर्ष

## १. विषय - रेखा व रंगकला (Drawing & Painting)

**घटक - बहि:स्थल अभ्यास** (रेखांकन व निसर्गचित्र) **Outdoor Study** (Sketching & Landscape)

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| 04 | PRACTICAL | -- | -- | 50 | -- | Internal |

**प्रस्तावना :-** निसर्ग हा सर्व सर्जनाचा स्रोत आहे. त्यामुळे सभोवतालच्या परिसरातील घटक-वस्तुंचे, वातावरणीय बदलाचे रंगरेषेत शीघ्र रेखाटन केल्याने हस्तकौशल्यावर प्रभुत्त्व तर येतेच शिवाय निसर्गाबद्दलचे कुतूहल वाढते. निसर्गातील रंग, आकार, छटा, पोत, यथादर्शन इत्यादीचा कलेच्या अंगाने अभ्यास महत्त्वाचा आहे. तसेच पर्यावरण संवर्धन व जैव विविधता इत्यादीची जाणीव या विषयामुळे शक्य आहे. निसर्ग संवर्धन आणि निसर्गातील प्राणी, पक्षी आणि वनस्पतीचे आकलन शीघ्र रेखाटनाद्वारे करता येईल. या बहि:स्थल अभ्यासात निरीक्षण, अनुकरण आणि रेखांकन अपेक्षित आहे.

- **उद्दिष्टे :-**

१. निरीक्षणशक्तीचा विकास करणे.

२. विविध माध्यमांव्दारे गतिमान, प्रमाणबध्द् रेखाटन व रंगकाम करता येणे.

३. सौंदर्य दृष्टिकोन वाढीस लावणे, निसर्ग पर्यावरणाबद्दल आस्था निर्माण करणे.

४. विविध साधन-साहित्य हाताळण्याचे कौशल्ये व तंत्र विकसित करणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**

१. निसर्गातील विविध घटकांचे निरीक्षण करुन पेन, पेन्सिल यांसारख्या माध्यमात रेखाटन.

२. प्राणी, पक्षी व मानवाकृती यांचे प्रमाणबध्द् व वैशिष्ट्यांसह अचूक चित्रण.

३. पारदर्शक/ अपारदर्शक जलरंग, ॲक्रॅलिक कलर्स, पेस्टल्स, तैलरंग रंगीत पेन्सिली इत्यादी माध्यमात निसर्ग चित्रण.

४. विविध रंग माध्यमे हाताळण्याचे कौशल्य विकसित करण्यासाठी चित्रण.

५. वातावरणीय व रेषात्मक यथादर्शनाचा प्रामुख्याने वापर.

६. विविध दृष्टिपातळ्यांवरून वस्तूंचा आंतर आणि बाह्य अभ्यास व सराव.

- **मार्गदर्शक सूचना -**

१) प्रत्यक्ष स्थळावर जाऊन चित्रण करणे अपेक्षित आहे. (उदा. रेल्वे स्थानक, बस स्थानक गर्दीची ठिकाणे, बाजार, प्रेक्षणीय स्थळे इ.)

२) माध्यमांच्या मुक्त हाताळणीसाठी प्रोत्साहन व संधी देणे अपेक्षित आहे.

**गुणदान योजना :-**

| अचूक रेखांकन | माध्यम हाताळणी | सादरीकरण | एकूण गुण |
|---|---|---|---|
| | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१. स्केचिंग - सुधाकर खाजगीवाले

२. रेखाकंन ते रेखाचित्र - वासुदेव कामत

३. स्केचिंग - प्रताप मुळीक

४. स्केचिंग ॲण्ड ड्रॉईंग - शिवाजी तुपे

५. स्केचिंग ॲण्ड ड्रॉईंग - संजय शेलार

६. स्केच करता करता - शिवाजी तुपे

७. पेन्सिल टेकनिक्स भाग - १ , २ - राहूल देशपांडे, गोपाल नांदूरकर

८. एका कुंचल्याची भ्रमंती - म. कृ. केळकर, ग्रंथाली प्रकाशन, पुणे

९. वॉटर कलर डेमॉन्स्टेशन्स् - मिलींद मुळीक, ज्योत्स्ना प्रकाशन, पुणे

१०. Drawing and Anatomy - Victor Perard

११. Drawing and Anatomy - Andrew Loomis

१२. Free Drawing - M. M. Mehta & V. S. Adurkar - Grace Prakashan, Mumbai

१३. Sketching & Drawing - Ravi Paranjape

१४. Drawing Birds - Rajni & Ajay - Unicorn Books, New Delhi

१५. Drawing Landscapes in pencil ॄ Ferdinand Petrie

कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - प्रथम वर्ष

## १. विषय - रेखा व रंगकला (Drawing & Painting)

### घटक - फलकरेखन व अक्षरलेखन (Blackboard Drawing & Calligraphy)

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| 04 | PRACTICAL | -- | -- | 50 | -- | Internal |

**प्रस्तावना :-** कलाध्यापकाचे सुलेखन आणि रेखन उत्कृष्ट असणे अपेक्षित आहे. फलकावरील मजकूर, आकृत्या, रेखाटने फलकाच्या आकाराला शोभून दिसतील अशा सुवाच्च्य व मोठ्या आकारात असणे गरजेचे आहे. अध्ययन-अध्यापन प्रभावी होण्याच्या दृष्टीने खडू-फळा हे एखाद्या वाहका प्रमाणे भूमिका बजावित असतात. अक्षरांचे वळण, सहजता सततच्या सरावातून आत्मसात करता येते. सुंदर हस्ताक्षर आणि रेखाटने इत्यादींचा प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकांकडून बारकाईने सराव करून घेता येईल.

- **उद्दिष्टे :-**
  - १ सुलेखनाच्या विविध पद्धती, तंत्र व नमुन्यांचा अभ्यास करणे.
  - २ शब्दार्थ व प्रसंगानुरूप विविध शैलीत अक्षर लेखनासाठी संधी देणे.
  - ३ फलक लेखन व रेखनाचे कौशल्य आत्मसात करणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**
  - **फलकरेखन -**
    - १ देवनागरी व रोमन अक्षरांच्या विविध अवयवांचा (खडू-फळा माध्यमात) अभ्यास व सराव.
    - २ निसर्ग व मानवनिर्मित घटक व प्रसंग यांचा फलकावर सराव.
    - ३ फलकावर रंगीत खडूने विविध शैलीत फलक रेखन.
    - ४ शब्दातील आशय व प्रसंगानुरूप फलक रेखन.
  - **अक्षरलेखन -**
    - १ देवनागरी व रोमन अक्षरांच्या विविध अवयवांचा (कागद माध्यमावर) अभ्यास व सराव.
    - २ विविध माध्यमे व विविध शैलीत अक्षरलेखन.
    - ३ शब्दातील आशय प्रसंगानुरूप अक्षरलेखन.

- **मार्गदर्शक सूचना -**
  - १) फलक रेखनासाठी गुंडाळी फलकाचा उपयोग करता येईल.
  - २) फलक रेखनाच्या स्वाध्यायाचे छायाचित्र स्वरूपात संग्रह वर्गकामात ठेवावा.
  - ३) स्वाध्याय स्वरूपानुसार फलक रेखनासाठी योग्य कालावधी द्यावा.
  - ४) विविध माध्यमांचा वापर करता येईल.


**गुणदान योजना :-**

| मांडणी | रंगयोजना | रेखन/लेखन कौशल्य | कल्पकता/सृजनता | सादरीकरण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) कमलाक्षरं - कमल शेडगे - राजेंद्र प्रकाशन, गिरगांव मुंबई.
२) काना मात्रा वेलांटी - अच्युत पालव
३) सुंदर अक्षर कसे काढावे - सुभाष जगदाळे - मनोविकास प्रकाशन, पुणे.
४) चित्ररुप अक्षर लेखन - ग. वि. वडेर - कलायतन प्रकाशन, कोल्हापूर
५) अक्षर सौंदर्य निर्मिती आणि इतिहास - विनय सायनकर - फुलराणी प्रकाशन, ठाणे.
६) मराठी हस्ताक्षर दर्शन- लक्ष्मण सखाराम रावले - नवनीत
७) फलक लेखन - म. वि. सोहनी
८) फलक लेखन - भगवान इंगळे- ज्योती प्रकाशन, कारंजा लाड जि. वाशिम
९) Speedball Textbook - Raymond Daboll, Hunt Manu facting co USA
१०) The World of Calligraphy - Achyut R. Palav - Navneet Publication.
११) Aksharakruti - Achyut R. Palav - Navneet Publication.

कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - प्रथम वर्ष

## २. विषय - संकल्पचित्र (Design)

## घटक - कलेचे मूळघटक / व्दिमित व त्रिमित संकल्प

## (Fundamentals of Art / 2D & 3D Design)

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| 05+08+03 | PRACTICAL | -- | 05 | 115 | 100 | H. A. E. |

**प्रस्तावना :-** संकल्पचित्र विषयाचा अभ्यास करीत असताना निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण करणे गरजेचे आहे. तसेच निसर्गात दडलेले कलेचे मूळ घटक शोधून ते मूळ आकार कागदावर दृश्य स्वरूपात मांडणे आवश्यक असते. संकल्परचनेत संयोजनाची गरज असते, त्यादृष्टीने कला इतिहासातील अजरामर कलाकृतिंचे दाखले अभ्यासणे गरजेचे आहे. त्या सोबतच संकल्पाची तत्त्वे व कलेच्या मूळ घटकांची तत्त्वे एकात्मिक मांडणी नैसर्गिक व आलंकारिक घटकांची सांगड घालून सौंदर्यनिर्मिती करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे क्रमप्राप्त ठरते. प्रस्तुत विषयामधून कलाशिक्षक प्रशिक्षणार्थींच्या सृजनात्मक अभिव्यक्तीला चालना देण्यासाठी व वातावरण निर्मिती करून प्रोत्साहन देण्यासाठी संकल्पचित्र विषय महत्त्वाचा ठरतो.

- **उद्दिष्टे :-**

  १) निसर्गात आढळणाऱ्या मूळ घटकांचे निरीक्षण करणे.

  २) कलेचे मूलभूत घटक आणि संकल्पाच्या मूलतत्त्वांची ओळख करुन देणे.

  ३) कलेचे मूळघटक वापरून संकल्परचना तयार करणे.

  ४) मानवनिर्मित व नैसर्गिक घटकांची आलंकारिक रूपात मांडणी करुन नवनिर्मिती करणे.

  ५) नैसर्गिक घटकांच्या आकारांचे रूपांतरण करुन त्याचा संकल्परचनेत वापर करणे.

  ६) सृजनात्मक अभिव्यक्तिला संधी देवून सौंदर्यदृष्टी विकसित करणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**

  **१) अ) कलेचे मूळघटक :-**

  - रेषा, आकार, रंग, छायाभेद, पोत या मूळघटकांचा अभ्यास व सराव.

  **ब) कलेची / संकल्पाची / रचनेची मूलतत्त्वे (Principles of Organisation) :-**

  **एकात्मता (Unity)** - १) पूनरावृत्ती (Repetition) २) विविधता (Variety) ३) उत्सर्जन (Radiation) ४) लय (Rhythm) ५) श्रेणीक्रम (Gradation) ६) प्राधान्य गौणत्व (Emphasis and subordination) ७) प्रमाणबध्दता (Proportion) ८) संवाद (Harmony) ९) संतूलन (Balance) १०) विरोध (Contrast) ११) संक्रमण ( रूपांतरीत होणे) (Transition)

**अवकाश विभाजन :-**

- कलेच्या मूलभूत घटकांच्या आधारे अवकाशाचे विभाजन.
- सौंदर्यशास्त्रीय दृष्टिकोनातून आकार व अवकाशाचा अभ्यास.
- व्याप्त आणि अव्याप्त क्षेत्राची विभागणी, समतोल अथवा विषमतोलाधिष्ठित रचना साधणे.
- धन-ऋण अवकाशाचा अभ्यास.

**२) व्दिमित संयोजन -**

- संकल्पाच्या मूलतत्त्वांच्या आधारे चित्रण.
- दूर किंवा जवळचा आभास निर्माण करण्यासाठी विविध छाया-छटांची संकल्परचना.
- संकल्पन करताना आकाराचा अंश किंवा अंशाच्छादन रूपाने वापर.
- आकार-आकारमानातील बदल विविधतेचा परिणाम साधण्यासाठी वापर.
- पेन्सिल माध्यमातून (कृष्ण-धवल) विविध छटा आणि त्यातून निर्माण होणाऱ्या रंगसंगतीचा अभ्यास.

**नैसर्गिक घटकांचा बाह्याकार -**

- संकल्पाचा घटक म्हणून नैसर्गिक घटकांचे बाह्याकार रुपांतरण.
- लय व विविधता या संयोजन तत्त्वावर आधारित एकात्मिक संकल्प रचनेचा कल्पकतेने आविष्कार.
- संकल्पन करताना आकार अंश किंवा अंशाच्छादन रूपाने वापर.
- आकार-आकारमानातील बदल विविधतेचा परिणाम साधण्यासाठी वापर.
- भौमितिक आकारांचे सुलभीकृत संयोजन.

**चिकट चित्रसंकल्प (Collage) -**

- मासिके अथवा बातमीपत्रांचे रंगीत कागद आवश्यकतेनुसार फाडून, चिकटवून उत्कृष्ट संयोजन.
- विविध वस्तूंची वेष्टणे, आवरणे, वैशिष्ट्यपूर्ण पोत व रंग असलेल्या कागदांचा संकल्पनासाठी वापर.
- कोलाज निर्मितीमध्ये कल्पकता, सृजनशीलता आणि नवनिर्मितीचा परिणाम साधून चित्रण.

**३) त्रिमित संयोजन -**

- आकारांचा त्रिमित भास आणि अवकाशाच्या अमर्याद रूपाचा वापर. आभासी घनाकारांचा संकल्प करून एका रंग संगतीचा वापर.
- आभासी घनाकार अधिक नाविन्यपूर्ण व सृजनशील बनवण्यासाठी पोतनिर्मिती.
- पुनरावृत्ती, आच्छादन, लय इत्यादी संकल्पाची तत्त्वे घनाकारांना पोषक ठरतील अशा पध्दतीने संकल्पन.

- **मार्गदर्शक सूचना :-**

१) स्वाध्यायांमध्ये कलेचे मूळघटक व संकल्पाच्या मूलतत्त्वांचा वापर करणे अपेक्षित आहे.
२) संकल्प चित्रात रंगसंगती, उठाव व पोत विरोध यांचा परिणामकारक वापर अपेक्षित आहे.
३) कोलाज माध्यमातील विविधतेचा (विविध माध्यमे) अनुभव देण्याचा प्रयत्न आवश्यक आहे.
४) एक मुद्रातंत्र, उठाव मुद्रातंत्र यांसारख्या मुद्रातंत्राचा स्वाध्यायात वापर करणे आवश्यक आहे.

**टीप - केवळ द्विमित संकल्परचनेवर आधारित प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येईल.**

**गुणदान योजना :-**

| संकल्प / मांडणी | रंगयोजना | सृजनशीलता / कल्पकता | सादरीकरण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) दृक-कला - मूलतत्त्वे आणि आस्वाद - शांतिनाथ आरवाडे - गो. य. राणे प्रकाशन, पुणे.

२) दृश्यकला - पायाशुध्द अभ्यास - गजानन भागवत - अरविंद देसाई - कलासंचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३) दृककला - मूलतत्त्वे आणि आस्वाद - प्रा. जयप्रकाश जगताप, जगताप प्रकाशन गृह, पुणे

४) चित्रकला तंत्र-मंत्र आणि आस्वाद, मधुकर पातकर, पुणे विद्यापीठ गृह प्रकाशन, पुणे.

५) पोत - द. ग. गोडसे.

६) Understanding of Art - Lots- Fichner-Rathics

७) Meaning Art - Herbert Read

८) Visual Design - Lhillien Gareeti

९) Understanding of Art - Lois Fichner Rathus

१०) Design Basics 2 D & 3 D - Stephen Pentak, Richard Roth, David A. Lauer

११) Foundations of Art & Design - Lois Fichner Rathus

१२) Atr Fundamentals - 3 D total Publishing




कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - प्रथम वर्ष

## ३. विषय - रंग (COLOUR)

### घटक - सैध्दांतिक आणि प्रात्यक्षिक (THEORY & PRACTICAL)

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| 08 | THEORY + PRACTICAL | 04 | -- | 100 | -- | -- |

**प्रस्तावना :-** मानवी जीवनात रंगांचे अनन्यसाधारण महत्व आहे. निसर्गाच्या विविध रुप देखाव्यातून रंगांचे प्राथमिक ज्ञान होत असते. त्यातील रंगछटा मनाला आकर्षित करीत असतात. रंगांची ही विविधता चित्र अभ्यासात महत्वाची आहे. विषयाची परिणामकारकता वाढविण्यासाठी आकर्षक रंगयोजना केली जाते. त्यातील रंगछटा चित्रांना उठाव देतात. विशिष्ट रंगलेपनातून भावभावनांचे प्रकटीकरण होते व ते रसिकांच्या मनाचा ठाव घेण्यास उपयुक्त ठरत असते. या बाबी लक्षात घेवून कला अभ्यासात रंग, रंगमिश्रणे, रंगगुणधर्म व रंग सिध्दांत इत्यादीचे ज्ञान संपादनासाठी सदर विषयाचा अभ्यासक्रमात समावेश केलेला आहे त्यामुळे प्रशिक्षणार्थीमध्ये रंगांचा दृक्परिणाम निर्माण करण्याची क्षमता प्राप्त होईल.

- **उद्दिष्टे :-**

  १) सैध्दांतिक व प्रात्यक्षिक अशा दोन पध्दतींमधून रंगांचा तपशीलवार अभ्यास करणे .

  २) विविध रंग माध्यमांमध्ये प्रयोग करुन रंगाच्या दृक परिणामांचा अनुभव घेणे.

  ३) रंगनाम, रंगछटा, रंगकांती इत्यादी रंगाच्या गुणधर्माचा अभ्यास करणे.

  ४) गरजेनुसार रंगाचा परिणामकारक वापर करणे.

  ५) रंगाचा मानवी भाव-भावनांशी संबंध जोडणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**

  **१) रंगअनुभव - दृक् परिणाम -**

  - प्रकाश म्हणजे काय ?, रंग म्हणजे काय ?, डोळ्याची रचना व कार्ये.
  - रंगाचे गुणधर्म - रंगनाम, रंगछटा, रंगकांती, उजळ-गडद रंगछटा, तटस्थ व करडी मापनपट्टी . उठाव आणि विरोध.
  - **उठाव व विरोध यावर आधारित स्वाध्याय.**

  **२) रंगअनुभव - मूलभूत रंगसिध्दांत (रंगद्रव्य व रंगकिरण) -**

  - प्रथम श्रेणीचे रंग — व्दितीय श्रेणीचे रंग
  - तृतीय श्रेणीचे रंग — चतुर्थ श्रेणीचे रंग
  - माध्यमिक रंग
  - कृष्णधवल रंगछटा — एकरंग छटा
  - **रंगानुभव व मूलभूत रंग सिध्दांत यावर आधारित स्वाध्याय.**

**३) रंगसंगती (रंगसंवाद) -**

- उष्ण व शीत रंगसंवाद — सजातीय रंगसंवाद
- विरोधी रंगसंगती — दुहेरी विरोधी रंगसंगती
- विभक्त विरोधी रंगसंगती — दुहेरी विभक्त विरोधी रंगसंगती
- **रंगसंगतीवर आधारित स्वाध्याय.**

**४) रंगांचे इतर गुणधर्म -**

- विलंबित प्रतिमा, परस्पर विरोधाभास, आक्रमक, अनाक्रमक आणि तटस्थ रंग, रंगाचे दृश्यमिश्रण रंगाचा प्रतिकात्मक अर्थ.
- रंगलेपनाच्या विविध पध्दतींचा अनुभव .सपाट रंगपटल, खंडित रंगपटल, अंशाच्छादित रंगपटल, श्रेणीक्रमीत रंगपटल, प्रवाही रंगपटल जाड रंगलेपन, रंग, रंगकांड्या, वॉटरप्रुफ इंक, पेन्सिल व इतर रंगमाध्यमे, पारंपरिक रंग बनविण्याच्या पध्दतींचा अभ्यास.

- **मार्गदर्शक सूचना :-**
  १) शिक्षकाने पारदार्शीका व (PPT) यांसारख्या आधुनिक शैक्षणिक साधनांचा उपयोग करावा.
  २) विषयाशी निगडीत स्वाध्याय विद्यार्थ्यांना प्रदर्शित करणे अपेक्षित आहे.
  **३) पाठ्यक्रमावर आधारित प्रात्यक्षिक विषयांकरीता स्वाध्याय घेणे आवश्यक आहे.**

**गुणदान योजना :-**

| रंगयोजना | रंगलेपन | संकल्प/मांडणी | सादरीकरण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) दृक-कला - मूलतत्त्वे आणि आस्वाद - शांतिनाथ आरवाडे - गो. य. राणे प्रकाशन, पुणे.
२) रंग सिंध्दांत - प्रा. जयप्रकाश जगताप - जगताप पब्लिशिंग हाऊस, पुणे.
३) दृश्यकला - पायाशुध्द अभ्यास - गजानन भागवत - अरविंद देसाई - कलासंचालनालय महा.राज्य, मुंबई
४) Visual Studies - Frank M.Young -- Prentice Hall Englewood Cliffs New Jersey
५) The Colour Source Book For Graphic Designers - Sadao Nakamuora, Japan
६) Interaction of Color - Josep Albers
७) Color - Betty Edwards
८) Color Theory - Patti Mollica

*बौद्धिक क्षेत्रातील कौशल्यांप्रमाणेच भावनिक आणि क्रियात्मक क्षेत्रांतील कौशल्येही शिकणे आणि शिकत राहणे महत्त्वाचे आहे. श्रमांशी आणि कलांशी निगडित बोधात्मक, भावनिक आणि शारीरिक क्षमतांचा विकास कायमस्वरूपी घडत राहावा यासाठीही विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.*

(पान क्र. १४) ***राज्य अभ्यासक्रम आराखडा -२०१०***

कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - प्रथम वर्ष

## ४. विषय - कार्यानुभव (Work Experience)

**घटक - अ) मातकाम (Clay work) ब) कागद व पुठ्ठाकाम (Paper & Cardboard work)**

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| a) 10 | PRACTICAL | -- | 05 | 60 | 50 | External |
| b) 10 | PRACTICAL | -- | 05 | 60 | 50 | External |

**प्रस्तावना :-** शालेय शिक्षणातील कार्यानुभव विषयाचा विचार करता प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाला सदर विषयाचा मूलभूत अभ्यासक्रम उपयोगी पडणार आहे. शिल्पकामाचा पाया म्हणून मातकाम ओळखले जाते. कागद, पुठ्ठाकामातून शैक्षणिक साहित्य निर्मिती, पिशवी, आकाश कंदील, मखर इत्यादी कलात्मक व पर्यावरणपूरक घटकांची निर्मिती करता येणार आहे. प्रस्तुत विषयाच्या अभ्यासातून प्रशिक्षणार्थीला साधन-साहित्य वापरण्याचे योग्य कौशल्य तसेच हस्तकौशल्य प्राप्त होणार आहे. कल्पनाशक्ती व सौंदर्यदृष्टीचा विकास होण्याबरोबरच त्याचा व्यावसायिक दृष्टिकोन विकसित होण्यास चालना मिळणार आहे.

- **उद्दिष्टे : -**

१. शालेय अभ्यासक्रम व अभ्यासेत्तर उपकमांची कार्यानुभवाशी सांगड घालण्यासाठी मदत करणे.
२. हस्तकौशल्य आणि श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व पटवून देणे.
३. विविध साधन साहित्याचा कौशल्यपूर्ण वापर करण्याची क्षमता निर्माण करणे.
४. निर्मिती तंत्राद्वारे कल्पनाशक्तीचा विकास घडवून आणणे.
५. समाजातील उद्योगमूलक कार्याची ओळख करुन घेण्याची संधी प्राप्त करुन देणे.
६. विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण करणे.
७. नवनिर्मिती व स्वनिर्मितीचा आनंद मिळविणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**

**अ) मातकाम (Clay work) -**

- मातीचे विविध प्रकार.
- मातकामासाठी योग्य माती तयार करण्याची पध्दती.
- मातकामासाठी उपयुक्त साधन - साहित्याची ओळख व माहिती.
- मूलभूत घनाकार व लादी (Slab) निर्मिती.
- मणी, माळा निर्मिती.
- घनाकारावर आधारित फळे, फळभाज्या, भांडी, खेळणी व अन्य वस्तू निर्मिती.
- लादीवरील उठावशिल्प (अधिक पध्दत) - पक्षी, प्राणी, नाणे, अक्षरे, प्रतिके, मुद्रा इत्यादी.

- लादीवरील कोरीव शिल्प (उणे पध्दत) - भौमितिक आकार, रचना इत्यादी.
- प्राणी, पक्षी इत्यादींचे मुखवटे तयार करणे.
- मातीकामातून वस्तूची सजावट (नक्षीकाम).
- गोल (Round) शिल्पकृती निर्मिती.
- साचा तयार करून शिल्प निर्मिती.
- खडू, साबण, प्ले- क्ले, सिरॅमिक, कोरेक्स यांसारख्या व अन्य पर्यायी माध्यमांपासून शिल्प निर्मिती.

**गुणदान योजना :-**

| माध्यमाची हाताळणी | सजावटीतील कौशल्य | प्रमाणबध्दता | सादरीकरण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**ब) कागदकाम व पुठ्ठाकाम (Paper & Cardboard work) -**

- विविध प्रकारचे कागद, कार्डशीट इत्यादींची ओळख व माहिती.
- कागदकामासाठी उपयुक्त साधन - साहित्याचा परिचय.
- कागद/कार्डशीट मधून मूलभूत आकार कापणे व चिकटवणे.
- विविध आकार व प्रकारातील पाकिटे.
- पुठ्ठा / कागदी खोकी वापरून खेळणी, बाहुली, प्राणी, पक्षी, झाडे इत्यादींच्या प्रतिकृती.
- आकाशकंदील, मिठाई बॉक्स, मखर, पिशवी, पर्स, फुलदाणी निर्मिती व सजावट इत्यादी.
- रंगीत कागदांची विविध फुले, हार, नक्षीदार तोरण, दागिने (Jewellery), शोभेच्या वस्तू इत्यादींची पेपर क्विलिंग तंत्राद्वारे निर्मिती.
- लेटर हेड, वही फाईल, अल्बम निर्मिती.
- शिलाईचे प्रकार व बाईडिंगचे प्रकार जाणून घेणे.
- पेपर मॅशे व कागदी लगद्यापासून वस्तू निर्मिती .

- **मार्गदर्शक सूचना :-**

१) परिसरातील उपलब्ध मातीचा प्राधान्याने वापर करावा.

२) पर्यावरणपूरक माध्यमाचा प्राधान्याने विचार करावा.

३) रद्दी कागद व निरुपयोगी रिकामी खोकी, कागदी वेस्टने, आवरणे, यांसारख्या टाकाऊ व निरुपयोगी वस्तूंचा वापर करता येईल.

४) तयार केलेली शिल्पे, वस्तू योग्य प्रकारे रंगविणे व सजावट करणे अपेक्षित आहे.

**५) कलाकृतींची छायाचित्रे पोर्टफोलीओमध्ये जमा करून त्यावर विषय शिक्षकाची स्वाक्षरी घ्यावी.**

६) पेपर क्विलिंग पध्दतीद्वारे शोभेच्या वस्तुनिर्मिती व सजावट करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देता येईल.

७) मातकाम व कागदकामातून तयार झालेल्या वस्तूंची प्रदर्शनी आयोजित करून व्यावसायिक दृष्टिकोन विकसित करता येईल.

**गुणदान योजना :-**

| माध्यमाची हाताळणी | सजावटीतील कौशल्य | कल्पकता | प्रमाणबध्दता | सादरीकरण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) मातीची शिल्पे व कलाकुसर निर्मिती. - अ. दि. कोकड - सन् पब्लिकेशन, पुणे.

२) कागद व कलाकुसर भाग १ ते ३ - अ. दि. कोकड - सन् पब्लिकेशन, पुणे.

३) निरुपयोगी वस्तूंपासून कलाकुसर - अ. दि. कोकड - सन् पब्लिकेशन, पुणे.

४) आर्ट ॲन्ड क्राफ्ट -मेधा सुदुंबरेकर, ज्योत्स्ना प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे-३०

५) उपयुक्त कला छंद - प्रतिभा काळे - रोहन प्रकाशन, ३९६ ब, नारायणपेठ, पुणे.

६) शिका कागदी फुले - मुकुंद वेताळ - गमभन प्रकाशन, शनिवारपेठ, पुणे.

७) कार्यानुभव हस्तपुस्तिका (इयत्ता १ ते ८) म. रा. पाठ्यपुस्तक व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - प्रथम वर्ष

## ५. विषय - सैध्दांतिक (THEORY)

### घटक - भारतीय इतिहास (कला व संस्कृती ) Indian History ( Art & Culture)

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| -- | THEORY | 04 | 03 | 80 | 100 | H. A. E. |

**प्रस्तावना :-** कला शिक्षणात भारतीय कला संस्कृती, परंपरा, विविध कलाशैली, कलावंत व त्यांच्या कलाकृतींचा अभ्यास करणे महत्त्वाचा आहे. तो विद्यार्थ्यात संक्रमित करण्याची क्षमता स्वत:त निर्माण करणे व रसिकतेसह सौंदर्याची जाण वाढविण्याची संधी याद्वारे प्राप्त होणार आहे. मानव व निसर्गनिर्मित कलात्मक स्थळांचे जतन व संवर्धन करण्याची दृष्टी व त्याचप्रमाणे कलात्मक रसग्रहण करता येईल अशी क्षमता निर्माण होणार आहे. तसेच कला रसिकतेसह कला सौंदर्याची जाणीव विद्यार्थ्यात निर्माण होईल अशी संधी प्राप्त करता येईल. कलासंस्कृतीची माहिती आत्मसात करण्याबरोबरच कला इतिहास समजून घेणे हे देखील महत्त्वाचे ठरणार आहे.

- **उद्दिष्टे :-**
  १) भारतीय कला, परंपरा आणि कलावंत यांचे महत्त्व जाणून अभ्यास करण्याची संधी उपलब्ध करुन देणे.
  २) विद्यार्थ्यांची सौंदर्याभिरुची, रसास्वाद इत्यादी सृजनात्मक गुणांचा विकास घडवून आणणे.
  ३) क्षेत्रभेटीद्वारे नैसर्गिक, ऐतिहासिक, कलात्मक वारसा स्थळांचे निरीक्षण व अभ्यास करण्याची संधी उपलब्ध करुन देणे.
  ४) विविध ऐतिहासिक, नैसर्गिक स्थळे, वास्तू, शिल्पकृती, कलाकृती इत्यादिंचे संरक्षण व संवर्धनाचे महत्त्व पटवून देणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**

**भारतीय कला -**

**अ) प्रागैतिहासिक कालखंड**

**प्रकरण - १. अश्मयुगीन कला, भिमबेटका व ठळक वैशिष्ट्ये**

**ब) प्राचीन कालखंड**

**प्रकरण -२. सिंधु संस्कृती.**

- शिल्प - दाढीवाला पुरुष, पुरुष कबंधमूर्ती, नर्तिका, मातृदेवता, मुद्रा.
- स्थापत्य - नगररचना, सार्वजनिक इमारती.
- चित्र - मृत्तिकापात्र कला.

**प्रकरण -३. मौर्य कला व ठळक वैशिष्ट्ये**

- शिल्प :- दीदारगंज - यक्षिणी, परखम - यक्ष, सारनाथ - सिंहस्तंभशीर्ष.
- स्थापत्य - लोमष ऋषीची गुहा.

**प्रकरण -४. शुंग व कण्व कला ठळक वैशिष्ट्ये**

- शिल्प - शालभंजिका, मृगजातक.
- स्थापत्य- कार्ले-भाजे-चैत्य व स्तूप, सांचीचा - महास्तूप.

**प्रकरण -५. कुशाण कला व ठळक वैशिष्ट्ये**

- शिल्प- १) गांधार शैली :- बामियान बुद्ध
  २) मथुरा शैली :- कनिष्काचा पुतळा
  ३) गांधार व मथुरा शिल्पशैलीतील साम्य-भेद.

**प्रकरण -६. गुप्त कालीन कला व ठळक वैशिष्ट्ये**

- शिल्प- सारनाथ येथील बसलेला बुद्ध, मथुरा येथील उभा बुद्ध.
- स्थापत्य- देवगड येथील विष्णुमंदिर.
- चित्र - अजिंठा येथील भित्तिचित्रे, तंत्र-शैली, विषय पद्मपाणि बोधिसत्त्व, आकाश-संचारी गंधर्व.

## क) मध्ययुगीन कालखंड

**प्रकरण - ७. मध्ययुगीन कला व ठळक वैशिष्ट्ये**

- शिल्प - गंगावतरण -महाबलीपूरम, नटराज -तंजावर, कैलास पर्वत हलविताना-वेरूळ
- स्थापत्य - पंचरथ मंदिरे - महाबलीपूरम, दुर्गा मंदिर - अहिहोळ, गुहामंदिरे-बदामी विरूपाक्ष मंदिर - पट्टदकल, महेशमूर्ती -घारापुरी, कैलास मंदिर - वेरूळ, कंदरीय महादेव मंदिर - खजुराहो, सूर्यमंदिर - कोणार्क, दिलवाडा मंदिर - माऊंट अबू.

**प्रकरण- ८. इस्लामी वास्तूकला व ठळक वैशिष्ट्ये**

- दिल्ली - कुतूब मिनार, विजापूर - गोल घुमट, फत्तेहपूर सिक्री - बुलंद दरवाजा, आग्रा - ताजमहाल - जागतिक वारसा व महत्त्व.

**प्रकरण - ९. लघुचित्रशैली-**

- पाल व जैन लघुचित्रकला, राजस्थानी लघुचित्रकला, मोगल लघुचित्रकला, पहाडी लघुचित्रकला

## ड) आधुनिक कालखंड

**प्रकरण - १०. आधुनिक कला -**

- पाश्चिमात्य प्रभावाखालील कलाशैली -- राजा रविवर्मा, आबालाल रहेमान, रावबहाद्दूर, एम. व्ही. धुरंधर, बाबुराव पेंटर, गणतपराव म्हात्रे, विनायक पांडुरंग करमरकर, एस. एल. हळदणकर, गोपाळ देऊस्कर.

**इ) समकालीन कला**

- भारतीय पुनरुज्जीवनवादी चळवळ - बंगाल स्कूल - ठळक वैशिष्ट्ये व कलावंत.
- समकालीन कलावंत व कला चळवळ - अमृता शेरगील, नारायण श्रीधर बेन्द्रे, के. के. हेब्बर, विनायक मासोजी, व्ही. एस. गायतोंडे, बाबुराव सडवेलकर, ए. ए. अलमेलकर, एम. एफ. हुसेन, शंकर पळशीकर, ए. ए. रायबा, कृष्णा रेड्डी, गणपतराव वडणगेकर, चार्ल्स कोरीया, अंबादास, प्रभाकर बर्वे, प्रभाकर कोलते, राम सुतार, डॉ. सुधीर पटवर्धन, अतुल डोडीया, कोची मुझरिस बिनाले, शिवाजी तुपे, अनिष कपूर, भारत भवन.
- प्रोग्रेसिव्ह आर्टिस्टस् ग्रुप :- ठळक वैशिष्ट्ये व कलावंत.

**प्रकरण - ११. महाराष्ट्रातील लोकसंस्कृती -**

१) वारली चित्रकला- आदिवासी कलेचे कलात्मक महत्त्व (जिव्या सोमा म्हसे)

२) चित्रकथी, गंजिफा, पिंगुळी चित्रपरंपरा.

**प्रकरण - १२. रसग्रहणात्मक अभ्यास -**

१) नर्तिका - सिंधू संस्कृती, २) दिदारगंज - यक्षिणी, ३) महास्तूप - सांची, ४) पद्मपाणि बोधिसत्व - अजिंठा, ५) गंगावतरण-महाबलीपूरम, ६) कैलास पर्वत हलविताना - वेरूळ, ७) कंदरीय महादेव मंदिर - खजुराहो, ८) ताजमहाल - आग्रा, ९) बनीठणी - किशन गड, १०) निरांजनी - एस. एल. हळदणकर, ११) मंदिराकडे - रावबहादूर म्हात्रे, १२) वॉर ॲन्ड पीस - एम. एफ. हुसेन, १३) पोखरण - डॉ. सुधीर पटवर्धन, १४) निळे ढग - प्रभाकर बर्वे, १५) वारली चित्र - जिव्या सोमा म्हसे.

- **मार्गदर्शक सूचना : -**

१) शिक्षकाने वेगवेगळ्या कालखंडातील उद्‌दिष्टे, माध्यम शैली यांत उत्तरोत्तर होत गेलेल्या बदलांची विद्यार्थ्यांना जाणीव करुन देणे अपेक्षित आहे.

२) विषयाशी संबंधित संदर्भ पुस्तके, पारदर्शिका, प्रतिकृती तसेच पी.पी.टी., सीडी, इंटरनेट यांसारख्या आधुनिक व अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करणे अपेक्षित आहे.

३) उत्तर लेखन करताना समर्पक आकृत्या काढण्यास विद्यार्थ्यांना प्रवृत्त करण्यात यावे.

४) नव्याने उत्खननात सापडलेल्यांची माहिती संकलित करणे व चर्चा करण्यास प्रोत्साहित करावे.

**महत्त्वाची टीप :- परीक्षेत रसग्रहणासाठी कोणत्याही एका कृष्णधवल किंवा रंगीत कलाकृतीचा छापील नमुना दिला जाईल. रसग्रहणाचा हा प्रश्न अनिवार्य राहील.**

**गुणदान योजना :-**

| विषयाची समर्पक माहिती | सुयोग्य मांडणी/ रसग्रहण | आकृती | एकूण गुण |
|---|---|---|---|
| | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) प्राचीन भारतीय कला - डॉ. म. श्री. माटे, कॉन्टिनेटल प्रकाशन, मुंबई.

२) मध्ययुगीन कला भारती - डॉ. म. श्री. माटे.

३) ललित कला अकादमी, नवी दिल्ली, समकालीन कला प्रकाशने.

४) महान भारतीय कलावंत - प्रा. सुभाष पवार.

५) महाराष्ट्रातील कलावंत - बाबुराव सडवेलकर.

६) शिल्पचित्रकार चरित्र कोष - सुहास बहुलकर, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

७) भारतीय कलेचा इतिहास - प्रा.जयप्रकाश जगताप, जगताप प्रकाशन, पुणे.

८) महाराष्ट्रातील अदिवासी कला - डॉ.गोविंद गारे /उत्तमराव सोनवणे. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था प्रकाशन.

९) महाराष्ट्रातील लोकसंस्कृतीचे उपासक - डॉ. रा. चिं. ढेरे.

१०) कलेचा इतिहास व रसग्रहण - कलाशिक्षक हस्तपुस्तिका (इयत्ता १२ वी) - एच. एस. सी. बोर्ड, पुणे.

११) कलास्वाद इ संभाजी कदम.

१२) वारली चित्र संस्कृती - डॉ. गोविंद गारे, श्री विद्या प्रकाशन.

१३) प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट ग्रुप - ज्ञानेश्वर नाडकर्णी, ग्रंथाली ज्ञानयज्ञ, मुंबई.

१४) लेणी महाराष्ट्राची - दाऊद दळवी, ग्रंथाली ज्ञानयज्ञ, मुंबई.

१५) वाचू आनंदे, भाग १ ते ४, संपादन-माधुरी पुरंदरे.

१६) चित्रकथी - व्यंकटेश माडगुळकर, पद्मगंथा प्रकाशन, पुणे.

१७) कलामहर्षी बाबुराव पेंटर - ग. र. भिडे / बाबा गजबर, मीनल प्रकाशन, कोल्हापूर.

१८) The Consize History of Indian Art - Roy C.Craven, Thomes and Hudson Ltd. London

१९) History of Art in India and West - Edith Tomory

२०) Indian Architecture - Percy Brown, Taraporwala Publication, Mumbai

२१) Painted World of Warlis - Yashodhara Dalmiya

२२) Indian contemporary painting-Naville Tuli - Mapin publishing pvt.Ltd.

२३) The Painter in Ancient India-C.Sivaramamurti - Abhinav Publishing, New Delhi

२४) Pre-historic Rock Painting of Bhimbetka-Yashodhara Mathpal - Abhinav Publishions, New Delhi

१९) Indian Sculpture-Mohinder Singh Randhawa - Vakils Feffer and Simons Ltd, Bombay

२०) A History of Fine Art in India and Ceylon-Vincent A Smith - D. B. Taraporevala Sons & Com. Bombay

कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - प्रथम वर्ष

## ५. विषय - सैध्दांतिक (THEORY)

### घटक - शैक्षणिक मानसशास्त्र व बालकला (Educational Psychology & Child Art)

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| -- | THEORY | 04 | 03 | 80 | 100 | H. A. E. |

**प्रस्तावना :-** शैक्षणिक मानसशास्त्र म्हणजे मानवी विकास, प्रेरणा, अध्ययन -अध्यापन, मूल्यमापन या क्षेत्रात अधिक सुधारणा करण्यासाठी केलेले संशोधन होय. बालकांच्या सुप्त गुणांचा विकास होऊन सक्षम होण्यासाठी ज्या ज्या गोष्टींचा अवलंब करणे गरजेचे असते त्यासाठी प्रशिक्षणार्थींना शैक्षणिक मानसशास्त्राची आवश्यकता आहे. बाल मानसशास्त्र व वाढत्या वयाच्या मुलांची मनोवृत्ती, शारीरिक विकास, क्षमता व अध्ययन पध्दतीचा अभ्यास यावर भर दिला आहे. शिक्षण प्रक्रिया व बालकांच्या विकासातील शिक्षकाची भूमिका या अभ्यासक्रमाद्वारे समजावून दिली जाणार आहे.

यावरोबरच कलाशिक्षक म्हणून बालकांच्या आविष्काराचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. बालकांचा शारीरिक व मानसिक विकास त्यांच्या चित्रकृती, शिल्पकृती, नृत्य, नाट्य, संगीत या कलांतून प्रतीत होतो. बालकांच्या व्यक्तिविकासाचे एक साधन म्हणून बालकलेला शिक्षण प्रक्रियेत मोठे स्थान आहे. त्याचा विचार या अभ्यासक्रमातून होणारआहे.

- **उद्दिष्टे :-**

  १. शिक्षणप्रक्रियेत मानसशास्त्राचे महत्त्व अभ्यासण्याची संधी उपलब्ध करून देणे.

  २. अध्यापनावर परिणाम करणाऱ्या मानसशास्त्रीय घटकांचा अभ्यास करणे.

  ३. अध्ययन व अध्यापन सूत्रे परस्पर संबंध याविषयी माहिती देणे.

  ४. बालकांच्या विविध अवस्थांचा अभ्यास करणे.

  ५. बालकांच्या सर्वांगीण विकासातील शिक्षकाची भूमिका समजावून देणे.

  ६. बालकलेतील वैशिष्ट्ये समजून घेणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**

**प्रकरण १. मानसशास्त्र- स्वरूप व व्याप्ती**

- व्याख्या
- अध्ययन, अध्यापन प्रक्रियेशी मानसशास्त्राचा संबंध.
- शिक्षकाला मानसशास्त्राच्या अभ्यासाची गरज.
- वर्तन अभ्यासाच्या पध्दती.

१. निरीक्षण २. प्रायोगिक ३. सर्वेक्षण ४. जीवनवृतांत ५. आत्मनिरीक्षण.



एन २२३--६

**प्रकरण २. वाढ आणि विकास**

- शैशवावस्था, बाल्यावस्था, किशोरावस्था व कुमारावस्था.
- शारीरिक, बौध्दिक, मानसिक, भावनिक विकासावर परिणाम करणारे घटक.
- अनुवंशीकता व परिस्थिती.
- बालकाचे वर्तन, गरजा, प्रेरणा आणि सर्जनशीलता.
- सहजप्रवृत्ती आणि सामान्य प्रवृत्ती.
- अवधान प्रेरण आणि प्रलोभन.
- जीवन कौशल्ये.

**प्रकारण ३. शिक्षण प्रक्रिया - अर्थ, संबोध, स्वरूप**

- व्याख्या.
- शिक्षणाचे प्रकार - औपचारिक अनौपचारिक.
- शिक्षणाचे सामाजिक स्वरूप व गरज.

**प्रकारण ४. अध्ययन व अध्यापन**

- व्याख्या, स्वरूप, प्रकार व उपपत्ती.
- अध्यापनाची सूत्रे -शैक्षणिक महत्त्व.
- अध्ययन संक्रमण उपपत्ती

**प्रकारण ५. अध्ययनावर परिणाम करणारे घटक**

- परिसर
- मानसिक प्रक्रिया - संवेदना, अवबोधन, प्रतिमा, कल्पना, विचार, स्मरण, विस्मरण, अवधान, अभिरुची, भावनिक संतुलन, थकवा.

**प्रकारण ६. सूक्ष्म अध्यापन**

- अध्यापन कौशल्ये.
- सूक्ष्म अध्यापनाचे फायदे व मर्यादा.

**प्रकारण ७. बालकला**

- बालकलेची वैशिष्ट्ये.
- कृतिद्वारा शिक्षण.

**प्रकारण ८. संकीर्ण टिपा**

- आदर्श कलाशिक्षक.
- बालस्नेही व तंत्रस्नेही कलाशिक्षक.
- आदर्श कलावर्ग.
- चित्रशिल्प कोपरा, कला प्रदर्शन मांडणी व रचनेचे स्वरूप.
- कलाशिक्षकाने ठेवावयाची नोंदपत्रके.

- **मार्गदर्शक सूचना :-**

१) विद्यार्थ्यांच्या बदलत्या अवस्था व क्षमतेनुसार प्रशिक्षणार्थींना ज्ञान देणे अपेक्षित आहे.

२) बालकला व बालमानसशास्त्र विषयातील विविधता याचे उदाहरणांसह अध्यापन गरजेचे आहे.

३) परिसरातील अनाथालय, वृध्दाश्रम, विशेष शाळा अशा ठिकाणी प्रशिक्षणार्थींची क्षेत्रभेट घडवून आणता येईल.

४) परिसरातील शाळांमधील प्रदर्शन व इतर विशेष उपक्रमांना भेटी देता येतील.

५) मुद्दा क्र. ३ व ४ नुसार सदर भेटीचा अहवाल/वृतांत सादर करण्यासाठी प्रवृत्त करता येईल.

**गुणदान योजना :-**

| विषयज्ञान | आकलन | मुद्देसूद लेखन | एकूण गुण |
|---|---|---|---|
| | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) शालेय कलाशिक्षण - प्रा. श्रीधर शहाणे - गांगल पब्लिकेशन, मुंबई

२) शैक्षणिक मानसशास्त्र व शिक्षणशास्त्र - प्रा. जे. के. बोरले , उषा प्रकाशन, औरंगाबाद.

३) शिक्षक प्रशिक्षण - डॉ. वासंती फडके - गांगल पब्लिकेशन, मुंबई.



कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - प्रथम वर्ष

## ५. विषय - सैध्दांतिक (THEORY)

### घटक - भाषा अध्यापनशास्त्र (Language Teaching Methodology)

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| -- | THEORY | 04 | 03 | 70 | 100 | INTERNAL EXAM |

**प्रस्तावना :-** कोणतीही भाषा मानवी भावनेच्या आदान-प्रदानाचे व माहिती संक्रमणाचे एक महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे भाषेवर प्रभुत्त्व मिळविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. श्रवण, भाषण, वाचन, लेखन ही भाषेतील मूलभूत कौशल्ये आहेत. अभिव्यक्तीसाठी भाषा पूरक आहे. त्याकरिता भाषिक क्षमतेच्या कक्षा रूंदावणे व त्यांचा विकास घडवून आणणे महत्त्वाचे ठरते.

यादृष्टीने प्रस्तुत अभ्यासक्रमाचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. भाषा विषयाची अध्यापन पध्दती, तंत्रे, भाषा विषयाची क्षेत्रे व क्षमता, विविध साहित्य प्रकारांची ओळख या अभ्यासक्रमातून करून दिली आहे. प्रशिक्षणार्थींमध्ये या विषयाच्या अभ्यासातून बौध्दिक, वैचारिक, भावनिक, सांस्कृतिक, कलात्मक दृष्टी व सामाजिक, सृजनात्मक गुणांची वाढ होऊन एक समृध्द शिक्षक होण्यास मदत होणार आहे. भाषा समृध्द असेल तरअध्यापनही अधिक खुलणार आहे. प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाने कलेबरोबर भाषा अध्यापनाचा अभ्यास केल्याने त्याची वैचारिक बैठक तयार होऊन सौंदर्यदृष्टी, रसिकता, सहृदयता, बहुश्रुतता इत्यादी अंगे विकसित होतील. बहुआयामी कलाशिक्षक म्हणून सुयोग्य, रंजक व प्रभावी वर्ग अध्यापनास भाषा अध्यापनशास्त्र विषयाचा अभ्यास पूरक ठरेल.

- **उद्‌दिष्टे :-**

  १. श्रवण, वाचन, लेखन, संभाषण कौशल्याचा विकास करणे.

  २. भाषेद्वारे व्यक्तिमत्त्व विकास घडवून आणणे.

  ३. शालेय स्तरावरील भाषा विषयांचे महत्त्व समजून घेणे.

  ४. सृजनशीलतेचा विकास करण्यासाठी प्रवृत्त करणे.

  ५. मातृभाषा संवर्धन करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

  ६. विविध साहित्य प्रकारांचा अभ्यास करण्याची संधी उपलब्ध करून देणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**

**प्रकरण १. भाषेचे जीवनातील स्थान व महत्त्व -**

- भाषेचे जीवनातील स्थान, महत्त्व, सांस्कृतिक, वैज्ञानिक, औद्योगिक इत्यादी विविध अंगांचे प्रगतीतील महत्त्व.
- भाषेच्या अभ्यासक्रमातील प्रमाण भाषा परिचय करून घेणे, माध्यम म्हणून अन्य विषयांच्या अभ्यासक्रमातील महत्त्व जाणून घेणे.

**प्रकरण २. भाषा विषयाची क्षेत्रे व क्षमता -**

- **श्रवण -** महत्त्व व उद्दिष्टे, सहेतुक श्रवण, श्रवणासंबंधी शिष्टाचार , श्रवण दोष व उपाय, उपक्रम, मूल्यमापन (अध्ययन व अनुभव).
- **भाषण -** महत्त्व व उद्‌दिष्टे, भाषण क्षेत्रातील क्षमता, भाषणाचे प्रकार, भाषणदोष व उपाय, उपक्रम, मूल्यमापन (अध्ययन व अनुभव).
- **लेखन -** महत्त्व व उद्‌दिष्टे, वाचन क्षमता, प्रकार व पध्दती, वाचन दोष व उपाय, वाचना संबंधी उपक्रम, लेखन मूल्यमापन (अध्ययन व अनुभव).
- **अन्य क्षेत्रे व क्षमता -** आकलन, कार्यात्मक व्याकरण, शब्द संपत्तीवर प्रभुत्त्व.

**प्रकरण ३. साहित्य प्रकारांचा आस्वाद -**

- विविध साहित्य प्रकारांची ओळख.
  गद्य- आत्मचरित्र, कथा, कादंबरी, निबंध, प्रवास वर्णन, नाटक (एकांकिका)
  पद्य - भावगीते, भक्तीगीते, कविता, लोकगीते, अभंग, शाहिरी (पोवाडे), स्त्री-गीते.
- विविध लेखक , कवी, नाटककार यांची माहिती व लेखन साहित्य -
  वि. स. खांडेकर, कुसुमाग्रज, पु. ल. देशपांडे, दुर्गा भागवत, शिवाजी सावंत, बहिणाबाई चौधरी, शांता शेळके, शंकर पाटील, व. पु. काळे, राजनखान, वसंत बापट, जी. ए. कुलकर्णी, विजय तेंडुलकर, अरूणा ढेरे, अण्णाभाऊ साठे, रत्नाकर मतकरी, भालचंद्र नेमाडे, फादर फ्रांसिस दिब्रिटो, ना. धो. महानोर, डॉ. विठ्ठल वाघ इत्यादी.

**प्रकरण ४. भाषा -अध्ययन-अध्यापन पध्दती, तंत्रे, नियोजन व मूल्यमापन -**

- अध्यापन पध्दती, तंत्रे आणि संकल्पना व त्यातील फरक.
- अध्यापनाच्या विविध पध्दती -
  कथन, नाट्यीकरण, भूमिका अभिनय, सहयोगी अध्यापन पध्दती, उद्‌गामी, अवगामी, सहकार्यात्मक अध्ययन, आशययुक्त, कृतियुक्त अध्यापन पध्दती, सर्वसमावेशक इत्यादी
- अध्यापन तंत्रे - भाषिक खेळ, कोडी, प्रश्नमंजुषा, अनुवाचन, अनुलेखन, प्रश्नोत्तरे.
- नियोजन व मूल्यमापन - नियोजनाची संकल्पना, वार्षिक / मासिक / घटक / पाठ / चाचणी परीक्षा - नियोजनाची गरज व महत्त्व, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन.

**प्रकरण ५. अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तक यांचा सहसंबंध व मार्गदर्शक शैक्षणिक साहित्य -**

- भाषेची संरचना स्पष्ट करणे.
- अभ्यासक्रम, पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तक यांच्या सहसंबधाचा अभ्यास.
- मार्गदर्शक शैक्षणिक साहित्याचे विविध प्रकार.
  (भाषिक खेळ, शब्द, वाचन पट्ट्या, चित्रपट्ट्या, दृक-श्राव्य साधने, प्रोजेक्टर, स्लाईड शो, पी. पी. टी., यू-ट्यूब, ब्लॉग, ॲप्स, वर्तमान पत्रे, शब्दकोश, बालमासिके इत्यादी.)
- शैक्षणिक साहित्याच्या विकसनाची तत्त्वे, स्तर, पायऱ्या व वापर.

**प्रकरण ६. शिक्षकांची भूमिका व वैशिष्ट्ये -**

- भाषा शिक्षकाचे गुण- शुध्द वाणी, भाषा प्रभुत्त्व, शुध्द लेखन, अद्ययावत ज्ञान, रसिकता, नवनिर्माण क्षमता, अभिनय क्षमता, प्रभावी वक्तृत्त्व, भाषेबद्दल अभिमान, इतर भाषांचा परिचय.
- भाषा शिक्षक उपक्रम, चर्चासत्रे, कृतिसत्रे, उजळणी, भूमिकाभिनय, सूत्रसंचालन, लेखनाचा अभ्यास, शालेय कार्यक्रम, भाषा अभ्यासमंडळ.

- **मार्गदर्शक सूचना :-**

१) प्राथमिक शिक्षणातील भाषा विषयाच्या अभ्यासक्रमाचे अवलोकन करणे आवश्यक आहे.

२) भाषा विषयाच्या अनुषंगाने कला व कार्यानुभव विषयाशी सहसंबंध जोडणे अपेक्षित आहे.

३) भाषा अध्यापनाचा ' कलाभिव्यक्ती ' घटकातील सादरीकरणासाठी कौशल्यपूर्ण वापर करता येईल.

**टीप : भाषा अध्यापनशास्त्र विषयाची १०० गुणांची अंतर्गत परीक्षा महाविद्यालया मार्फत घेण्यात यावी.**

**गुणदान योजना :-**

| व्याकरण / शुध्द लेखन | विषयाची समर्पक माहिती | लेखन शैली | एकूण गुण |
|---|---|---|---|
| | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


- भाषा आणि संस्कृती - ना. गो. कालेलकर - मौज प्रकाशन, पुणे.
- अध्यापनशास्त्र आणि पद्धती, म. बा. कुंडले, व्हीनस प्रकाशन, पुणे.
- भाषा विषयाचे अध्ययन-अध्यापनशास्त्र, संपादक डॉ. व. झा. साळी, लेखक - डॉ. मीना मंगरूळकर, डॉ. मोहन कांबळे, डॉ. विजयकुमार जोकारे - फडके पब्लिकेशन, कोल्हापूर.
- आशययुक्त अध्यापन पद्धती - अनंत जोशी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
- भाषा शिक्षण भाग - १ : स्वरूप, संरचना व संपादन - घोंगडे रमेश व सौ पुषा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
- भाषा शिक्षण भाग - २ : भाषा, संप्रेषण व सर्जनशीलता-घोंगडे दिलीप, भिगळ वेदश्री व एकनाथ पवार, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
- भाषा शिक्षण भाग - ३ : अभ्यासक्रम, पाठयक्रम व आशययुक्त अध्यापन - वास्कर पुष्पा व इतर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
- वाचन व लेखन कौशल्ये - खिरे उषा व इतर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

*भोवतालच्या लोकांच्या बोलण्यातून आलेली आणि स्वतःच्या आयुष्यात तयार झालेली स्मृती व प्रतिकांची भाषा ही एक पतपेढी असते. भाषा हे एक असेही माध्यम आहे, की ज्याद्वारे बव्हंशी ज्ञानाची रचना केली जाते आणि म्हणूनच ती व्यक्तीच्या विचारांशी व अस्मितेशी घनिष्टपणे जोडलेली असते. खरे तर, भाषा ही अस्मितेशी इतकी घट्टपणे जोडलेली असते, की मातृभाषेस नकार देणे वा ती पुसून टाकणे, हे बालकाच्या ' स्व' च्या जाणिवेत ढवळाढवळ करणे असते. भाषेची प्रभावी समज आणि वापर मुलांना संकल्पना, व्यक्ती आणि वस्तू यांच्यातील आंतरसंबंध व बाह्यजगाशी संबंध जोडून घ्यायला सक्षम बनवतात.*

(पान क्र. ४२) ***राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा -२००५***

*अध्यापनशास्त्राचा अभ्यास करण्याचा उद्देश, शालेय विषय समजून घेणे आणि त्यामागचा अध्यापनशास्त्राच्या दृष्टीने असणारा विचार छात्राध्यापकाच्या लक्षात येणे हा होता. त्यासाठी अध्ययनकर्ते, विषय, आशयज्ञान आणि अध्यापनशास्त्राचा दृष्टिकोन यामध्ये एकसंघता असणे आवश्यक आहे. विषयांच्या आशय ज्ञानापासून अध्यापनशास्त्राची फारकत झाली, तर कोणत्या विषयासाठी कोणती अध्यापन पद्धती अवलंबवावी याची समज छात्राध्यापकांना येणार नाही. भाषेच्या अध्यापन शास्त्राचा विचार करता भाषेची वैशिष्ट्ये, भाषेचा वापर, भाषा अध्ययनाने सामाजिक, सांस्कृतिक पैलू अशा घटकांचा समावेश भाषीय अध्यापनशास्त्राच्या दृष्टीने अभ्यासकमात व्हायला हवा.*

(पान क्र. २१) ***शिक्षक शिक्षणाचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा -२००९***



कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - प्रथम वर्ष

## ६. विषय - कलाभिव्यक्ती (Art Expression)

## घटक - नृत्य / नाट्य / संगीत (Dance / Drama / Music)

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| -- | THEORY | 04 | 03 | 70 | 100 | H. A. E. |

**प्रस्तावना :-** सर्व ललित कलांच्या आंतरिक मूलतत्त्वांमध्ये अनेक बाबतीत साम्य आहे. केवळ सादरीकरणाची विविध माध्यमे व तंत्रांमुळे त्या कला भिन्न ठरतात. चित्र, शिल्प, नृत्य, नाटय, संगीत, स्थापत्य या ललित कला व लोकनृत्य, लोकसंगीत इत्यादी लोककला यांच्या अभ्यासामुळे या सर्व कलांचा परस्पर संबंध अभ्यासता येतो. यातील काही कला रंगमंचावर सादरीकरणाच्या कला आहेत. या सर्व कलांच्या एकात्मिक अभ्यासातून विद्यार्थ्यांना एक चांगला सुजाण रसिक तयार करता येईल. तसेच सुसंस्कृत व जबाबदार नागरिक घडविण्याच्या दृष्टीने या विषयाचा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा आहे.

- **उद्‌दिष्टे :-**
  - १) कलात्मक अभिरुची समृध्द करून कलाविषयक जाणीवा समृध्द करणे.
  - २) शालेय अभ्यासक्रमातील ललित कलांमधील अभिव्यक्ती वैविध्याची जाणीव करून देणे.
  - ३) विविध प्रायोगिक कला व कलापरंपरांचा परिचय देणे.
  - ४) कलेच्या माध्यमातून सांस्कृतिक वारशाचे महत्त्व पटवून देणे.
  - ५) कला अभिव्यक्तीच्या विविध पातळ्यांची माहिती करुन देणे.
  - ६) ललित कलांच्या वर्गीकरणाची माहिती देणे.
  - ७) दृक् - श्राव्य कलांच्या सादरीकरणातून सर्जनशीलता व स्वप्रकटीकरण क्षमता जोपासण्यास प्रवृत्त करणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**

**प्रकरण -१ कला म्हणजे काय ? मानवी जीवनात कलेचे स्थान**

- कला शब्दांचा अर्थ व व्युत्पत्ती
- कलात्मक अभिव्यक्ती करण्यामागचे प्रयोजन
- कला अभिव्यक्तीमधील उत्स्फूर्तता
- मानवी संस्कृतीच्या इतिहासामध्ये कलानिर्मितीचे स्थान.

**प्रकरण -२ कला अभिव्यक्तीचे स्तर**

- बालकला - गायन-वादन, नृत्य, नाट्य अशा कोणत्याही कलाप्रांतात लहान मुलांचा उत्स्फूर्त- सहज आविष्कार.
- बालकलांचे स्वरूप आणि महत्त्व.

- बालनृत्ये, बडबडगीते, नक्कल इ.
- महाराष्ट्रातील वारली, ठाकर अशा व यांसारख्या आदिवासी जमातीची नृत्य-संगीत वाद्यांची माहिती.
- लोककलांचे (प्रयोगशील) नमुने अभ्यासणे आणि त्यांची माहिती.
- तमाशा, लावणी, कीर्तन, वाघ्यामुरळी, वासुदेव, कोळीगीते, कोळीनृत्य, जोगवा अशा लोककला परंपरांचा परिचय.
- कलांचा शास्त्रीय स्तर - शास्त्रीय नृत्य, शास्त्रीय संगीत, महाराष्ट्रातील संगीत परंपरा, शास्त्रीय संकेतानुसार केलेला कलाविष्कार.

**प्रकरण -३ कलांचे वर्गीकरण**

- ललित कला आणि हस्तकला
- हस्तकला - वस्त्रकला, चर्मकला, सुतारकाम, पाककला, कुंभारकला, शिवणकला इत्यादी.
- ललित कला- चित्र, शिल्प, वास्तू, संगीत, नृत्य, नाट्य, साहित्य.
- चित्रपट, श्राव्य, दृक्, दृकश्राव्य, प्रायोगिक, स्थिर, अवकाशीय कला, कलाधिष्ठित कला.

**प्रकरण-४ प्रायोगिक कलांचे स्वरूप**

- नृत्य -शास्त्रीय नृत्य शैली, शास्त्रीय व लोकनृत्यातील फरक, शालेय स्तरावरील नृत्य अध्यापन, नामवंत कलावंत - तोंड ओळख.
  (संयुक्त/असंयुक्त हस्तमुद्रा, पारंपरिक नृत्यप्रकार, इतर प्रांतातील लोकनृत्ये, वेशभूषा, केशभूषेचे महत्त्व, मुक्ताविष्काराची नृत्ये इत्यादी.)
- नाट्य - नाट्यकलेचे घटक, शालेय स्तरावरील नाट्यकलेचे अध्यापन,
  नामवंत कलावंत - तोंड ओळख.
  (पायाभूत हालचाली, वाचिक अभिनय, अनुभव कथन, सादरीकरण/एकात्मिक सादरीकरण, वर्ग नाट्यगृह, नेपथ्य व तांत्रिक अंगे इत्यादी.)
- संगीत (गायन - वादन) : संगीत कलेचे घटक, महाराष्ट्राची शास्त्रीय संगीत परंपरा, वाद्य व वाद्य प्रकारांचा परिचय, शालेय स्तरावरील संगीत अध्यापन, नामवंत कलावंत - तोंड ओळख.

- **मार्गदर्शक सूचना :-**

१) शालेय कलाशिक्षण विषयाचा अभ्यासक्रम लक्षात घेवून प्रायोगिक कलांचा परिचय द्यावा.

२) प्रायोगिक कलांचा परिचय देतांना आवश्यकतेनुसार प्रात्यक्षिकांची मदत घ्यावी.

३) परिसरातील उपलब्ध साधन - साहित्य व आधुनिक तंत्राज्ञानाचा सादरीकरणासाठी कल्पकतेने उपयोग करावा.

४) द्वितीय वर्षातील मौखिक परीक्षा (कलाभिव्यक्ती) अंतर्गत शालेय स्तरावरील कलाशिक्षण (इयत्ता १ ते ८ ) अभ्यासक्रमातील घटक/उपघटकावर आधारित माहिती व प्रात्यक्षिकाचे सादरीकरण

अपेक्षित आहे. त्यामुळे प्रथमवर्ष अभ्यासक्रमातून माहिती सोबतच सादरीकरणाला देखील महत्त्व देऊन प्रशिक्षणार्थीकडून माफक प्रमाणात सराव करून घ्यावा

**गुणदान योजना :-**

| ज्ञान | आकलन | मुद्देसूद माहिती | एकूण गुण |
|---|---|---|---|
| | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम -२०१२(इयत्ता १ते ८वी) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

२) प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमावर आधारित शिक्षक मार्गदर्शिका (इयत्ता १ व २ री /३ व ४ थी / ५वी ) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

३) कलाभिव्यक्ती - प्रा. निलिमा कढे.

४) नृत्य - प्रा. निलिमा कढे / स्मिता महाजन, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई.

५) ललितकला अभिव्यक्ती - प्रा. जयप्रकाश जगताप, जगताप पब्लिशिंग हाऊस, पुणे.

६) कला म्हणजे काय ? लेखक - महर्षि टॉलस्टॉय, (अनुवादक - साने गुरूजी)

७) नाट्य - राजीव नाईक / राजेश फुल्लारवार.

८) महाराष्ट्रातील लोकसंस्कृतीचे उपासक - रा. चिं. ढेरे.

९) तमाशा - संदेश भंडारे, परम मित्र प्रकाशन.

१०) लावणी - म. वा. धोंड.

११) कलाशिक्षक हस्तपुस्तिका (इ.१ ते ८ वी ) ,बालभारती पाठयपुस्तक मंडळ,पुणे -४

कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - प्रथम वर्ष

## ७. विषय - वर्गकाम (Class Work)

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| 80 | PRACTICAL & THEORY | 20 | -- | -- | 100 | INTERNAL MARKS |

**प्रस्तावानाः-** कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रमाच्या अभ्यासातून भावी कलाशिक्षक घडणार आहेत. प्रशिक्षणार्थीला प्रथम वर्षात केलेल्या प्रात्यक्षिक विषयाच्या अभ्यासातून प्रात्यक्षिक कौशल्ये आत्मसात करावयाची आहेत. तसेच मानसशास्त्र, बालकांचा मुक्ताविष्कार, कला इतिहासातून भारतीय संस्कृतिची माहिती प्रशिक्षणार्थींनी संपादित करणे अपेक्षित आहे. यादृष्टीने प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाला प्रात्यक्षिक स्वाध्यायातून कौशल्ये प्राप्त होतील व सैध्दांतिक विषयातून मानसशास्त्रीय व संस्कृती विषयक जाणीव होईल. ज्यामधून एक आदर्श कलाशिक्षक निर्माण करण्यास मदत होणार आहे.

- **मार्गदर्शक सूचना :-**

१. प्रथम आणि द्वितीय सत्रातील स्वाध्याय (Tutorials) / प्रात्यक्षिक कामाचा वर्गकामात समावेश राहील.

२. वर्गकामाचे मूल्यांकन (गुणदान) नियमित करणे व नोंदविणे आवश्यक आहे.

३. पोर्टफोलिओ मधील प्रात्यक्षिक कामासाठी १/४ इंपिरिअल आकाराचा कार्टीज पेपर आणि ट्युटोरिअल साठी Legal साईजचा रूल्ड पेपरचा वापर करावा.

४. प्रत्येक घटक विषयासाठी निर्धारित केलेले वर्गकाम संख्येच्या किमान वर्गकाम (प्रात्यक्षिके व स्वाध्याय Tutorials) पूर्ण असणे आवश्यक आहे.

५. वार्षिक परीक्षेला प्रवेश मिळण्यासाठी वर्गकामाचे किमान ४० % गुण आणि ७५ % उपस्थिती असणे अनिवार्य आहे.

६. कार्यानुभवातील आवश्यक त्या स्वाध्यायाचे छायाचित्र पोर्टफोलिओ मध्ये जमा करुन घ्यावे.

*बदलत्या काळानुसार बदलणाऱ्या परिस्थितीचे प्रतिबिंब शिक्षणात उमटणे आवश्यक असते. तरच शिक्षणातून राष्ट्राला, समाजाला उपयोगी असे मनुष्यबळ उपलब्ध करून देणे शक्य होते. त्यादृष्टीने अध्यापक शिक्षण अभ्यासक्रमांतूनही हे सामाजिक बदल टिपले गेले पाहिजेत. शैक्षणिक तत्त्वज्ञानातून या बाबींवर भर दिला जातो. अध्यापक शिक्षण कार्यक्रम हा शालेय घडामोडींशी मोठया प्रमाणावर निगडित असला पाहिजे. त्यात लवचिकता असावी. बदलत्या संदर्भांचे भान या अभ्यासक्रमातून शिक्षकाला यायला हवे. उदारमतवादी, मानवी विचारांचा पाठपुरावा त्यातून झाला पाहिजे. सर्व समावेशक शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन समाजातील प्रत्येक घटकाला त्याचा लाभ मिळावा. यादृष्टीने प्रयत्न झाले पाहिजे.*

( पान क्र. १२) ***शिक्षक शिक्षणाचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा -२००९***

कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - प्रथम वर्ष

## ८. विषय - प्रकल्प (Project)

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | PRACTICAL | -- | -- | 60 | 50 | EXTERNAL |

**प्रस्तावना :** प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकांमध्ये सर्जनशीलतेचा विकास होऊन संशोधकवृत्तीचे बीजारोपण होण्यासाठी, तसेच स्वयंअध्ययनाद्वारे नवविचार, नवीन कल्पना रुजाव्यात यादृष्टीने कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात **दृश्यकला (Visual Art)** यावर आधारित प्रकल्प (Project) या प्रात्यक्षिक विषयाचा समावेश केलेला आहे.

प्रात्यक्षिकांची प्रत्यक्ष कार्यवाही, निवेदन किंवा अहवाल लेखन आणि सादरीकरणाचे कौशल्य विकसित करण्याची प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाला संधी उपलब्ध होऊन त्यांच्यातील सर्जनशील विचारांना चालना मिळण्यास मदत होणार आहे.

- **उद्दिष्टे :-**

१) स्वयं अध्ययनाची संधी उपलब्ध करुन देणे.

२) तर्कसंगत विचार करून अनुभव मांडणे.

२) क्षेत्रिय अनुभवाद्वारे अध्ययन प्रकिया व शोधकवृत्ती प्रगल्भ करण्यास प्रोत्साहन देणे.

३) निरीक्षण, संकलन, निवेदन इत्यादी कौशल्यांचा विकास करणे.

४) दृश्य कलांशी निगडीत विषयांची माहिती संकलित करून सादरीकरण करणे.

५) नवविचार व कल्पकतेला प्रकल्पाद्वारे साकारण्याची संधी उपलब्ध करून देणे.

६) संग्रहप्रवृत्ती, श्रमप्रतिष्ठा, स्वयंशिस्त, चिकाटी, नीटनेटकेपणा, सौंदर्यदृष्टी, सृजनशीलता इत्यादी गुणांचा (मूल्यांचा) विकास घडवून आणणे.

७) सादरीकरणात आकर्षकता व नाविन्य निर्माण करण्यासाठी संधी व प्रोत्साहन देणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**
  - स्थानिक परिसर किंवा जिल्ह्यातील **दृश्यकला (Visual Art)** जसे - चित्र, शिल्प, हस्तकला, रांगोळी, कला-स्थळे, वास्तू, स्मारके, कलावंत, कलापरंपरा, कलामहोत्सव, संग्रहालये यांसारख्या घटकांचे स्वयंअध्ययनाद्वारे माहिती चे संकलन व अहवाल सादरीकरण.
  - **आकारमान** - ११ इंच X १५ इंच ते १५ इंच X २२ इंच (१६५ चौरस इंच ते ३३० चौरस इंच) आकारमानाच्या कागदाचे फोल्डर. (बाजारात मिळणारे विविध पोताचे कागदाचा वापर करता येणार नाही.)

❖ **प्रकल्प लेखनासाठी मुद्दे -**

- मुखपृष्ठ ( प्रकल्पाचे शीर्षकासह)
- प्रस्तावना -

- गरज व महत्त्व -
- उद्दिष्टे -
- कार्यपध्दती (नियोजन) -
- निष्कर्ष (समारोप) -
- संदर्भग्रंथ सूची -

- **मार्गदर्शक सूचना :-**

१) प्रकल्प स्वयंअध्ययनाद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित व स्वनिर्मित असावा, इतर कोणत्याही प्रकल्पाची नक्कल असू नये.

२) प्रकल्पाचे मुखपृष्ठ विषयाशी सुसंगत व अर्थबोध होईल असे असावे. तसेच मुखपृष्ठावर प्रकल्पाचे शीर्षक, प्रकल्पकाचे नाव, वर्ग, वर्ष इत्यादी बाबींची नोंद घेऊन त्यावर प्रकल्पक (प्रशिक्षणार्थी) /मार्गदर्शक शिक्षक, प्राचार्य यांच्या स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असावा.

३) प्रकल्प विषयाला अनुरूप शीर्षक, आकर्षक मुखपृष्ठ तसेच आंतरिक लेखन आणि माहितीला प्राधान्य असावे.

४) उपरोक्त अभ्यासक्रम/पाठ्यक्रमामध्ये सूचित केलेले घटक विषय किंवा तत्सम कोणत्याही एका घटकविषयाची प्रकल्पासाठी निवड करता येईल.

**५) प्रकल्प लेखन सहज आकलन होईल, समजेल अशा सहज सोप्या शब्दांत, शुध्दलेखनासह वळणदार व स्वहस्ताक्षरतच लिहिलेला असावा. काव्यात्मक पध्दतीने लिहीलेला नसावा.**

६) प्रकल्पात रंग, रंगछटा, वा कागद कोलाजचा वापर सजावटीसाठी करता येईल, मात्र त्यावरील लिखाण वाचता येईल याची काळजी घ्यावी.

७) प्रकल्प लेखनात आवश्यकतेनुसार चित्रे, रेखाटने, छायाचित्रे, नकाशे, तक्ते (सारणी), बोधवाक्ये यांसारख्या बाबींचा समावेश करता येईल.

८) प्रकल्प लेखनाची शब्दमर्यादा किमान ६०० ते १००० शब्द असावी.

९) प्रकल्प लेखनाला पृष्ठ क्रमांक देणे आवश्यक आहे, ज्यामुळे क्रमशः वाचन करणे सोयीचे होईल.

१०) प्रकल्पाच्या शेवटी संदर्भग्रंथ सूची आणि क्षेत्रभेटीची तारीख नमूद असणे आवश्यक आहे.

११) खालील गुणदान योजना ही बहिःस्थ परीक्षकांसाठी आहे. मात्र गुणदानासाठी दिलेले निकष वारंवार प्रशिक्षणार्थींना विषय शिक्षकाने सांगणे गरजेचे आहे.

**गुणदान योजना : -**

| माहितीचे संकलन | निवेदन/अहवाल लेखन | उद्दिष्टे/मुखपृष्ठ | कल्पकता / सादरीकरण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | १० |

टीप :- प्रकल्पाचे स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) नावीन्यपूर्ण प्रकल्प कसे करावेत ..? अंजली तळेगांवकर - ज्ञान-प्रबोधिनी, ५१०,सदाशिवपेठ, पुणे-३०

२) शैक्षणिक कृतिसंशोधन - डॉ. ना. के. उपासनी - बालभारती, पुणे.

३) छात्र प्रबोधन (१ सप्टेंबर २०११) प्रकल्प विशेषांक, ज्ञान-प्रबोधिनी, ५१०,सदाशिवपेठ, पुणे-३०

४) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे - मुळे रा. शं. आणि उमाठे वि. तु. - महाराष्ट्र साहित्य निर्मिती मंडळ, नागपूर.

५) कृतिसंशोधन व नवोपक्रम - स्वाती गाडगीळ, सनसाईट पब्लिकेशन, नाशिक.

६) दिशा नवोपक्रमाची - मा. संचालक - महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

७) प्राथमिक शिक्षकांसाठी निवडश्रेणी हस्तपुस्तिका (सप्टे. २००९), - म. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

८) कृतिसंशोधन व नवोपक्रम - सुमन गायकवाड, उज्ज्वला डोणे - मानसी प्रकाशन, कोल्हापूर.

९) कृतिसंशोधन व नवोपक्रम - संजय क्षीरसागर, दीपक कदम, विद्याभारती प्रकाशन.


*मौखिक ज्ञान आणि हस्तकलेची परंपरा अतिशय वैशिष्ट्यपूर्ण, विविधांगी आणि उच्च दर्जाची बौध्दिक संपदा आहे, जी स्त्रिया, वंचित व छोटे समुदाय आणि आदिवासींसारख्या आपल्या समाजातील असंख्य गटांनी टिकवून ठेवलेली आहे. या सगळ्याचा आपल्या अभ्यासक्रमात समावेश केला तर सर्व विद्यार्थ्यांना आकलनासाठी झरोके आणि कल्पना, कौशल्ये आणि क्षमतांचा गाभा मिळू शकेल, ज्यांच्यातून नवी रूपे व शोध निर्माण होऊन त्यातून स्वतःचे जीवन व समाज समृध्द होऊ शकेल.*

(पान क्र. ३०) ***राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा -२००५***

कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - प्रथम वर्ष

## ९. विषय - सूक्ष्म अध्यापन (Micro Teaching)

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| 02+02+08 | PRACTICAL LESSON | -- | -- | 60 | 50 | INTERNAL |

**प्रस्तावना :** शिक्षण प्रक्रियेतील अध्यापकाची पूर्वीची भूमिका आता बदललेली आहे. अध्यापक आता 'सुलभकाच्या' भूमिकेत असणार आहे. अध्यापनासाठीची पूर्वतयारी होऊन आत्मविश्वास वाढण्यासाठी सर्वच अध्यापन कौशल्यांवर प्रभुत्त्व संपादन करणे त्याला आवश्यक आहे.

अध्यापनातील गुंतागुंत कमी करण्याकरीता नियंत्रित वातावरणात केलेला नियंत्रित सराव म्हणजे **सूक्ष्म अध्यापन** होय. या संकल्पनेत अध्यापनाचे सूक्ष्मीकरण अभिप्रत आहे.

सूक्ष्म अध्यापन पाठासोबत दोन ते चार कौशल्यांचा एकत्रितपणे घ्यावयाच्या सेतू पाठांचा सराव हा सुद्धा तितकाच महत्त्वाचा टप्पा होय. किंबहुना तो सूक्ष्मपाठ यांना जोडणारा दुवा होय. यादृष्टिने प्रशिक्षणार्थी कला शिक्षकांना सूक्ष्म अध्यापनाचे ज्ञान होणे महत्त्वाचे ठरते. सूक्ष्म अध्यापन कौशल्यांचा सराव करताना आवश्यक तेथे माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा आवर्जून वापर करणे अपेक्षित आहे.

- **उद्दिष्टे :-**
  १) विद्यार्थ्यांशी संवाद साधता येणे.
  २) विषयसंकल्पना प्रभाविपणे मांडता येणे.
  ३) अध्यापन क्षमता विकसित करणे
  ४) विविध अध्यापन कौशल्यावर प्रभुत्त्व संपादन करण्यास मदत करणे.
  ५) निवडक कौशल्यांचा एकत्रितपणे वापर करण्याचे कौशल्य संपादन करण्यास मदत करणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**
  - प्रस्तावना
  - सूक्ष्म अध्यापन - संकल्पना (संबोध स्पष्टीकरण)
  - अध्यापनाची कौशल्ये -

| | |
|---|---|
| १) स्पष्टीकरण | २) प्रबलन |
| ३) चेतकबदल | ४) प्रश्न विचारण्याचे कौशल्य |
| ५) पाठाचा प्रारंभ | ६) उदाहरणे आणि दाखल्यांचा वापर |
| ७) दृक्-श्राव्य साधनांचा वापर | ८) कथन |
| ९) प्रयोग / प्रात्यक्षिक दिग्दर्शन | १०) फलक लेखन |
| ११) समारोप | १२) व्याख्यान |

- पाठ टाचण, निरीक्षण नोंद तक्ते इत्यादींमधील मुद्याचे स्पष्टीकरण व आवश्यक माहितीचे मार्गदर्शन.
- सूक्ष्मपाठ नमुना सादरीकरण.

- **मार्गदर्शक सूचना :-**

१) सूक्ष्मपाठाचा कालावधी ५ ते ७ मिनिटे असावा.

२) पाठ टाचण, निरीक्षण नोंद तक्ते इ.ची माहिती देऊन लेखन करण्यासंबंधी मार्गदर्शन करण्यात यावे.

३) शालेय अभ्यासक्रमावर आधारित सूक्ष्मपाठाचे नियोजन करावे.

४) सूक्ष्मपाठ सराव करताना आवश्यक तेथे तंत्रज्ञानाचा वापर करावा.

५) २ सूक्ष्मपाठ भाषा अध्यापन, २ सूक्ष्मपाठ कलाभिव्यक्ती आणि ८ सूक्ष्मपाठ कलाविषयाचे असावेत.

६) **सूक्ष्मपाठाची पध्दत :-** दहा प्रशिक्षणार्थींचा गट तयार करून त्यात एक पाठ घेणारा व एक पाठ निरीक्षक असावा. उर्वरित प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांच्या भूमिकेत असतील. यामध्ये पाठ निरीक्षकाची भूमिका महत्त्वाची आहे हे ध्यानात ठेवावे.

**गुणदान योजना :-**

| भाषेचा योग्य वापर | शैक्षणिक साधनांचा वापर | कौशल्याचा वापर | सादरीकरण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | १० |

टीप :- सूक्ष्मपाठाचे स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) सूक्ष्म अध्यापन - म. रा. शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे-३०. (सुधारित आवृत्ती-ऑक्टोबर २००८)

२) सूक्ष्माध्यापन - डॉ. मोहन ना. खताळ - नित्य नूतन प्रकाशन, पुणे.

३) सूक्ष्म अध्यापन - सर्व कौशल्यांच्या स्वतंत्र पुस्तिका - य. च. म. मु. विद्यापीठ, नाशिक.

४) एन. सी. टी. ई. अभ्यासक्रम प्राथमिक शिक्षण पदविका ( D.El. Ed. २००९)

५) सूक्ष्म अध्यापन - वाशीकर शं. श्री (१९७४) नूतन प्रकाशन, पुणे.

६) प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान -ह. ना. जगताप, नित्यनूतन प्रकाशन, पुणे.

७) Microteaching Teacher Education, Passi B. K., Shah M. M. (१९७४) CASE, Baroda.

८) Core Teaching Skills, Jangira N. K., Singh Ajit (१९८२) NCERT, New Delhi.


------------------------

# कलाशिक्षक पदविका

## पुनर्रचित अभ्यासक्रम

## (ART TEACHERS DIPLOMA, REVISED SYLLABUS )

## व्दितीय वर्ष

कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - द्वितीय वर्ष

## १. विषय - रेखा व रंगकला (Drawing & Painting )

## घटक - स्मरणचित्र / कल्पनाचित्र (Memory Drawing / Imagination Drawing)

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| 10 | PRACTICAL | -- | 04 | 100 | 50 | H. A. E. |

**प्रस्तावना :-** स्मरणचित्र म्हणजे विविध अनुभव घेतल्यावर, त्यांचे स्मरण करून (आठवून) पुन्हा कागदावर रेखाटन करणे. दैनंदिन जीवनातील विविध अनुभव, प्रसंग, घटना इत्यादी अनुभव स्मृतीपटलावर संग्रहीत होत असतात. हे अनुभव विशिष्ट प्रेरक व चेतना जागृत झाल्याने स्मरणचित्र रुपाने तयार होतात.

स्मरण व कल्पना या दोन गोष्टी म्हणजे मानवाच्या प्रतिभेला लाभलेली मोठी देणगी आहे. संबधित विषय विद्यार्थ्यांच्या स्मरण व कल्पनाशक्तींना विकसित करणारा आहे. स्मरणचित्राचे स्वरुप वास्तववादी धारणेनुसार परिपूर्ण होणार आहे. कल्पना व वास्तवतेला स्मरणाच्या आधाराने विकसित करता येईल. कल्पनेने विकसित झालेले हे स्वरूप काल्पनिक, अद्‌भूत, गुढ, भय, आश्चर्य इत्यादी भाव निर्माण करणारे असू शकेल. या प्रयत्नातून प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाची निरीक्षण क्षमता, विचार करण्याची प्रवृत्ती आणि सृजनशीलतेमध्ये वाढ होईल. तसेच चित्रनिर्मितीचा एक आगळा वेगळा अलौकिक असा आनंद मिळणार आहे.

### ❖ स्मरणचित्र :

**● उद्‌दिष्टे :-**

- अनुभवलेल्या किंवा पाहिलेल्या प्रसंगाचे स्मरणाने चित्रण करणे.
- विविध प्रकारचे दैनंदिन प्रसंग, घटना, दृश्य इत्यादींचे चित्रण करणे.
- निरीक्षण, स्मरण व कल्पनाशक्तीचा विकास घडवून आणणे.
- स्मृतिप्रतिमांना चित्ररुप देऊन वस्तूनिष्ठतेपर्यंत जाण्याचा प्रयत्न करणे.
- चित्रात प्रसंगानुरूप वातावरण निर्मिती व अनुरूप रंगयोजना करण्याची क्षमता निर्माण करणे.
- विविध माध्यमे, साहाय्यभूत साधन- साहित्य व तंत्राचा कौशल्यपूर्ण वापर करुन विद्यार्थ्यांच्या प्रयोगशील व शोधक वृत्तीला चालना देणे.
- पर्यावरण विषयक जाणीव जागृती निर्माण करणे.
- स्वनिर्मितीतून आनंद घेण्याची संधी उपलब्ध करुन देणे.

**● अभ्यासक्रम / पाठ्यक्रम -**

**१) शीघ्र रेखाटनाव्दारे सराव -**

- सभोवतालच्या विविध घटक- वस्तूंचे निरीक्षण करुन रेखाटन.
- शरीरशास्त्रीय घडण आणि प्रमाण यांचा विविध माध्यमातून अभ्यास व सराव.

२) **अविस्मरणीय प्रसंगाचे चित्रण -**

- पूर्वी अनुभवलेल्या व स्मरणात राहिलेल्या एखाद्या अविस्मरणीय प्रसंगाचे चित्रण.
- विविध प्रसंगातील वास्तवानुसार रेखाटन करताना प्रमाणबध्दता, पोत ,छायाप्रकाश, रंगसंगती, सूचक व पूरक घटक इत्यादीचे चित्रण.

३) **अभिनयाव्दारे सादरीकरण व चित्रण -**

- मानवाकृतीच्या चेहऱ्यावरील भाव, लकब, वेशभूषा, लय इत्यादी निरीक्षणाव्दारे चित्रण .
- विद्यार्थ्यांना वैयक्तिक किंवा गटाने घटना /प्रसंगाचे सादरीकरण करायला सांगून त्या प्रसंगाचे चित्रण.

४) **दैनंदिन प्रसंग -**

- दैनंदिन व्यवहारामध्ये घडणाऱ्या विविध घटनाक्रमातील प्रसंगांचे चित्रण.
- प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष घेतलेले अनुभव आणि त्या अनुभवाचे दृश्यरुपात निरीक्षणाव्दारे चित्रण .

९) **सण, समारंभ, उत्सव, खेळ इत्यादी**

- परिसरात साजरे होणारे विविध सण, समारंभ, उत्सव, खेळ यांसारख्या सामूहिक व सार्वजनिक प्रसंगावर आधारित चित्रण.

## ❖ कल्पनाचित्र :

- **उद्दिष्टे :-**
  - स्वतंत्र विचार करण्याची संधी उपलब्ध करुन देणे.
  - कल्पनाशक्तीचा विकास घडवून आणणे.
  - काल्पनिक कथा, गोष्टी, कविता, साहस कथा इत्यादींवर आधारित चित्रण करणे.
  - स्वनिर्मिती व नवनिर्मितीस प्रोत्साहन देणे.
  - स्वनिर्मित चित्राबद्दल स्वत:चे विचार (मत) व्यक्त करणे / चित्राचे वर्णन करणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम -**

१) ऐतिहासिक व पौराणिक कथा विषयावरील चित्रण.(तत्कालीन वेशभूषा, रंगभूषा, केशभूषा शरीरयष्टी इत्यादिंच्या रेखाटनातून विविध व्यक्तिरेखांचे काल्पनिक चित्रण.)

२) कथा, गोष्टी, पंचतंत्रातील कथा व साहस कथा इत्यादींवर आधारित चित्रण.

३) शोध नव्या जगाचा, पाण्याखालील जग, पृथ्वीशिवाय अन्य एखादी सृष्टी, परग्रहावरील जीवन यांसारख्या कल्पक विश्वाचे चित्रण.

**मार्गदर्शक सूचना :-**

१) अभ्यासक्रमातील प्रत्येक उपघटकावर किमान एकतरी स्वाध्याय घेण्यात यावा.

२) चित्रणात वातावरण निर्मितीसाठी सूचक व पूरक घटकांचा समावेश असावा.

३) विषयाच्या आवश्यकतेनुसार रचना, परस्पर प्रमाण, पुरोभूमी व पार्श्वभूमी अपेक्षित आहे.

४) स्मरणचित्र / कल्पना चित्रणात किमान तीन मानवाकृती असाव्यात.

५) विषयानुरूप रंगकाम, रंगसंगती व यथादर्शन कौशल्यापूर्ण असावे.

६) विषयाच्या गरजेनुसार यथादर्शन व विविध पातळ्यांचा अभ्यास अपेक्षित आहे.

**गुणदान योजना :-**

| मांडणी/रचना | प्रमाण बध्दता | यथादर्शन | कल्पकता | सादरीकरण | माध्यम कौशल्य | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) रेखाकंन ते रेखाचित्र - वासुदेव कामत

२) स्केचिंग - प्रताप मुळीक

३) स्केचिंग ॲन्ड ड्रॉईंग - शिवाजी तुपे

४) स्केचिंग ॲन्ड ड्रॉईंग - संजय शेलार

५) स्मरण चित्रे - ज. पा. आपटे

६) Drawing and Anatomy - Victor Perard

७) Drawing and Anatomy - Andrew Loomis

८) Free Drawing - M. M. Mehta & V. S. Adurkar - Grace Prakashan, Mumbai

कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - द्वितीय वर्ष

## १. विषय - रेखा व रंगकला (Drawing & Painting)

## घटक - व्यक्तिशीर्ष अभ्यास (Head Study)

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| 10 | PRACTICAL | -- | 10 | 140 | 50 | H. A. E. |

**प्रस्तावना :-** मानवी चेहऱ्यावरील अवयवांची एकमेकाशी असलेली प्रमाणबध्दता आणि त्यांचा परस्परांशी असलेल्या संबंधाचा अभ्यास या विषयात अपेक्षित आहे. शरीरशास्त्रीय (Anatomy) रचनेच्या अभ्यासातून मानवी चेहरा व त्यावरील अवयवांचे चित्र तयार होण्याच्या दृष्टीने निरीक्षण होईल. समोर बसलेल्या मॉडेलच्या चेहऱ्यावरील छाया-प्रकाश , त्वचेचा रंग, अंगावरील वस्त्र व पोशाख यांचे निरीक्षण अपेक्षित आहे. या सर्व सरावातून प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकांना चित्रकला व माध्यम हाताळण्याची कौशल्ये संपादन होतील.

- **उद्दिष्टे :-**
  १) मानवी शीर्षाचे निरीक्षण करून अभ्यासात्मक चित्रण करणे.
  २) मानवी चेहऱ्यावरील वेगवेगळे अवयव व त्यांची एकमेकांशी असलेली प्रमाणबध्दता अभ्यासणे.
  ३) रूपात्मक अस्तित्त्व, छायाभेद व पोत इत्यादींचा अभ्यास करणे.

- **अभ्यासक्रम/पाठ्यक्रम :-**
  १) नाक, कान, डोळे, ओठ इत्यादीं आदर्श नमुन्यांवरून वास्तववादी व भौमितिक रूपाचा अभ्यास व सराव.
  २) मानवी शीर्षाची शरीरशास्त्रीय घडण व प्रमाणांचा अभ्यास आणि सराव.
  ३) आदर्श अभिजात शिल्पांवरुन, वेगवेगळ्या कोनातून शीर्ष अभ्यास.
  ४) प्रत्यक्ष व्यक्तिशीर्षाचा वेगवेगळ्या कोनातून अभ्यास.
  ५) प्रत्यक्ष व्यक्तिशीर्षाचा वेगवेगळ्या कोनातून आणि विविध माध्यमातून छायाभेदासह अभ्यास व सराव.

- **मार्गदर्शक सूचना :-**
  १. शिक्षकाने अभिजात व्यक्तिशीर्ष चित्रणाच्या रंगीत पारदर्शिका व छापील चित्रे प्रशिक्षणार्थींना दाखवावीत.
  २. आदर्श अभिजात व्यक्तिशीर्ष शिल्पांच्या (Antiques) प्रतिकृती अभ्यासासाठी उपलब्ध करुन द्याव्यात.
  ३. सरावासाठी विविध रंग माध्यमाचा उपयोग अपेक्षित आहे.

**गुणदान योजना :-**

| शरीरशास्त्रीय घडण | प्रमाणबद्धता | छायाभेद | माध्यम हाताळणी | सादरीकरण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) रेखाकंन ते रेखाचित्र - वासुदेव कामत

२) Drawing and Anatomy - Victor Perard

३) Drawing and Anatomy - Andrew Loomis

४) How to draw and Paint faces and features - Fritz Willis (Walter Foster series)

५) Heads / २ - Andrew Loomis - (Walter Foster series)

६) Basic Portrait Techniques - Rachel Wolf - North Light Books Cincinnati

७) The Complete Step-by Step Portrait Painting - Angela Gair Chancellor Press, Loandan




कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - द्वितीय वर्ष

## १. विषय - रेखा व रंगकला (Drawing & Painting)

## घटक - व्यक्ती रेखांकन (Time Sketch)

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| 10 | PRACTICAL | -- | 05 | 80 | 50 | H. A. E. |

**प्रस्तावना :-** मानवी शरीर रचनेचा अभ्यास करताना सर्वप्रथम प्रमाणबध्दतेला अधिक महत्त्व आहे. हे करीत असताना प्रशिक्षणार्थींच्या निरीक्षण शक्तीचा विकास होणे अपेक्षित आहे. अचूक निरीक्षणाने प्रमाणबध्द ओघवत्या रेषेत शीघ्र चित्रण करता येते. चित्रण करीत असताना विविध कोनातून रेखाटन होणे अपक्षित आहे. मानवी शरीर शास्त्रीय शारीरिक जडणघडण व त्याची प्रमाणबध्दता इत्यादीचा सराव करताना भिन्न वयोमानाच्या व्यक्तीमधील बदल हा दृष्यपातळीवर विचार करुन सहज, सुलभ आविर्भावाचा तपशीलवार अभ्यास करणे आवश्यक आहे.

- **उद्दिष्टे :-**
  - निरीक्षणशक्तीचा विकास करणे,
  - प्रमाणबध्द शीघ्रचित्रण करता येणे.
  - मानवी शरीर रचनेचा साम्यभेदांसह स्थूलमानाने अभ्यास करणे.
  - व्यक्तिवरील छायाप्रकाशाचा विविध कोनातून अभ्यास करणे.
  - व्यक्तिची वस्त्रप्रावरणे आणि पार्श्वभूमीचा परस्परांवर होणाऱ्या दृक् परिणामाचा अभ्यास करणे.
  - व्यक्तिवैशिष्ट्ये (आविर्भाव-ढब, शारीरिक ठेवण इत्यादी) टिपता येणे.

- **अभ्यासक्रम/पाठ्यक्रम :-**
  - शरीरशास्त्रीय घडण व मानवी शरीराची प्रमाणबध्दता इत्यादींचा रेखाटन सराव व स्वाध्याय.
  - समोर बसलेल्या व्यक्तिचे पोस्टर कलर माध्यमात दोन-तीन पातळ्यात छायाभेदांसह अभ्यास व सराव.
  - व्यक्ती व त्यानुषंगाने असणाऱ्या पोशाखावरील (ड्रेपरी ) छायाप्रकाशाचा सूक्ष्म अभ्यास व सराव.
  - पेन्सिल, चारकोल तसेच तत्सम रेखांकनाच्या विविध माध्यमांचा प्रामुख्याने वापर करुन व्यक्तीचे विविध कोनातून शीघ्रचित्रण व सराव.
  - भिन्न वयोमानाच्या व्यक्तींचे (स्त्री-पुरुष) रेखाचित्रण.
  - पुरातन/जुन्या तऱ्हेच्या (अभिजात) व्यक्ती शिल्पांवरुन (Antiques) अभ्यास व सराव स्वाध्याय. विविध अवयवांचा स्वतंत्र सराव स्वाध्याय.
  - समोर बसलेल्या व्यक्तिचे वास्तवानुसार मांडणीसह व्यक्तिरेखांकन.
  - दृश्यपातळीचा विचार करुन सहज, सुलभ आविर्भावाचा ( Posture) तपशीलवार अभ्यास.
  - चारकोल, ऑईल पेस्टल्स, पेन व रंगीत पेन्सिल इ. वेगवेगळ्या माध्यमाचा वापर करुन व्यक्ती रेखांकन.

- **मार्गदर्शक सूचना :-**
    १. विविध कोनातून विविध माध्यमांव्दारे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक करुन दाखविणे.
    २. प्रत्येक स्वाध्यायांसोबत शरीर रचनेची शास्त्रीय घडण व हात, पाय यांसारख्या अवयवांची चित्रणे आवश्यक.

**टीप - सराव व स्वाध्यायासाठी १/४ इंपिरिअल आकाराचा ड्रॉईंग पेपर वापरावा.**

**गुणदान योजना :-**

| प्रमाणबध्दता | शरीर रचना अभ्यास | छायाप्रकाश | योग्य मांडणी | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) रेखांकन- वासुदेव कामत

२) रूपदर्शिनी - एम. आर. आचरेकर

३) Anatomy and Drawing - Victor Perard

४) Figure Drawing-Andrew Loomis

५) Walter D.Foster Series

६) Anatomy Drawing-George Bridgeman

७) Sketching-Pratap Mullick

८) Life Drawings in Actpon-Aditya

कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - द्वितीय वर्ष

## विषय - रेखा व रंगकला (Drawing & Painting)

### १. घटक - यथादर्शन चित्रण (Perspective Drawing)

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| 06 | PRACTICAL | -- | -- | 20 | -- | -- |

**प्रस्तावना :-** यथादर्शनामध्ये वातावरणीय व रेषात्मक असे दोन प्रकार अभ्यासले जातात. रेषात्मक यथादर्शनामध्ये समांतर व कोनात्मक पध्दतीद्वारे घटकांचे बाह्यरूप यथातथ्य अभ्यासता येते. यादृष्टीने कोनात्मक यथादर्शनाद्वारे विविध वस्तूघटकांचे विविध कोनातून शास्त्रशुध्द रेखांकन करणे अपेक्षित आहे. हे करीत असताना रेषांचा सफाईदारपणा व काटेकोरपणा आणि दूरत्त्वाचा भास इत्यादींचा अभ्यास होणार आहे. स्थिरचित्र, स्मरणचित्र वा इतर प्रात्यक्षिक विषयांचा पाया यथादर्शनाद्वारे मजबूत करता येईल.

- **उद्दिष्टे :-**
    - निरीक्षणशक्तीचा विकास करणे.
    - वास्तवानुसार चित्रणाची दृष्टी निर्माण करणे.
    - विविध दृश्यपातळ्यांचा अभ्यास करणे.
    - विविध यांत्रिक साधनांची सुयोग्य हाताळणी करण्याचे कौशल्य संपादन करणे.
    - घनाकारांचे व्दिमित पृष्ठभागावर चित्रण करण्याचे तंत्र संपादित करणे.
    - वातावरणीय यथादर्शनाचा अभ्यास करणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**

१) कोनात्मक यथादर्शनाच्या माध्यमातून एखाद्या दृश्याचे शास्त्रशुध्द पध्दतीने रेखांकन.

२) क्षितिज रेषा (Horizontal Line), जमीनरेषा (Ground Line), दृष्टीरेषा (Directing Line), दष्टिमध्यकिरण (Principle of Visual Ray), डोळा (Eye), दृष्टिमध्यबिंदू (Centre of Vision), विलयबिंदू, (Vanishing Point), मापनबिंदू (Measuring Point), अंतरबिंदू (Distance Point) यथादर्शनातील या विविध रेषा व बिंदूंचा शास्त्रशुध्द अभ्यास करून दिलेल्या घटकांचे अनुविक्षेप व उद्विक्षेप रेखांकन.

३) विविध भौमितिक घनाकार, कमान, एखाद्या उंच इमारतीचा भाग (टॉवर), थडगे, वाहन, रेल्वे स्टेशन इत्यादीचा अभ्यास.

- **मार्गदर्शक सूचना :-**
    १) यथादर्शन करित असताना भौमितिक साधनांचा अचूक वापर करण्यास प्रवृत्त करणे.
    २) सोडविलेला एखादा प्लान रंग व रंगीत पेन्सिलीद्वारे छायाभेदांकित करून त्यातून रंगछटांचा अभ्यास करणे अपेक्षित आहे.

**गुणदान योजना :-**

| आरेखन कौशल्य | अचूकता | साहित्य हाताळणी | सादरीकण / सफाईदारपणा | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) पर्स्पेक्टीव्ह ड्रॉईंग - मिलिंद मुळीक, जोत्स्ना प्रकाशन, पुणे

२) Perspective Drawing Hand Book - Joseph D,amelio.

३) Perspective Drawing- Ernest Norling.

४) Perspective - Jay Doblin.

५) Perspective for Art Students - R. G. Hatlon.

६) Perspective Made Easy - Earnest R. Norling.

७) Basic Perspective Drawing - John Montague.

८) The Complete Guide to Perspective Drawing - Craig Attebery.

९) How to Draw Perspective - Mark Bergin.

१०) Perspective for the absolute Beginners - Mark & Mery Willenbrink.

११) Perspective & Composition - Barrington Barber.




**विषय - रेखा व रंगकला (Drawing & Painting)**

**२. घटक - बहि:स्थल अभ्यास रेखांकन व निसर्गचित्रण (Outdoor Study-Sketching & Landscape)**

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| 05 | PRACTICAL | -- | -- | 60 | 50 | -- |

**प्रस्तावना :-** निसर्ग हा सर्व सर्जनाचा स्रोत आहे. त्यामुळे सभोवतालच्या परिसरातील वस्तुघटकांचे, वातावरणीय बदलाचे रंगरेषेत शीघ्र रेखाटन केल्याने रेखाटन कौशल्यावर प्रभुत्त्व तर येतेच शिवाय निसर्गाबद्दलचे कुतूहल वाढते. निसर्गातील रंग, आकार, छटा, पोत, यथादर्शन इत्यादींचा कलेच्या अंगाने अभ्यास महत्त्वाचा आहे. तसेच पर्यावरण संवर्धन व जैवविविधता इत्यादीची जाणीव या विषयामुळे शक्य आहे. निसर्ग संवर्धन आणि निसर्गातील प्राणी, पक्षी व वनस्पतीचे आकलन शीघ्र रेखाटनाद्वारे करता येईल. बहि:स्थल अभ्यासात निरीक्षण, अनुकरण आणि रेखांकन अपेक्षित आहे.

- **उद्‌दिष्टे :-**
  १) निरीक्षणशक्तीचा विकास घडवून आणणे.
  २) निसर्गाचे अभ्यासात्मक चित्रण करण्याची संधी उपलब्ध करुन देणे.
  ३) यथादर्शनाचा अनुभवाधिष्ठित अभ्यास करणे.
  ४) विविध दृक् पातळींवरुन दिसणाऱ्या निरनिराळ्या आकारांचे अचूक रेखांकन व रंगकाम करता येणे.
  ५) रेखाकंन व चित्रणासाठी विविध रंग माध्यमांचा वापर करण्यासाठी प्रवृत करून संधी देणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**
  - आकार, रूप, अवकाश, खोली, यथादर्शन, घनता इ. बाह्य रेखाटनातून धन व ऋण अवकाशाचा अभ्यास.
  - विविध ऋतू, दिवसाचे विविध प्रहरातील प्रकाश, छाया व विविध छटा इत्यादींचे निरीक्षण व अभ्यास.
  - विविध माध्यमे व पोतांच्या पृष्ठभागाचा अनुभव अभ्यास व सराव.
  - वेशभूषा, वय, हालचाली यात वैविध्य असलेल्या मानवाकृतींचे रेखांकन.
  - प्राणी, पक्षी, रस्ते, इमारती, स्मारके, मंदिरे वगैरेंची विविध माध्यमात रेखांकने व चित्रणे.
  - रचनेच्या दृष्टीने ग्रामीण व शहरी भागातील निसर्ग चित्रणे.

- **मार्गदर्शक सूचना :-**
  १) शिक्षकाने प्रत्यक्ष स्थळांवर विविध माध्यमांचा वापर करुन प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकांना प्रात्यक्षिक दाखवणे आवश्यक आहे.



एन २२३--९अ

३) विषयामध्ये अधिक रूची निर्माण करण्यासाठी प्रत्यक्ष स्थळांवर अभ्यास सहल / क्षेत्रभेटीचे वेळोवेळी नियोजन करावे.

४) प्रसिध्द निसर्गचित्रकारांच्या रंगीत पारदर्शिका व छापील निसर्गचित्रे विद्यार्थ्यांना दाखवावीत,

५) प्रसिध्द निसर्गचित्रकारांच्या प्रात्यक्षिकांचे आयोजन करणे अपेक्षित आहे.

**गुणदान योजना :-**

| निरीक्षण | अभ्यासात्मक रेखांकन | निवडलेला कोन | यथादर्शनाचा वापर | माध्यमाची हाताळणी | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :**


१) वॉटर कलर - मिलिंद मुळीक


२) वॉटर कलर डेमॉस्ट्रेशन्स - मिलिंद मुळीक

३) वॉटर कलर लॅण्डस्केप्स स्टेप बाय स्टेप - मिलिंद मुळीक

४) एका कुंचल्याची भ्रमंती - म. कृ. केळकर

५) Outdoor Scenes -Water Color - Walter Foster

६) Landscapes Water Color - Walter Foster

**विषय - संकल्पचित्र (Design)**

**घटक - मांडणीचित्रण / चित्रात्मक संकल्प / कार्यात्मक संकल्प / मुद्राचित्रण / भित्तीपत्रक**

**(Organization / Pictorial Composition / Functional Design / Print-Making / Poster Design )**

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| 05+05+05+02+02 | PRACTICAL | -- | 10 | 180 | 100 | H. A. E. |

**प्रस्तावना :-** वास्तवानुरूप चित्र आणि संकल्पचित्र यात मूलभूत फरक आहे. संकल्पचित्रात कल्पना, विचार, विषय, आशय इ. चा आविष्कार होत असतो, हा आविष्कार नेमकेपणाने करता येऊन दृश्य स्वरूपात मांडता येणे अपेक्षित आहे. कला इतिहासाचे अवलोकन केले असता असे लक्षात येते, की कला सौंदर्यमूल्यांनी युक्त आणि आशय संपन्न आहे. तेव्हा संकल्पचित्रात दृश्य घटकांचा उपयोग कुशलतेने करता येणे व निसर्गातील सौदर्यमूल्यांना कलामूल्यात रूपांतरित करण्याची क्षमता प्राप्त होण्याच्या दृष्टीने संकल्पचित्र हा विषय अतिशय महत्वाचा आहे. नैसर्गिक वस्तूतील सौदर्यांत रचनेची प्रमुख भूमिका आहे. संकल्पाची तत्त्वे आणि घटकांची प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकांना अचूकतेने जाणीव करुन देणे या विषयातून साध्य होईल.

- **उद्‌दिष्टे :-**
  - विविध घटक आकारांची दिलेल्या अवकाशात सहजसुंदर मांडणी करुन त्यामध्ये एकात्म संवाद साधणे.
  - संकल्पाच्या मूलतत्त्वांचा मुक्तपणे वापर करण्याची संधी उपलब्ध करुन देणे.
  - दिलेल्या विषयातील आशयानुसार मानवाकृतीचे सुलभीकरण, अथवा आलंकरण करुन मानवी भाव-भावना प्रतिबिंबित करणे.
  - कल्पकता, सृजनशीलता, सौंदर्यदृष्टी इत्यादी गुणांच्या विकासाची संधी उपलब्ध करून देणे.
  - समाज प्रबोधनात्मक संदेश व जाणीव -जागृतीचा दृष्टिकोन विकसित करणे.
  - उपयोगिता व व्यावसायिक दृष्टिकोन विकसित करणे.
  - नामवंत कलावंतांच्या कलाकृतीतील प्रयोगशीलता, सृजनशीलता आणि आशयघनता इत्यादींचा अभ्यास करण्याची संधी उपलब्ध करुन देणे.

### ❖ १) मांडणीचित्र ORGANIZATION

**प्रस्तावना :-** विसंगतीतून सुसंवाद साधता येणे ही प्रतिभासंपन्नता मानली जाते. विसंगत आकार देखील कलेच्या घटक व तत्त्वांच्या सुसंगत नियोजनामुळे अवकाशात एकात्मता साधत असतात. रचनाचित्राचा अभ्यास करीत असताना विसंवादातून संवाद साधण्याची क्षमता प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकात निर्माण होईल. कलेतील घटक तत्त्वांचा प्रामुख्याने विचार करता येईल. यातून निव्वळ सौंदर्याची अनुभूती देता येईल. यादृष्टीने रचना तत्त्वांचे चित्रकलेत महत्त्व मानले गेले आहे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**
  - भिन्न माध्यमे व आकारमानाच्या घटकवस्तूंची सुनियोजित मांडणी.
  - प्रत्येक वस्तुघटकाचे सौंदर्य एकूणच चित्राच्या सौंदर्याला पूरक ठरेल अशा मांडणीचे चित्रण.
  - रंगसंगती, परिणामकारक पोत, रंगछटांमधून होणारी सौंदर्य निर्मिती आणि अवकाश विभाजन इत्यादींचा अभ्यास व चित्रण.
  - विरूपीत (विसंगत) आकारांमधून सुसंकल्पाची निर्मिती.

### ❖ २) चित्रात्मक संकल्प PICTORIAL COMPOSITION

**प्रस्तावना:-** एखादा विषय, प्रसंग चित्रमय करणे. कलात्मक दृष्टीने या विषयातील गांभीर्य, प्रसंग व त्याला अनुसरून योग्य पार्श्वभूमी, वातावरण निर्मितीचा आभास चित्रमय करणे म्हणजे चित्रात्मक संयोजन होय. एखादा विषय कल्पकतेने कलेच्या भाषेत मांडणे, त्यासाठी नाट्यपूर्णता, आकृत्यांची वैशिष्ट्यपूर्ण रचना करणे, संकल्पांची तत्त्वे व घटकांच्या अभ्यासातून चित्रमय रूप देणे हे आवश्यक आहे. नैसर्गिक घटक, मानवाकृती, प्राणी-पक्षी या आकारांचे सुलभीकरण, अलंकरण, भौमितिक सृजनशील, नाविन्यपूर्ण रूपांतर करण्याने चित्रमय संयोजन अधिक आकर्षक होईल. प्रशिक्षणार्थींना या बाबींचा अधिक अभ्यास करण्याची संधी उपलब्ध करून देता येईल.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**

**अवकाश विभाजन**

- व्याप्त आणि अव्याप्त क्षेत्राचे विषम तोलात विभाजन.
- अधिक - उणे अवकाशाचा तौलनिक अभ्यास.
- संकल्पाच्या मूलतत्त्वांचा सहज व जाणीवपूर्वक वापर.
- विषयानुषंगाने मानवाकृतींची संख्या विचारात घेऊन चित्रण.

**सुलभीकरण / आलंकरण**

- आशयानुसार मानवाकृती व संबंधित घटकांचे चित्रण.
- विषयाच्या अनुषंगाने येणारे घटक (प्राणी, पक्षी) व मानवी भाव - भावनांवर आधारित चित्रण.

**माध्यमातील विविधता व पोतसौंदर्य**

- माध्यमांतील विविधता व पोतसौंदर्य यांतील नावीन्यता व परिणामांचा अभ्यास.
- लाकूड, वाळू, दोरा, कापड, खळ, टेक्चर व्हाईट यांसारख्या माध्यमांतून पोतनिर्मिती.
- खोली व घनतेचा भास निर्माण करण्यासाठी त्रिमितीदर्शक पोतनिर्मिती.

**अभिजात भित्तीचित्र व लघुचित्रातील शैलींचा वापर**

- अभिजात भित्तीचित्र व लघुचित्रातील विविध घटकांचा सूक्ष्म बारकाव्यांसह अभ्यास व सराव. (उदा. भाव-भावना, लयदार रेषा, रंगसंगती )

## ❖ ३) कार्यात्मक संकल्प FUNCTIONAL DESIGN

**प्रस्तावना:-** कार्यात्मक संकल्प या विषयांतर्गत दैनंदिन नित्य वापरात येणाऱ्या वस्तूंचे अलंकरण व अलंकरणाचा अभ्यास अपेक्षित आहे. कोणतीही वस्तू विशिष्ट उपयोगासाठी निर्मिती केलेली असते. तिचा वापर सहज व सुलभ करता यावा, वापरातून योग्य परिणाम अपेक्षित असतो. याबाबींचा तार्किक अंगाने विचार करण्याची क्षमता प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाची वाढीस लागेल. प्रॉडक्ट डिझाईन सारखे क्षेत्र विकसित झालेले आहे. अशा क्षेत्राबद्दल प्रशिक्षणार्थींना कल्पना येईल.

वस्तूचा उपयोग, ती हाताळत असताना येणाऱ्या संभाव्य अडचणींचा विचार करणे महत्त्वाचे आहे. वस्तूवरील केवळ अलंकरण न करता त्या वस्तूची उपयोगिता ही महत्त्वाची आहे. दृश्यघटकांच्या उपयोगातून वस्तूंची संकल्पना, आराखडा व अलंकरण करण्याची योग्यता प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकांमध्ये निर्माण होईल.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**
  - एखादी वस्तू आहे त्यापेक्षा अधिक सुंदर कशी दिसेल त्यादृष्टीने अलंकरणासाठी अभ्यास व सराव.
  - चित्रसौंदर्याच्या मूलभूत घटकांचा परिणामकारी वापरातून वस्तूचे अलंकरण.
  - वस्तूची उपयुक्तता लक्षात घेऊन अलंकरण.

## ❖ ४) मुद्राचित्रण PRINT-MAKING

**प्रस्तावना :-** दृश्य कलेमधील कलानिर्मितीत मुद्रणकलेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. १६ व्या शतकात मुद्रण कलेचा शोध लागला. कला निर्मितीचे विविध तंत्र आणि पध्दती मुद्रणकलेच्या अभ्यासातून प्रशिक्षणार्थींना अवगत होणार आहे. मुद्रणातील कलात्मक शक्यतांचा अभ्यास करून निर्मितीचा आनंद प्राप्त करण्याची संधी मिळणार आहे.

मुद्राचित्रण म्हणजे सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास वस्तूच्या पृष्ठभागावरील उठाव अथवा खोलगट भागाचे (खोदमुद्रा) विविध माध्यम व तंत्राद्वारे ठसे घेणे. प्रशिक्षणार्थीने मुद्रणकला या विषयांतर्गत कला निर्मिती करीता परिसरात उपलब्ध होणाऱ्या व पोतजन्य (खरबरीत भाग) गुणधर्म असलेल्या विविध वस्तूंचे पोत सौंदर्य कागदावर टिपणे अपेक्षित आहे. यातून विविध मुद्रणपध्दतींचा अभ्यास होईल.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**
  - परिसरात उपलब्ध होणाऱ्या व पोतजन्य गुणधर्म असलेल्या परिसरातील विविध वस्तूंचे पोतसौंदर्य कागदावर टिपणे. मुद्रणातील कलात्मक शक्यतांचा अभ्यास.

- पृष्ठभागावरील विविध पोतांचा संकल्पन/अलंकरणासाठी (सुशोभन) वापर.
- बटाटा, कांदा, भेंडी यांसारख्या नैसर्गिक घटकांचे काप, पानांचे पृष्ठभाग, चुरगळलेले कागद, बोटांचे ठसे, दोरा, पुठ्ठा, लायनो, प्लायवूड, कोरेक्स अशा विविध घटकांपासून एकमुद्रा (Mono print) उठावमुद्रा (Relief print) अशा मुद्रणपध्दती व तंत्राचा अभ्यास आणि सराव.

## ❖ ५) भित्तीपत्रक POSTER DESIGN

**प्रस्तावना :-** भित्तीपत्रक म्हणजे विविध सामाजिक विषयाला अनुसरून संदेश प्रसारित करण्याच्या अनेक माध्यमांपैकी एक प्रभावी माध्यम आहे. सामाजिक प्रबोधन, जनजागृती करिता कमीतकमी शब्द, प्रभावी रंग व प्रतिकांचा वापर करून महत्त्वपूर्ण संदेश समाजातील विविध स्तरापर्यंत सर्वदूर प्रसारित करण्याकरीता आधुनिक माध्यमाबरोबर भित्तीपत्रकाचा उपयोग होताना दिसून येतो. आदर्श तत्त्वे समाजात रुजविण्याकरीता आशयघन बोधचिन्हे, घोषवाक्ये यांचा प्रभावी वापर भित्तीपत्रकात करता येईल.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**
  - सामाजिक प्रबोधन, संदेश आणि जनजागृतीच्या उपयुक्ततेसाठी चित्रण.
  - घोषवाक्य, बोधचिन्ह आणि प्रतिकांचा प्रभावी वापर.
  - विषयानुरूप घोषवाक्य व आशयाचे चित्रण.

- **मार्गदर्शक सूचना :-**

१) घटकांची मांडणी करताना त्यात नैसर्गिक सहजता व चैतन्य अपेक्षित आहे.

२) मानवाकृतींचा वैविध्यपूर्ण आविष्कार असलेल्या नामवंत कलावंताच्या विविध माध्यम, तंत्रातील कलाकृतींचा अभ्यास करता येईल.

३) नैसर्गिक, आलंकारिक, भौमितिक आणि केवलाकारी आकारांचा संकल्प करणे अपेक्षित आहे.

४) संकल्पचित्र तयार करताना सौंदर्यविषयक कल्पनांना प्राधान्य देता येईल.

५) आशयानुसार रंग व आकारांची विविधता आणि त्याचा पोत जपणे अपेक्षित आहे.

६) भित्तीचित्र विषयाद्वारे हस्तलिखित सजावट, शैक्षणिक साधने, भेटकार्डे, वर्गसजावट, नैमित्तिक स्वरूपाचे उपक्रमात सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहन देता येईल.

**गुणदान योजना : -**

| संकल्प / मांडणी | रंगसंगती | सृजनशीलता / कल्पकता | सादरीकरण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) चित्रकला तंत्र व मंत्र - म .ग. पातकर

२) दृक् कला - मूलतत्त्वे व आस्वाद - प्रा. जयप्रकाश जगताप - जगताप पब्लीकेशन, पुणे

३) दृश्यकला - प्रा. भागवत, प्रा. देसाई, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

४) दृक् कला - प्रा. शांतिनाथ आरवाडे - गो. य. राणे प्रकाशन, पुणे

५) Understanding of Art - Lots. Fichner Rathics Thomas Wadswarth

६) Visual Design Lillian Gareeti

७) Lettering Styles & Scripts - Speedball co.jm.USA

८) Methods & Technique Opaque Colour - Milind Mulick

९) Visual Studies - Frank M.Young - Prentice Hall Inc. Englewood Cliffs, New Jersey




## कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - द्वितीय वर्ष

## ३. विषय - स्थिरचित्र (Still Life)

### घटक - स्थिर चित्रण (Still Life)

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| 10 | PRACTICAL | -- | 10 | 140 | 100 | H. A. E. |

**प्रस्तावना :-** समोर मांडलेल्या वस्तुसमूहाचे वास्तवानुरूप रेखा व रंगकामाच्या अभ्यासातून प्रशिक्षणार्थींना भविष्यात स्वतंत्र कला निर्मितीचे मार्ग प्रशस्त करता येईल. वस्तू-वस्तूतील संबंधांचे निरीक्षण, परस्पर प्रमाणबध्दता, पार्श्वभूमी इत्यादीच्या सहयोगाने तयार होणारे वातावरणाचे कागदावर रंगरेषांच्या माध्यमातून हुबेहुब चित्रण उतरवता येणे ही क्षमता वास्तववादी चित्रकलेचा महत्त्वाचा टप्पा आहे. रंगकाम व कुंचल्याच्या सरावातून (Brushing) रंगलेपनाची भिती प्रशिक्षणार्थींच्या मनातून कमी होऊन चित्रात सहजता येणार आहे. प्रथम वर्ष अभ्यासक्रमातील वस्तूचित्र (Object Drawing) या विषयाचे पूर्वी मिळविलेले ज्ञान व अवगत केलेली कौशल्ये स्थिरचित्राच्या अभ्यासात उपयोगी ठरणार आहेत.

- **उद्दिष्टे :-**

१) निसर्ग आणि मानवनिर्मित घटक वस्तुंच्या आकारांचा रचनात्मक अभ्यास करणे.

२) वस्तूंची जडण- घडण, आकार, रुप, घाट इत्यादींचे निरीक्षण करुन दिलेल्या अवकाशात संयोजनात्मक रेखांकन करण्याची संधी देणे.

३) वस्तुसमूहावर पडलेल्या छायाप्रकाशाचा विविध रंग माध्यमातून परिणाम अभ्यासणे.

४) वस्तुसमूहाचे चित्रण करताना माध्यमाचे वैशिष्ट्ये सांभाळून रंगलेपनाव्दारे परिणाम साधता येणे.

५) माध्यमे व रंगलेपनाच्या विविध पध्दती हाताळण्याची संधी देणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**

१) मूलभूत घनाकारांचा अभ्यास व रेखाटन सराव.

२) आकार, रुप, घनता इत्यादींचा सूक्ष्म अभ्यास व रेखाटन.

३) मानव निसर्गनिर्मित वस्तूंच्या मूलभूत आकारावर आधारित रेखांकन व चित्रण.

४) वस्तूंचे रेखांकन करताना विविध कोनांचा आणि दृश्यपातळींचा अभ्यास.

५) वस्तूंच्या मांडणीतील रचना शोधून मांडणीतील तीन पातळ्यांचे रेखांकन.

६) वस्तूंची गोलाई, सपाट पृष्ठभागावरील छायाप्रकाश व परावर्तीत प्रकाशाचे चित्रण.

७) वस्तूंच्या पृष्ठभागावर विविध पोतांचा परिणाम साधून चित्रण.

८) रंगाची विविध परिमाणे (रंगमूल्य, रंगकांती) वापरुन चित्रावकाशात पुरोभूमी, पार्श्वभूमी व घनता इत्यादींच्या परिणामांचा अभ्यास.

९) समोर ठेवलेल्या वस्तुसमूहाच्या आधारे सृजनात्मक रेखांकन व चित्रण.

- **मार्गदर्शक सूचना :-**

१) मूलभूत घनाकारांचा समूह चित्रित करण्याचे कौशल्य व तंत्र आत्मसात करण्याची प्रशिक्षणार्थींना संधी द्यावी. चौकोन, त्रिकोण व गोल या तीन घनांची साधी सोपी मांडणी करुन, त्यांचा आकार रुप, छायाप्रकाशाचा परिणाम साधण्याची क्षमता निर्माण करणे अपेक्षित आहे. (माध्यम- पेन्सिल, पेस्टल्स्, ग्लास मार्किंग पेन्सिल इ.)

२) विविध कोन व दृष्टीपातळीवर मानवनिर्मित विविध आकारमानांच्या वस्तूंचे निरीक्षणातून त्या वस्तूचा मूलभूत आकार ओळखता येणे व त्या आकारावर आधारित वस्तूंचे अचूक रेखांकन करणे अपेक्षित आहे. (माध्यम- पेन्सिल, पेस्टल्स्.)

३) समोर मांडलेल्या वस्तूसमूहाचे रेखांकन करून अपारदर्शक आणि पारदर्शक जलरंग या माध्यमातून छायाप्रकाशाचा परिणाम साधण्याचे कौशल्य संपादन करता येणे. तैलरंग आणि अपारदर्शक रंग या दोन्ही माध्यमांची वैशिष्ट्ये जाणून रंगकाम करण्याची संधी उपलब्ध करुन द्यावी.

४) समोर मांडलेल्या वस्तूसमुहाची सर्वसाधारण रंगसंगती, वस्तुंची मटेरिअल क्वॅालीटी लक्षात घेऊन टिन्टेड पेपरचा रंग निवडता येणे. मध्यम छटांसाठी रंग माध्यमाचा उपयोग करुन परिणाम साधण्याची क्षमता निर्माण करता येणे.

५) वस्तू समुहाची मांडणी करताना मूलभूत आकारावर आधारित मांडणी असावी.

६) मांडणीतून पुरोभूमी, मध्यभूमी, पार्श्वभूमी अशी तीन प्रतले प्रतित व्हावीत.

७) वस्तूच्या आकारांची निवड करताना मोठा, मध्यम, लहान अशा तीनही आकारमानाच्या वस्तू मांडणीत समाविष्ट असाव्यात.

८) पार्श्वभूमीला असलेली ड्रेपरी रंगविताना सूक्ष्म बारकावे टाळून ड्रेपरीचा पोत आणि त्याचा ओघवतेपणा प्रतित होईल असे रंगलेपन असावे.

९) माध्यमाचे वैशिष्ट्ये न सोडता रंगलेपन करताना आवश्यक ते स्वातंत्र्य प्रशिक्षणार्थींना देणे अपेक्षित आहे.

१०) छायाप्रकाशाचा अभ्यास करताना रंगाच्या विविध परिमाणांचा उपयोग करण्याची अपेक्षा आहे. रंगाची विविध मूल्ये, तेजस्वित्ता, तटस्थता इ. चा उपयोग पार्श्वभूमी, पुरोभूमी, ड्रेपरी व वस्तू यामधील अवकाश आणि पडछाया यासाठी करता येते. याची जाणीव प्रशिक्षणार्थींना करुन देण्याची अपेक्षा आहे.

**गुणदान योजना :-**

| अचूक रेखांकन | छायाप्रकाश | मांडणी | रंगलेपन | सादरीकरण | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१. Still Life Drawing - Alan Moss - Chartwell Books, New Jersey
२. Step by step Art School Still Life - Jack Buchon & Jonathan Baker
३. Basic Still Life Techniques - Rachel Wolf - North Light Books Cincinnati
४. Still Life - Walter Foster Series

कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - द्वितीय वर्ष

## ४. विषय - कार्यानुभव (Work Experience)

**घटक - अ) माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (Information & Communication Technology)**

**ब) पुढीलपैकी कोणताही एक - १) शैक्षणिक साहित्य निर्मिती २) नेपथ्य व प्रसंगात्मक सजावट**

**३) भित्तीचित्रण ४) अंतर्गत सजावट ५) बाहुली व मुखवटे बनविणे ६) जाळीमुद्रण**

**1) Educational Teaching Material 2) Stage & Functional Decoration 3) Mural Painting**

**4) Interior Decoration 5) Doll & Mask Making 6) Screen Printing**

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| -- | a) THEORY | 05 | 03 | 60 | 50 | INTERNAL |
| 05 | b) PRACTICAL | -- | 05 | 60 | 50 | EXTERNAL |

**प्रस्तावना:-** तंत्रस्नेही कलाशिक्षक निर्माण व्हावा या उद्देशाने **अ) माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान** हा घटक कार्यानुभवांतर्गत अनिवार्य स्वरूपाचा ठेवण्यात आला आहे. संगणकाचे मूलभूत ज्ञान प्राप्त व्हावे, संगणकाच्या वापराने अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी, अध्यापनात शैक्षणिक साधन म्हणून संगणकाचा वापर करता यावा अशी अपेक्षा आहे.

**'ब')** गटात दिलेल्या सहा घटक-विषयांपैकी कोणत्याही एका घटकाची महाविद्यालयाला निवड करता येईल. कार्यानुभव विषयांतर्गत दिलेल्या या घटक-विषयांतून प्रशिक्षणार्थींमध्ये विविध कौशल्ये प्राप्त होऊन श्रमप्रतिष्ठा व कार्यक्षमतेचे महत्त्व पटवून दिले जाणार आहे, व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण होणार आहे. तसेच शालेय स्तरावरील कार्यानुभव विषयाच्या अध्यापनातही या अभ्यासक्रमाचा उपयोग होईल.

- **विषयाची उद्‌दिष्टे :-**

१. श्रमजीवी लोकांबद्दल आदराची भावना निर्माण करणे.
२. हस्तकौशल्य आणि श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व पटवून देणे.
३. आधुनिक तंत्रज्ञान व मानवी कार्यक्षमता एकमेकांस पूरक राहतील याची जाणीव निर्माण करणे.
४. प्रशिक्षणार्थींमध्ये उद्योजकता विषयीचा दृष्टिकोन निर्माण करणे.
५. निर्मिती तंत्रामध्ये कल्पकता, सृजनशीलतेचा विकास घडवून आणणे.
६. कार्यानुभवातील उपक्रमातून समाजातील उद्योगमुलक कार्याची ओळख करुन घेण्याची संधी देणे.
७. शालेय शिक्षणातील कार्यानुभव विषयाशी सहसंबंध जोडणे.
८. स्वनिर्मिती व नवनिर्मितीचा आनंद मिळविणे.
९. माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान साधनांचा समर्पक उपयोग करण्यास सक्षम करणे.

## अ) माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (Information & Communication Technology)

**प्रस्तावना:-** तंत्रज्ञानाचा गतिमान युगात अद्ययावत ज्ञान प्राप्तीसाठी माहितीचे विविध स्रोत शोधणे, वापर करणे, प्राप्त माहितीचे संकलन व आदान-प्रदान करुन त्या माहितीचा पुनर्वापर करण्यासाठी माहिती व तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे.

माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रचंड प्रगतीमुळे आणि सातत्याने वाढत जाणाऱ्या माहितीमुळे सध्याच्या काळास, तंत्रज्ञानाचे युग म्हणून संबोधले जाते. तंत्रज्ञानाचा वापर करुन शिक्षणाचा दर्जा उल्लेखनीय आणि सकारात्मक सुधारणा करण्याची संधी मिळणार आहे. शिक्षण प्रक्रियेतील पूर्वीच्या अध्यापन पध्दतीला तंत्रज्ञानाची जोड देऊन अध्ययन-अध्यापन अधिक सक्षम व प्रभाविपणे राबविण्यास सुरुवात झालेली आहे. माहिती व दळण-वळणाच्या साधनांमुळे केवळ अभ्यासाची घोकंपट्टी करुन गुण मिळवणाऱ्या पध्दतीला प्रोत्साहन मिळण्यापेक्षा विद्यार्थ्यांची शिक्षणातील गोडी वाढविण्यास मदत होत आहे. माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या मदतीने अध्ययन अध्यापन प्रक्रिया ज्ञानरचनावादी करण्यात मदत होवून त्याव्दारें दृकश्राव्य माध्यमामध्ये ग्राफिक्स आणि ॲनिमेशनच्या सहाय्याने प्रभावी व आकर्षक चलतचित्रे, कार्टून्स थ्री डी चित्रे , पॉवरपॉईंट स्लाईडस् तयार करणे, स्लाईड शो यांसारख्या शैक्षणिक साधनांची निर्मिती करुन पारंपरिक शिक्षणाच्या जोडीला संगणक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास शिक्षणातील गुणवत्तेच्या वाढीला उपयुक्त ठरणार आहे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**
  - संगणकाच्या मूलभूत संकल्पनांची माहिती व उजळणी.
    (संगणक म्हणजे काय ? /संगणकाचा इतिहास /संगणकाचे फायदे व उपयोग /संगणकाचा विकास / संगणकाचे प्रकार आणि संगणकाची कार्यप्रणाली.)
  - हार्डवेअर / सॉफटवेअर म्हणजे काय ? माहिती, ओळख व सराव.
  - संगणक चालविण्याच्या विविध पध्दतींचे फाईल व्यवस्थापन.
    (उदा. विंडोज, मॅक-ओएस (Mac-OS), लिनक्स इत्यादीं)
  - अध्यापनात संगणकाचा वापर.
  - विंडोज ऑपरेटिंग सिस्टीम मधील उपलब्ध चित्रकलेची विविध साधने जसे - पेंट ब्रश, कॅरेक्टर मॅप, वर्ड इत्यादींचा अभ्यास व स्वाध्याय सराव.
  - चित्रकलेसाठी उपयुक्त सॉफ्टवेअरच्या (जसे-स्केचबुक प्रो, आर्टरेज, फोटोशॉप, कोरल ड्रॉ, पॉवर पॉईंट, पेन्सिल इत्यादी) प्राथमिक ज्ञानाचा अभ्यास व स्वाध्याय सराव.
  - आंतरजाल (Internet) चा उपयोग करून कलांच्या उपयुक्त विविध साईटस्‌चा शोध व माहिती.
  - कला अध्यापनात अद्ययावत तंत्रज्ञानाचा शैक्षणिक साधन म्हणून वापर.
- **मार्गदर्शक सूचना :-**

१) पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनचा अध्यापनात उपयोग करणे अपेक्षित आहे.

२) कोरल ड्रॉ, फोटोशॉप मधील पूर्ण केलेले कामाची हार्ड व सॉफ्ट कॉपी जमा करणे आवश्यक आहे.

३) संगणकाचा जादा अभ्यास करण्यासाठी संगणक तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेता येईल.

४) MS-CIT अभ्यासक्रमाच्या आधारे संगणकाचे प्राथमिक ज्ञान मिळवून प्रात्यक्षिकाचा सराव करता येईल.

५) मोबाईलद्वारे कलाअध्यापनासाठी उपयुक्त व्हिडिओ तयार करण्यास प्रोत्साहन देता येईल.

**गुणदान योजना :-**

| विषयज्ञान | आकृतींचा वापर | कौशल्य | कल्पकता | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१. प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि तंत्रज्ञान - डॉ. ह. ना. जगताप, नित्यनूतन प्रकाशन , पुणे

२. माहिती संप्रेषण व तंत्रज्ञान - शं. मा. श्रीराव, सुविचार प्रकाशन, पुणे.

३. माहिती संप्रेषण तंत्रज्ञान - डॉ. किशोर चव्हाण, सनसाईट पब्लिकेशन, नाशिक.

४. संगणक शिक्षण व माहिती तंत्रविज्ञान - प्रा. शरद नागराळे, नित्यनूतन प्रकाशन , पुणे

५. Photoshop - राजेंद मंत्री

६. ICT अंतर्गत शिक्षक हस्तपुस्तिका (इयत्ता ९ ते १२ वी.) एच. एस. सी. बोर्ड, पुणे


**सूचना - १) स्थानिक परीस्थिती, उपलब्ध साधन सामुग्री , प्रशिक्षणार्थींचा कल लक्षात घेवून खालील पैकी कोणताही एक घटक-विषय महाविद्यालयाने कार्यानुभवासाठी निवडावा.**

**२) आवश्यकता भासल्यास महाविद्यालयाला गरजेनुसार निवडलेल्या घटक-विषयात बदल करता येईल.**

## ब) पुढीलपैकी कोणताही एक विषय -

| | | |
|---|---|---|
| **१) शैक्षणिक साहित्य निर्मिती** | **२) नेपथ्य व प्रसंगात्मक सजावट** | **३) भित्तीचित्रण** |
| **४) अंतर्गत सजावट** | **५) बाहुली व मुखवटे काम** | **६) जाळीमुद्रण** |

### ❖ १) शैक्षणिक साहित्य निर्मिती - (Educational Teaching Material) -

**प्रस्तावना :-** कला अध्यापन अधिक प्रभावी करण्याकरीता कलाशिक्षकाने अध्यापनात शैक्षणिक साहित्य वापरणे क्रमप्राप्त आहे. अध्यापकांकडून कल्पक व कलात्मक शैक्षणिक साहित्याची निर्मिती झाली तर अध्यापन अधिक प्रभाविपणे होऊ शकते. शैक्षणिक साहित्य तयार करतांना अधुनिक तंत्रज्ञान व कौशल्याचा उपयोग साहित्य निर्मिती करण्याच्या दृष्टीने प्रशिक्षणार्थी शिक्षकांना उपयुक्त आहे. तसेच पाठ्यक्रमाला अनुसरुन चित्रे, तक्ते, पोस्टर्स, कल्पफलक इत्यादी दृक्साधनांची निर्मिती देखिल करता येईल. स्थानिक परिसरात उपलब्ध होणाऱ्या साधन साहित्याचा शैक्षणिक साहित्य म्हणून अंतर्भाव केल्यास अधिक सुलभ होईल.

- **उद्दिष्टे :-**

१. विविध प्रकारच्या शैक्षणिक साधन-साहित्याची माहिती मिळविणे.

२. प्रभावी अध्यापनासाठी शैक्षणिक साहित्याचे महत्त्व पटवून देणे.

३. स्थानिक परिसरात सहज उपलब्ध होणाऱ्या साहित्यापासून शैक्षणिक साधन-साहित्य निर्मिती करण्यास प्रवृत्त करणे.

४. शालेय शिक्षणातील विविध विषयाच्या अध्यापनासाठी उपयुक्त शैक्षणिक साहित्य निर्माण करणे.

५. शैक्षणिक साहित्य निर्मितीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याचा दृष्टिकोन विकसित करणे.

- **अभ्यासक्रम / पाठयक्रम :-**

१. शैक्षणिक साधन-साहित्याचे प्रकार व त्याची माहिती.

२. शालेय पाठ्यक्रमाला अनुसरून चित्रे, तक्ते, पोष्टर, कल्पफलक, यांसारख्या दृक्साधनांची निर्मिती.

३. तरंगचित्रे, घडी चित्रांची निर्मिती.
४. सरकपट्टी चित्रे (Slides), उर्ध्वशीर्ष (O.H.P.) प्रक्षेपणासाठी उपयुक्त स्लाईडचा अभ्यास व निर्मिती.
५. अध्यापनासाठी उपयोगी पी.पी.टी. (Power Point Presentation) निर्मिती व वापर.
६. मोबाईलद्वारा कलाअध्यापनासाठी उपयुक्त व्हिडिओची निर्मिती.
७. पुठ्ठा, टाकाऊ वस्तू, कागदी लगदा, माती यांसारख्या विविध माध्यमातून अध्यापनासाठी उपयुक्त प्रतिकृती (Model) ची निर्मिती.
८. विविध गीते, ध्वनी, नाट्य, संगीत ध्वनीमुद्रण, सीडी, पेन ड्राईव्ह, मोबाईल इत्यादींचा शैक्षणिक साहित्य म्हणून वापर.

- **मार्गदर्शक सूचना :-**

१. दृक्, श्राव्य, दृक्- श्राव्य प्रकारांतून प्रत्येकी एका शैक्षणिक साहित्याची निर्मिती अपेक्षित आहे.
२. शैक्षणिक साहित्य निर्मितीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाला प्राधान्य देण्यात यावे.
३. कला अध्यापन करताना शैक्षणिक साहित्याचा उपयोग करण्यास विद्यार्थ्यांना प्रवृत्त करता येईल.

**गुणदान योजना :-**

| विषयज्ञान | साधन साहित्याची हाताळणी | कल्पकता / नावीन्य | कौशल्य | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१. मुलांसाठी हस्तव्यवसाय - उद्यम प्रकाशन, धर्मपेठ, नागपूर - १०
२. सर्वांसाठी पुष्प रचना - अ. दि. कोकड, सन पब्लिकेशन, नारायणपेठ, पुणे - ३०
३. निरुपयोगी वस्तुंपासून कलाकुसर - अ. दि. कोकड, सन पब्लिकेशन, नारायणपेठ, पुणे -३०
४. ओरिगामी - अ. दि. कोकड, सन पब्लिकेशन, नारायणपेठ, पुणे -३०
५. कागद आणि कलाकुसर (भाग १ ते ४) - अ. दि. कोकड, सन पब्लिकेशन, नारायणपेठ, पुणे -३०
६. सृजनशील कला निर्मिती (इयत्ता ९ वी ) - एस. एस. सी. बोर्ड, पुणे - ५
७. सृजनशील उपयोजित कला (इयत्ता ९ व १० वी ) - एस. एस. सी. बोर्ड, पुणे -५
८. उपयुक्त कला छंद - प्रतिभा काळे, रोहन प्रकाशन, ३९६ ब-नारायणपेठ, पुणे-३०.
९. कार्यानुभव शिक्षक हस्तपुस्तिका (इयत्ता १ ते ५ पर्यंत) बालभारती, पुणे.


## ❖ २) नेपथ्य व प्रसंगात्मक सजावट (Stage & Functional Decoration) -

**प्रस्तावना:-** सध्या अनेक कौटुंबिक, समाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक प्रसंगी आनंदमय व सौंदर्यपूर्ण वातावरण निर्मितीसाठी सजावट केली जाते. वाढदिवस, विविध सण, उत्सव, सत्कार समारंभ, लग्न समारंभ, निरोप समारंभ, प्रकाशन समारंभ यांसारख्या प्रसंगी स्टेज डेकोरेशनला अधिक महत्त्व आहे. या शिवाय नाटक, सिनेमा व दूरदर्शन वरील अनेक मालिका किंवा करमणुकीचे कार्यक्रम यासाठी नाविण्यपूर्ण सजावटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

पाने, फुले, फुगे, पडदे, रांगोळी, लाकूड, पुट्ठे, विविध रंगीत कागद, धातू, बांबू यांसारख्या साहित्य साधनांची सजावट करता येते. या अभ्यासक्रमातून अशा स्वरुपातील सजावटीकरीता उपयुक्त माहिती प्रशिक्षणार्थींना देण्यात आली आहे. त्याचा उपयोग उच्चशिक्षण व व्यावसायिक दृष्टिकोनातूनही या अभ्यासक्रमाचा फायदा होईल.

- **उद्दिष्टे :-**

१. सौंदर्यदृष्टी वाढीस लावणे.
२. सजावटीच्या विविध प्रकारांची माहिती देणे.
३. सजावटीसाठी उपयुक्त साधन-साहित्य व तंत्राची ओळख करून देणे.
४. सजावटीसाठी उपयुक्त साधन-साहित्य वापरण्याची संधी देणे.
५. प्रसंगानुरूप आवडीनुसार सजावट करण्यास प्रवृत्त करणे.
६. व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण करणे.

- **अभ्यासक्रम / पाठयक्रम :-**

१. घरगुती कार्यक्रमासाठी नैसर्गिक व मानवनिर्मित फुले, पाने, फुगे, रांगोळी यांसारख्या साहित्याचा वापर करून सजावट.
२. रांगोळी, फुले, पाने यांपासून जमिनीवर सुशोभन.
३. शालेय अभ्यासक्रमासाठी उपयुक्त साहित्य वापरून सजावट.
४. विविध साधन-साहित्य, पाने, फुले यांचा वापर करून स्तंभ, फुलदाणी, कमान, महिरप, स्टेजचा भाग यांची सजावट.
५. स्वकल्पनेने एखाद्या कार्यक्रमासाठी रंगमंचाचे (स्टेज) कागदावर नाविण्यपूर्ण आरेखन.
६. तयार केलेल्या आरेखनावरून व्यासपीठ/रंगमंचासाठी (स्टेज) प्रतिकृती तयार करणे, रंगवणे व सजवणे.

- **मार्गदर्शक सूचना :-**

१. प्रशिक्षणार्थींनी स्वतः तयार केलेल्या वेगवेगळ्या सजावटीचे किमान पाच छायाचित्रे (फोटो), एक आरेखन, एक प्रतिकृती जमा करणे आवश्यक आहे.
२. सजावटीसाठी पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करावा.
३. इंटरनेटवर सजावटीचे अनेक यू-ट्युब्ज व websites आहेत, त्याचा अभ्यास करावा.

**गुणदान योजना :-**

| विषयज्ञान | साधन साहित्याची हाताळणी | कल्पकता / नावीन्य | कौशल्य | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि तंत्रज्ञान - डॉ. ह. ना. जगताप, नित्यनूतन प्रकाशन, पुणे.
२. आर्ट ॲन्ड क्राफ्ट - मेधा सुदुंबरेकर, ज्योत्स्ना प्रकाशन, शनिवारपेठ, पुणे-३०.

## ३) भित्तीचित्रण (Mural Painting) -

**प्रस्तावना :-** वास्तूंच्या भिंती, छत सजवण्यासाठी केले जाणारे चित्रण, अलंकरण यास साधारणपणे भित्तीचित्रण म्हटले जाते. अश्मयुगापासून अजिंठा, बाघ, पितळखोरा, सित्तनवासल, पेशवेकालीन भित्तीचित्रणे यासह वारली, मधुबनी सारख्या लोककलांतून भित्तीचित्रण कला विकसित होत समृध्द झालेली आहे. आज तर शाळा-महाविद्यालये, सरकारी कार्यालये, रेल्वे स्टेशन, सार्वजनिक ठिकाणच्या भिंतीवर सामाजिक संदेश देणारी प्रबोधनात्मक भित्तीचित्रणे मोठ्या प्रमाणात केली जाताहेत. हे लक्षात घेऊनच प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकास या विषयांच्या अभ्यासातून भित्तीचित्रण कलेचे तंत्र व माध्यमाची ओळख महत्त्वाची ठरणार आहे. यासह साधन-साहित्य हाताळण्याचे कौशल्ये प्राप्त होणार आहे. तसेच व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण होण्यास चालना मिळणार आहे.

- **उद्‌दिष्टे :-**
  १. सौंदर्यदृष्टी वाढीस लावणे.
  २. वारली, मधुबनी यांसारख्या भित्तीचित्रणाचा अभ्यास करण्याची संधी देणे.
  ३. भित्तीचित्रण, कट्टिमचित्रण यांचे तंत्र माहित करून देणे.
  ४. भित्तीचित्रणाच्या विविध तंत्रांची माहिती देणे.
  ५. भित्तीचित्रण करण्याची संधी देणे.
  ६. व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण करणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**
  १. भित्तीचित्रणाची विविध तंत्रे व माध्यमांचा अभ्यास.
  २. आदिम लोककलांमधील भित्तीचित्रणांची तोंडओळख व अभ्यास.
  ३. अजिंठा अभिजात भित्तीचित्रांतील नमुना भित्तीचित्रण.
  ४. वारली चित्रकलेतील नमुना भित्तीचित्रण.
  ५. वाडा चित्रकलेतील नमुना भित्तीचित्रण.
  ६. सामाजिक संदेश देणारे, स्वकल्पनेने साकारलेले भित्तीचित्रण.

- **मार्गदर्शक सूचना :-**
  १. नमुना चित्रण करून घेत असताना ते अचूक व हुबेहुब रंगविण्यावर भर असावा.
  २. परिसरातील भित्तीचित्रण असलेले स्थळ शोधण्यास प्रवृत्त करून त्या स्थळाला भेट (क्षेत्रभेट) देण्याची संधी उपलब्ध करून देणे.
  ३. वेगवेगळ्या भित्तीचित्रण शैली एकत्र करून परिणाम अभ्यासण्याची संधी देणे.

  **तळटीप :- सदर विषय द्विमित स्वरूपातच अपेक्षित आहे.**

**गुणदान योजना :-**

| विषयज्ञान | साधन साहित्याची हाताळणी | कल्पकता / नावीन्य | कौशल्य | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१. भित्तीचित्रण - विश्वास यंदे, मराठी विश्वकोश
२. दृक् कला आणि आस्वाद - प्रा. जयप्रकाश जगताप, जगताप पब्लिशिंग हाऊस, पुणे.
३. Ajanta Murals - A. Ghosh.
४. Marathi Wall Painting - Dr. B. K. Apte
५. South Indian Paintings - C. Shivaramamurti.
६. The Painted World of Warlis - Yashodhara Dalmia.


## ❖ ४) अंतर्गत सुशोभन (Interior Decoration) -

**प्रस्तावना:-** प्राचीनकाळापासून वास्तूंच्या अंतर्गत सजावटीचे तंत्र वापरले जाते. आधुनिक घरे, निवासस्थाने, सभागृहे, कार्यालये, उपाहारगृहे, धार्मिक स्थळे, चित्रपटघरे, मॉल, शाळा-महाविद्यालये, रुग्णालये यांसारख्या वास्तूंचा आंतरभाग कलात्मक, सुखकर व सुंदर वैविध्यपूर्ण करण्याची कला झपाट्याने वाढत आहे. वास्तूंच्या अंतर्गत सजावटीचे स्वतंत्र तंत्र निर्माण झाले आहे.

लोकांच्या अपेक्षा, अभिरुची, गरजा, वातावरण इत्यादी गोष्टींमधून सजावट करावी लागते. ही एक समिश्र कला आहे. सुतारकाम, लोहारकाम, बांधकाम, रंगकाम, प्रकाश योजना, विद्युत योजना यांच्या एकत्रित कामाने सजावट होते. छत, खिडक्या, दारे, भिंत्ती, दालने, कोपरे यांचे सौंदर्य वाढविण्यासाठी कलात्मक सौंदर्यपूर्ण साहित्य साधनांचा कल्पकतेने वापर करणाऱ्या सध्याच्या कलाकारांना महत्त्व प्राप्त झाले आहे. यापैकी एखाद्या तंत्राचा नाविण्यपूर्ण वापर करुन व्यवसाय करु शकतो. अंतर्गत सजावटीची तोंडओळख या अभ्यासक्रमातून दिली आहे.

- **उद्दिष्टे :-**

१. सौंदर्यदृष्टी अधिक वाढीस लावणे.
२. प्रसिध्द वास्तुच्या अंतर्गत सजावटीची माहिती देणे.
३. अंतर्गत सजावटीसाठी उपयुक्त तंत्रांची ओळख करून देणे.
४. सजावटीसाठी उपयुक्त साधन-साहित्य वापरण्याची संधी देणे.
५. वास्तुच्या एखाद्या भागाचे आवडीनुसार सुशोभन करण्यास प्रवृत्त करणे.
६. व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण करणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**
  १. घरातील अंतर्गत सजावटीसाठी फुलदाणी, शोभेची वस्तू तयार करणे.
  २. विद्यालय-महाविद्यालयातील कोपऱ्यांसाठी (Corners) सजावट.
  ३. पडद्याचा नमुना तयार करणे.
  ४. सजावटीसाठी आवडीनुसार आवडत्या माध्यमात त्रिमित रचनाकृती तयार करून रंगकाम.
  ५. वास्तुच्या एखाद्या दालनाचा स्वकल्पनेने नाविण्यपूर्ण मांडणीच्या (रचना) आराखड्याचे रेखांकन.
  ६. तयार केलेल्या आराखड्यानुसार वरील मांडणीची प्रतिकृती (Model) तयार करणे, रंगवणे व सजवणे.

- **मार्गदर्शक सूचना :-**
  १. प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकांनी स्वत: तयार केलेली फुलदाणी किंवा वैविध्यपूर्ण शोभेची वस्तू महाविद्यालयात जमा करावी.
  २. सजावटीच्या नमुन्याची तीन ते चार छायाचित्रे जमा करावित.
  ३. पडद्याचा नमुना लहान स्वरूपात तयार करून जमा करावा.
  ४. तयार केलेली त्रिमित रचनेची प्रतिकृती जमा करावी.
  ५. सजावटीसाठी पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करावा.
  ६. इंटरनेटवर सजावटीचे अनेक प्रकार पहावयास मिळतात त्याचा अभ्यास करावा.
  ७. परिसरातील जुन्या वाड्यांचा शोध घेऊन त्यातील अंतर्गत सुशोभनाचा अभ्यास करण्यासाठी प्रवृत्त करता येईल.

  **(तळटीप :- सदर विषय प्राथमिक स्वरूपातच अभ्यासला जावा.)**

**गुणदान योजना :-**

| विषयज्ञान | साधन साहित्याची हाताळणी | कल्पकता / नावीन्य | कौशल्य | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. मराठी विश्वकोष - गृहशोभन, लेखक - कानडे, गो. चि. कबनूरकर
२. वेबसाईट - https ://mr. wikipedia.in शिक्षण

## ❖ ५) बाहुली व मुखवटे काम (Doll & Mask Making) -

**प्रस्तावना :-** आनंददायी शिक्षण प्रक्रिया व मनोरंजनासाठी बाहुलीनाट्य व मुखवटे यांना महत्त्व प्राप्त झालेले आहे. याशिवाय सामाजिक प्रबोधन व राष्ट्रीय संदेशाच्या प्रसाराचे एक प्रमुख साधन बनले आहे. शालेय विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील घटकांचे सहजतेने आकलन होण्यासाठी बाहुलीनाट्य व मुखवट्यांचा



एन २२३--११अ

प्रभाविपणे अध्यापनात उपयोग होणार आहे. यादृष्टीने प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकांना बाहुली व मुखवटे कामाची माहिती होणे आवश्यक आहे.

प्रस्तुत अभ्यासक्रमात शालेय शिक्षणात शैक्षणिक साहित्य म्हणून उपयोगी पडणाऱ्या विविध प्रकारच्या बाहुल्या व मुखवटे तयार करण्याची माहिती दिली आहे. प्रात्यक्षिक कार्यातून प्रशिक्षणार्थींना कृती करण्याची संधी मिळणार आहे. त्यातून त्यांचा व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण करण्यास मदत होणार आहे.

- **उद्‌दिष्टे :-**
  - सौंदर्यदृष्टी विकसित करणे.
  - विविध प्राणी, पक्षी यांच्या शरीर रचनेचा अभ्यास करणे.
  - कल्पनाशक्तीच्या विकासाला संधी देणे.
  - बाहुली, मुखवटे या कामातील तंत्रांची माहिती देणे.
  - शैक्षणिक साहित्य म्हणून बाहुली, मुखवटे यांचा वापर करण्याची संधी देणे.
  - व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण करणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**
  - बाहुली व मुखवटे यांसाठी उपयुक्त साधन-साहित्याची माहिती व संकलन.
  - बाहुली व मुखवटे निर्माण करणाऱ्या परंपरागत शैलींची ओळख.
  - बाहुली व मुखवटे कामांच्या तंत्राची माहिती.
  - कापडी बाहुल्या व खेळणी यांची निर्मिती.
  - मोजे, कागदी पिशवी यापासून बाहुली-मुखवटे निर्मिती.
  - कठपुतली, छडी बाहुली तयार करणे.
  - कळसुत्री बाहुल्या व मुखवटे कल्पनापूर्ण तयार करणे.
  - अध्यापनात बाहुल्या, मुखवटे यांचा वापर.

- **मार्गदर्शक सूचना :-**

  १) बाहुली कामातील दोन व मुखवटे दोन नमुने जमा करणे आवश्यक आहे.

  २) शैक्षणिक साहित्य म्हणून बाहुल्या किंवा मुखवटे वापरणे आवश्यक आहे.

  ३) ज्यादा अभ्यासासाठी उपयुक्त यू-टयुब व वेबसाईटचा वापर करावा.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. कळसूत्री बाहूल्या मार्गदर्शिका - मीना नाईक

२. नाट्यदर्शन - पराग घोंगे, विजय प्रकाशन, नागपूर (महा.)

३. कार्यानुभव हस्तपुस्तिका (इयत्ता १ ते ८), बालभारती पाठ्यपुस्तक मंडळ,पुणे.

## ❖ ६) जाळीमुद्रण (Screen Printing) -

**प्रस्तावना :-** कलेमध्ये छपाईकाम विषयाचे महत्त्व जाणून घेऊन त्यातील जाळीमुद्रण विषयातील मुद्रणतंत्राची प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकास ओळख होणे आवश्यक आहे. जाळीमुद्रण करीत असताना प्रात्यक्षिकात येणाऱ्या अडचणी सोडवून, निरीक्षणशक्ती वाढवून, मुद्रण कौशल्य दर्जेदार होणेसाठी स्वाध्यायाची निर्मिती प्रशिक्षणार्थींना करता येणे महत्त्वाचे आहे. जाळी मुद्रणासोबतच या क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती उपलब्ध करुन आत्मसात केल्यास तसेच, छपाई केल्यानंतर निर्माण झालेल्या वस्तूंचे व्यवस्थापन, झालेला खर्चाचा अंदाज घेऊन किंमती ठरवण्याचे तंत्र संपादन करणे महत्वाचे आहे. त्याचे योग्य नियोजन केल्यास या क्षेत्रातील कौशल्य प्राप्त होणार आहे.

- **उद्दिष्टे :-**
  - छपाईकामाचे महत्त्व समजून घेणे.
  - स्क्रीन प्रिंटिंग (जाळीमुदण) तंत्राची ओळख करुन घेणे.
  - स्क्रीन प्रिंटिंगसाठी आवश्यक साधन, साहित्याची ओळख व माहिती घेणे.
  - दर्जेदार छपाईसाठी स्क्रीन प्रिंटिंगचे तंत्र अवगत करणे.
  - शालोपयोगी साहित्य, शैक्षणिक साहित्य, तक्ते छपाई करण्याचे कौशल्य संपादन करणे.
  - छपाई केलेल्या वस्तूचे विक्री व्यवस्थापन, खर्चाचा अंदाज व किंमत ठरविण्याचे तंत्र जाणणे.
  - स्क्रीन प्रिंटिंग क्षेत्रातील आधुनिकीकरणाची माहिती मिळविणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**

१) स्क्रीन प्रिंटिंग म्हणजे काय ?
२) छपाईकामाचे महत्त्व.
३) स्क्रीन प्रिंटिंगसाठी आवश्यक साधन- साहित्याची ओळख व माहिती.
४) फ्रेमवर बोल्टींग क्लॉथ लावण्याची पध्दत.
५) स्क्रीन डिग्रीजिंगची पध्दत.
६) प्रिंटिंगसाठी स्क्रीनची मेकरेडी.
७) स्टेन्सिल पध्दतीने स्क्रीन बनविण्याची पध्दत.
८) डिझाईन (आर्ट वर्क) निर्मिती.
९) स्क्रीन एक्स्पोजिंगची पध्दत.
१०) प्रिंटिंग कामासाठी लागणारी आवश्यक उपकरणे (साहित्य) व शाई.
११) प्रत्यक्ष छपाई.
१२) छापलेले कागद सुकविणे.
१३) विविध रंगांची छपाई.
१४) प्लॅस्टिकवरील छपाई.

१५) रिक्लेमेशन.

१६) स्टिकर्स तयार करणे.

१७) वेल्वेट (फ्लॉक) प्रिंटिंग पध्दती.

१८) खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे.

१९) स्क्रीन प्रिंटिंग मधील आधुनिकीकरण.

- **मार्गदर्शक सूचना :-**

१. फाईल्स, तक्ते, गुणपत्रके, ओळखपत्रे, शुभेच्छा पत्रे, लेबल्स, स्टीकर्स यांसारख्या कार्यालयीन व शालोपयोगी साहित्याची प्राथमिक स्वरूपाची छपाई करणे अपेक्षित आहे.

२. व्यावसायिक विकासाच्या दृष्टीने परिसरातील छपाई कारखान्यास क्षेत्रभेटीचे आयोजन करता येईल.

३. स्क्रीन प्रिंटिंगव्दारा केलेल्या विविध छपाईकामाच्या नमुन्यांचे प्रदर्शन आयोजित करून त्याद्वारे व्यावसायिक दृष्टिकोन विकसित करता येईल.

४. स्क्रीन प्रिंटिंगसाठी आर्ट वर्क छपाई कामाचे नमुने स्वनिर्मित असावे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. स्क्रीन प्रिंटिंगचे तंत्र - सुभाष य. पवार, गो. य. राणे प्रकाशन टिळक पथ, पुणे -३०

२. स्क्रीन प्रिंटिंग व स्टिकर्स शिक्षक हस्तपुस्तिका (इयत्ता ९ व १०) म. रा. माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ, पुणे

***हस्तकलांच्या परंपराचा वारसा -***

*हस्तकला ही एक सर्जक, सौंदर्यात्मक निर्मिती म्हणून शिकविली गेली पाहिजे. तिला इतिहास, सामाजिक व पर्यावरणीय अभ्यास, भूगोल व अर्थशास्त्रामध्ये गुंफता येईल. लिंगभाव, पर्यावरण व समाज विषयक दृष्टिकोन विकसित करणे हा चिकित्सक कलाशिक्षणाचा अंगभूत भाग असला पाहिजे.*

*अभ्यसक्रमात हस्तकलांचा समावेश कलेचे घटक म्हणून होऊ शकतो. यामध्ये सर्जकतेवर व सौंदर्यात्मक आयामांवर भर असेल.*

(पान क्र. ६८) ***राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा -२००५***



कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - द्वितीय वर्ष

## ५. विषय - सैध्दांतिक (Theory)

### घटक - पाश्चिमात्य इतिहास (कला व संस्कृती) - WESTERN HISTORY (Art & Culture)

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| -- | THEORY | 05 | 03 | 80 | 100 | H. A. E. |

**प्रस्तावना :-** शालेय शिक्षणात भारतीय कला इतिहासाच्या विस्तृत अभ्यासासह पाश्चिमात्य कला इतिहासाची ओळख करुन देणे महत्त्वाचे ठरते. पाश्चिमात्य कला इतिहास व त्याची विविधता प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकांमध्ये संक्रमित करण्याची क्षमता निर्माण करणे आवश्यक आहे. जागतिक कलावंतांच्या प्रसिध्द कलाकृतींची वैशिष्ट्ये समजावून घेवून विद्यार्थ्यास ज्ञानसंपादनाची संधी प्राप्त करून देता येईल. या विषयाच्या अभ्यासातून प्रशिक्षणार्थीला जागतिक पातळीवरील विविध कला संस्कृती व शैलीचे ज्ञान देवून आधिक समृध्द करता येईल.

- **उद्दिष्टे :-**
  १) पाश्चिमात्य कला, परंपरा आणि कलावंत इत्यांदींचा अभ्यास करण्याची संधी उपलब्ध करुन देणे.
  २) विद्यार्थ्यांची सौंदर्याभिरुची, रसास्वाद इत्यादी सृजनात्मक गुणांचा विकास घडवून आणणे.
  ३) कला संरक्षण व संवर्धनाचे महत्त्व पटवून देणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**

**पाश्चिमात्य कला -**

**अ) प्रागैतिहासिक कालखंड**

**प्रकरण १. अश्मयुगीन कला- ठळक वैशिष्ट्ये**
- चित्र- अल्तामिरा येथील विसावलेला गवा
- शिल्प- व्हीनस ऑफ विलेंडार्फ.
- वास्तू- स्टोनहेंज येथील उपासना वर्तुळ

**ब) प्राचीन कालखंड**

**प्रकरण २. इजिप्शियन कला- ठळक वैशिष्ट्ये**
- चित्र- वाद्य वाजविणाऱ्या स्त्रिया
- शिल्प- ॲखनातेन आणि त्याचे कुटुंब
- वास्तू- पिरॅमिड - अंतर्गत रचना (खुफूचा पिरॅमिड )

**प्रकरण ३. मेसोपोटेमियन कला- ठळक वैशिष्ट्ये**
- चित्र- सुसा येथील पेला (सुमेर)
- शिल्प- १) मृत्यूपंथाला लागलेली सिंहीण (असीरिया), २) पंखयुक्त बैल (असीरिया), ३) नरमसिन राजाची स्मारकशिला (अक्कड),
- वास्तू- झिग्गुरात (सुमेर)

**प्रकरण ४. ग्रीक कला ठळक वैशिष्ट्ये**

- चित्र- विविध आकारांच्या भांड्यावरील चित्रकला
- शिल्प- आर्ष काळापासून हेलेनिस्टीक काळापर्यंत शिल्पकलेच्या प्रगतीचा आढावा.

  आर्ष काळ- कुरॉस आणि कोरे

  अभिजातकाळ- १) भालाईत (पॉलिक्टीटस्) २) डायोनिसस बालकांसह हर्मिस,
  ३) जखमी निओबीड (स्कोपास)

  संक्रमणकाळ- थाळीफेक्या (मिरॉन)

  हेलेनिस्टीक - १) सोमेथ्रेसची विजयदेवता, २) लाओकून
- वास्तू - डोरिक, आयोनिक व कोरिंथिअन स्तंभ शैलींचा अभ्यास व तुलना उदा. पार्थेनॉन मंदीर (ॲक्रोपोलिस टेकडी)

**प्रकरण ५. एतृस्कन व रोमन कला- ठळक वैशिष्ट्ये**

- शिल्प - ट्रॉजनचा विजयस्तंभ
- वास्तू - पॅथेऑन मंदीर

## क) मध्ययुगीन कालखंड

**प्रकरण ६. बायझंटाईन कला - ठळक वैशिष्ट्ये**

- चित्र - १) सचित्र हस्तलिखिते, २) मोझाईक चित्रे.
- वास्तू- हाजिया सोफिया चर्च.

**प्रकरण ७. गॉथिक कला- ठळक वैशिष्ट्ये**

- चित्रकार जिओत्तो, डुच्चिओ, व्हॅन आईक व त्यांची चित्रे
- रंगीत काचचित्रे

**प्रकरण ८. प्रबोधनकालीन कला- ठळक वैशिष्ट्ये**

- पूर्व प्रबोधनकाळ- बोतिचेल्ली, मसाच्चिओ (चित्रकार), दोनातेल्लो (शिल्पकार)
- उच्च प्रबोधनकाळ- लिओनार्दो द विंची, मायकेल एंजेलो, राफाएल, तिशियन

**प्रकरण ९. बारोक कला - ठळक वैशिष्ट्ये**

- चित्रकार रुबेन्स्, रेम्ब्रॉ, व्हेलाझक्वेझ, व शिल्पकार बर्निनी.

## ड) आधुनिक कालखंड

**प्रकरण १०. आधुनिक कला - विविध कलाप्रवाह**

नव अभिजातवाद, स्वच्छंदवाद, दृक्प्रत्ययवाद, उत्तर दृकप्रत्ययवाद, नव-दृक्प्रत्ययवाद, घनवाद, पशुवाद, अतिवास्तववाद, अमूर्त अभिव्यक्तीवाद व त्यातील प्रमुख दोन कलावंत व त्यांच्या कलाकृती.

## इ) समकालीन कला

**प्रकरण ११. समकालीन कलावंत व कला चळवळ**

मार्क शगाल, फ्रान्सिस बेकन, हेन्री मूर, अँन्ड्रू वेईथ, अलेक्झांडर काल्डर, बौहाऊस, द ब्रिज आणि ब्लू रायडर कला चळवळ ठळक वैशिष्ट्ये व प्रमुख कलावंत.

**प्रकरण १२. रसग्रहणात्मक अभ्यास** - १) विसावलेला गवा - अल्तामिरा, २) खुफूचा पिरॅमिड, ३) मृत्यूपंथाला लागलेली सिंहीण, ४) लाओकून, ५) पँथेऑन मंदिर, ६) द लास्ट सफर- लिओनार्दो द व्हिंची, ७) पिएत्ता - मायकेल एंजेलो, ८) बर्थ ऑफ व्हिनस - बोतिचेल्ली, ९) ल्युसिपसच्या मुलीचे अपहरण - रूबेन्स, १०) नाईट वॉच - रेम्ब्रॉ, ११) द स्टारी नाईट - व्हॅनगॉख, १२) द परसिस्टन्स ऑफ द मेमरी - साल्वादोर दाली, १३) ग्वेर्निका - पाब्लो पिकासो, १४) द क्राय - एडवर्ड मुंक, १५) द ब्ल्यू पोल्स - जॅक्सन पोलाक.

- **मार्गदर्शक सूचना :-**

१) शिक्षकाने वेगवेगळ्या कालखंडातील उद्दिष्टे, माध्यम शैली यांत उत्तरोत्तर होत गेलेल्या बदलांची प्रशिक्षणार्थींना जाणीव करुन देणे अपेक्षित आहे.

२) विषयाशी संबंधित संदर्भ पुस्तके, पारदर्शिका, प्रतिकृती तसेच पी. पी. टी., सीडी, इंटरनेट यांसारख्या अद्ययावत तंत्रज्ञानाचा अध्यापनात प्रामुख्याने वापर करता येईल.

३) उत्तर लेखन करताना समर्पक आकृत्या काढण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करावे.

**महत्त्वाची टीप :- परीक्षेत रसग्रहणासाठी कोणत्याही एका कृष्णधवल किंवा रंगीत कलाकृतीचा छापील नमुना दिला जाईल. रसग्रहणाचा हा प्रश्न अनिवार्य राहील.**

**गुणदान योजना :-**

| विषयाची समर्पक माहिती | रसग्रहण/मुद्देसुद मांडणी | आकृती | एकूण गुण |
|---|---|---|---|
| | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) पाश्चिमात्य कलेचा संक्षिप्त इतिहास - प्रा. श्रीधर शहाणे - गो. य. राणे प्रकाशन, मुंबई.
२) पाश्चात्य कलेचा इतिहास - प्रा. जयप्रकाश जगताप - जगताप पब्लिसिंग हाऊस, पुणे.
३) दहा महान चित्रकार- दु. पा. कुलकर्णी - वरदा बुक्स, पुणे.
४) कलेचा इतिहास व रसग्रहण शिक्षक हस्तपुस्तिका (इयत्ता १२ वी) एच. एस. सी. बोर्ड, पुणे.
५) शिखरे रंगरेषांची- रवि परांजपे,चंद्रकला प्रकाशन, पुणे.
६) कॅनव्हास - अच्युत गोडबोले / दीपा देशमुख, मनोविकास प्रकाशन.
७) The History of World Art- Bernard S . Myers - Hamlyn Publishing Group Ltd, London.
८) 100 Famous Paintings- Marina Vaizey - Tiger Books International, London.
९) A History of Fine Arts in India & the West - Edith Tomory, Orient Longman[ Hyderabad.
१०) The Great Artists Vol. (Part 01 to 96)- Marshall Cavendish Ltd 1985 London.
११) How to recognize Greek Art - Penguin Books, New York.
१२) History of Western Art - Laurie Adams.
१३) History of Western Art - Petee Whifield.
१४) The History of Western Art - Sandhya Ketkar
१५) The Oxford History of Western Art-Marin Kemp.
१६) History of Art - H. W. Janson.
१७) The Handy Art History Answer Book- Madelynn Dickerson.

कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - द्वितीय वर्ष

**५. विषय - सैध्दांतिक** (THEORY)

**घटक - शैक्षणिक मानसशास्त्र व शिक्षणशास्त्र (Educational Psychology & Education Theory)**

| MIN ASGMT. | NATUTE OF ASGMT | TUTORIAL | EXAM. HRS | TEACHING HRS. | MARK | VALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| ---- | THEORY | 05 | 03 | 80 | 100 | H. A. E |

**प्रस्तावना :-** शालेय शिक्षणात अध्यापन करीत असताना प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाला विद्यार्थी हिताच्या दृष्टिकोनातून मानसशास्त्राची ओळख असणे गरजेचे आहे. तसेच प्रशिक्षणार्थीला अभ्यासांती स्वतःच्या भावनेची मानसशास्त्रीय दृष्टीने कलेव्दारे अभिव्यक्ती करता येणे आवश्यक असते. या विषयाच्या अभ्यासानंतर प्रशिक्षणार्थीला स्वतःच्या अध्यापन कल्पना, विविध तंत्रपध्दती आणि माध्यम यांना प्रयोगशील व शोधक वृत्तीव्दारे चालना देणे शक्य होणार आहे. अध्यापन पध्दतीमध्ये गतकाळातील तज्ज्ञ व महान विचारवंतांचे शिक्षण विषयक विचार समजून घेऊन अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत त्यांचे विचारांचा वापर करण्यासाठी चालना मिळणार आहे.

- **उद्दिष्टे :-**
  १) प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकांच्या भावनेची मानसशास्त्रीय दृष्टीने कलेद्वारे अभिव्यक्ती करता येणे.
  २) प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकांच्या स्मृती व निरीक्षणशक्तीची सुधारणा करून सर्वांगीण विकास करणे.
  ३) मानसशास्त्र अभ्यासक्रमातून विविध प्रकारचे अनुभव घेऊन निरनिराळ्या क्षमता वाढीस लावणे.
  ४) प्रशिक्षणार्थींना स्वकल्पनां, विविध तंत्रे आणि माध्यमांना प्रयोगशील व शोधकवृत्तीद्वारा चालना देणे.
  ५) कला अध्ययनाविषयी अभिरूची निर्माण करणे व शिक्षणशास्त्रातील विविध अध्यापन पद्धतींचे महत्त्व पटवून देणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**

**प्रकरण १ : कला आणि भावना**

प्रस्तावना

भावना म्हणजे काय ?

भावना कशी निर्माण होते

कला आणि भावना, स्थिर भाव - शैक्षणिक महत्त्व

**प्रकरण २ : संवेदना व अवबोध**

संवेदना व अवबोध - संकल्पना, कला शैक्षणिक महत्त्व

**प्रकरण ३ : कल्पना**

प्रतिमा, स्मरण आणि कल्पना

कल्पनांचे प्रकार - रचनात्मक कल्पना, व्यावहारिक कल्पना, सौंदर्यनिष्ठ कल्पना, स्वैर किंवा अनिर्बंध कल्पना.

**प्रकरण ४ : व्यक्तिभेद**

व्यक्तिभेदाची कारणे

व्यक्तिभेदाचे प्रकार

**प्रकरण ५ : सहजप्रवृत्ती**

संकल्पना

कलाशिक्षणाच्या दृष्टिने महत्त्वाच्या दोन प्रवृत्ती - अ) निर्माण प्रवृत्ती ब) संचय प्रवृत्ती

सहजप्रवृत्तीचे निरोधन व उदात्तीकरण - आत्मविधान प्रवृत्ती, युद्ध प्रवृत्ती, काम प्रवृत्ती, संचय प्रवृत्ती, नवनिर्माण प्रवृत्ती.

**प्रकरण ६ : अभ्यासक्रम व पाठ्यक्रम**

अभ्यासक्रम म्हणजे काय ?

अभ्यासक्रम व पाठ्यक्रम यातील फरक

**प्रकरण ७ : अध्यापनाचे नियोजन, पाठाचे प्रकार आणि अध्यापन पद्धती.**

वार्षिक नियोजन, घटक नियोजन, पाठ नियोजन

ज्ञानपाठ, कौशल्यपाठ/कृतीपाठ, रसग्रहणपाठ

वर्गाध्यापनाची उद्‌दिष्टे - ज्ञान, आकलन, उपयोजन, कौशल्य

उद्‌गामी पद्‌धत, अवगामी पद्‌धत, क्रिडण पद्‌धत

चर्चा पद्‌धती - अ) चर्चासत्र ब) कृतीसत्र

कलेचा इतिहास - अध्यापन पद्‌धती

मुक्providedाविष्कार व मार्गदर्शित कृती

**प्रकरण ८ : शैक्षणिक साधने**

शैक्षणिक साधनांचे महत्त्व - वस्तू, नमुने, छायाचित्रे, चित्रे, आकृत्या, नकाशे, आलेख व डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर.

**प्रकरण ९ : शिक्षण पद्‌धती**

१) **मॉन्टेसरी पद्‌धती**

प्रमुख तत्त्वे, कर्मेन्द्रियांचा वापर, इन्द्रिय शिक्षण (Sense - Training), लेखन, वाचन.

२) **गुरुकुल शिक्षण पद्धती**

प्राचीन भारतीय गुरुकुल शिक्षण पद्धती.

३) **बालोद्यान / किंडरगार्टन पद्‌धती**

मूलतत्त्वे व वैशिष्ट्ये

४) **प्रकल्प पद्‌धती**

व्याख्या व उदाहरणे

प्रकल्पाचे अहवाल लेखन

उद्‌दिष्ट्ये व कार्यपद्‌धती

कलाशिक्षण आणि प्रकल्प

**प्रकरण १० : शिक्षणविषयक विचार - संकीर्ण टिपा :**

१) स्वामी विवेकानंद
२) महात्मा गांधी
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर
४) महात्मा फुले, सावित्रीबाई फुले
५) रविंद्रनाथ टागोर
६) बालभवन संस्थेचे कार्य
७) विनोबा भावे

- **मार्गदर्शक सूचना :-** १) प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकांना त्याच्या क्षमतेनुसार विस्तृत माहिती द्यावी.
  २) सदर विषयातील ज्ञानाचा उपयोग प्रशिक्षणार्थींनी आपल्या सराव पाठात करणे अपेक्षित आहे.

**गुणदान योजना :-**

| विषयाची समर्पक माहिती | रसग्रहण/मुद्देसुद मांडणी | आकृती | एकूण गुण |
|---|---|---|---|
| | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :**


१) शालेय कला शिक्षण - प्रा. श्रीधर शहाणे, गांगल प्रकाशन, गिरगांव, मुंबई.
२) शैक्षणिक मानसशास्त्र व शिक्षणशास्त्र - सौ. सुप्रिया पाटील, मयुरेश प्रकाशन, सांगली.
३) कला अध्यापन - प्रा. जयप्रकाश जगताप, जगताप पब्लिशिंग हाउस, पुणे.
४) शिक्षक प्रशिक्षण - डॉ. वासंती फडके, गांगल प्रकाशन, गिरगांव, मुंबई.
५) शैक्षणिक मानसशास्त्र व शिक्षणशास्त्र - डॉ. जे. के. बोरोले, उषा प्रकाशन, औरंगाबाद.




कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - द्वितीय वर्ष

**५. विषय - सैध्दांतिक (THEORY)**

**घटक - शालेय शिक्षण, कलाशिक्षण व मूल्यमापन**

**(School Education, Art Education & Evaluation)**

| MIN ASGMT. | NATUTE OF ASGMT | TUTORIAL | EXAM. HRS | TEACHING HRS. | MARK | VALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| --- | THEORY | 05 | 03 | 80 | 100 | INTERNAL EXAM. |

**प्रस्तावना :-** शालेय शिक्षणात कलाशिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकास अध्यापनासह कलाशिक्षण क्षेत्रातील विविध घडामोडी, ध्येय-धोरणे व राष्ट्रीय/राज्यस्तरीय अभ्यासक्रमात घडत असलेले बदल माहिती असणे गरजेचे आहे. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यामापन पध्दतीने निर्धारित केलेली मूल्यमापनाची विविध साधनतंत्रे आणि गुणदानाचे निकषाचा वापर करून कलाशिक्षणाचे मूल्यमापन करण्याची पध्दती माहिती करून घेणे आवश्यक आहे, तसेच राष्ट्रीय व राज्यस्तरीय कलाशिक्षण व्यवस्था समजून घेणे आवशक आहे. शासनाच्या विविध योजनेत अंतर्भाव असलेले कलाशिक्षण धोरण प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाला समजणे आवश्यक आहे.

- **उद्दिष्टे :-**
  १) राष्ट्रीय / राज्य शालेय शिक्षण व अभ्यासक्रमाची माहिती देणे.
  २) शालेय शिक्षणातील कलाशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणे.
  ३) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धती विषयी माहिती देणे.
  ४) विविध राष्ट्रीय/राज्य शैक्षणिक धोरणे व उपक्रमांची माहिती मिळवणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**

**प्रकरण १. शालेय शिक्षण**

- राष्ट्रीय शालेय शिक्षण व्यवस्था.
- महाराष्ट्रातील शालेय शिक्षण व्यवस्था.

**प्रकरण २. शैक्षणिक प्रशासन संरचना**

- केंद्र स्तर, राज्य स्तर, जिल्हा स्तर, तालुका स्तर.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP)
- राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCF)
- राज्य अभ्यासक्रम आराखडा (SCF)
- राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली. (NCERT)
- महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, (विद्या परिषद) पुणे (MSCERT)

**प्रकरण ३. प्राथमिक शिक्षणाच्या समस्यांवरील उपाय**

- संपूर्ण साक्षरता अभियान
- निरंतर शिक्षण योजना
- जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम.
- सर्व शिक्षा अभियान.
- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार-अधिनियम.
- मोफत व सक्तीचा शिक्षण कायदा (RTE Act-२००९)
- मध्यान्ह भोजन, उपस्थिती भत्ता व अन्य शासकीय उपाययोजना.

**प्रकरण ४. कलासंचालनालयाची कार्ये**

१) कलासंचालनालयाची कार्ये व उपक्रम.
२) महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन
३) वार्षिक तपासणी.
४) शासकीय रेखाकला व उच्चकला परीक्षा.
५) बाल चित्रकला व इतर स्पर्धा.
६) अभ्यासाचे वार्षिक नियोजन.
७) स्थिरचित्र अध्यापनासाठी आवश्यक साधन-सामग्री.

**प्रकरण ५. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन**

- मूल्यमापनाची साधन तंत्रे.
- आकारिक व संकलित मूल्यमापन.
- कलाशिक्षणासाठी मूल्यमापन.
- वर्णनात्मक नोंदी.

**प्रकरण ६. संकीर्ण टिपण -**

- कलाशिक्षणाच्या विकासाकरीता विविध उपाय योजना.
- कलादालन, संग्रहालये. वारसा स्थळे - महत्त्व व गरज.
- कलेसाठी दिले जाणारे पुरस्कार व शिष्यवृत्ती.
- उच्च कलाशिक्षणाच्या वाटा व व्यवसायाच्या संधी.
- भारतीय पुरातत्त्व विभाग व त्याची कार्ये.
- कलाकृती रसग्रहणाचे कलाशिक्षणात महत्त्व.
- डिजिटल क्लास रूम.
- ज्ञानरचनावादी शिक्षण.
- दिव्यांग व विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांचे शिक्षण.
- वंचित घटकांचे शिक्षण.
- मूल्यशिक्षण.
- गाभा घटक.

- **मार्गदर्शक सूचना :-**

  १. शासन स्तरावर वेळोवेळी बदलणारी ध्येयधोरणे, राष्ट्रीय/राज्य शैक्षणिक आराखडा, RTE Act-२००९, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन इत्यादींची भूमिका स्पष्ट करणे अपेक्षित आहे.

  २. विविध स्वरूपात ललित कलाविषयक उपक्रम राबविण्याऱ्या संस्थांकडे क्षेत्रभेटीचे आयोजन करता येईल.

  ३. कला जगतात नवनवीन कलाप्रवाहांची जाणीव करून देणे.

  ४. प्राथमिक /माध्यमिक शिक्षणाच्या पध्दतींवर चर्चा करणे अपेक्षित आहे.

**गुणदान योजना :-**

| विषयाची समर्पक माहिती | मुद्देसुद लेखन | नेमकेपणा | एकूण गुण |
|---|---|---|---|
| | | | १० |

टीप :- स्वाध्याय स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३०

२) राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा - २००५, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली.

३) बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम -२००९, म. रा. शै. संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३०

४) राज्य अभ्यासक्रम आराखडा - २०१०, (शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन), म. रा. माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ, पुणे

५) प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - २०१२, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३०

६) Museumlogy - Anupam Bhatnagar, Sandeep Books, Delhi.

७) Fundamentals of Museumlogy - M. L. Nigam, Navhind Prakashan.


*स्वत:च्या भावभावना नीट समजून घेऊन त्यांच्यावर नियंत्रण मिळवता येणे आणि समाजात आत्मविश्वासाने, समंजसपणे तसेच जबाबदारीने वागता येणे यासाठी आत्मभान किंवा 'स्व' ची जाणीव (Self awareness), समानानुभूती (Empathy), व्यक्तीव्यक्तींमधील संबंध (Interpersonal relations), संवाद, भावनांचे व ताणतणावांचे समायोजन ही कौशल्ये महत्त्वाची आहेत. ती विशेषत: भाषा, सामाजिक शास्त्रे, कला, क्रीडा, कार्यानुभव या क्षेत्रांतून जाणीवपूर्वक विकसित केली जातील.*

(पान क्र. १२) ***राज्य अभ्यासक्रम आराखडा -२०१०***

## ६. विषयाचे नाव : कलाभिव्यक्ती (मौखिक परीक्षा) Art Expression (Viva)

| MIN ASGMT. | NATUTE OF ASGMT | TUTORIAL | EXAM. HRS | TEACHING HRS. | MARK | VALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| 05 | PRACTICAL | -- | Maximum 10 Minutes | 40 | 50 | EXTERNAL |

**प्रास्तावना** - शालेय स्तरावर कला विषयाचे अध्यापन करताना चित्रकला व हस्तकलेबरोबरच गायन-वादन व नृत्य-नाट्यकलेतील आविष्कारही शालेय विद्यार्थ्यांकडून करून घेण्याची जबाबदारी कलाशिक्षकाची आहे. त्यासाठी सर्व कलांमधील प्राथमिक स्वरुपाचा किमान अनुभव घेणे ही प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाची आता गरज आहे. या अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षात प्रशिक्षणार्थींनी या विषयाचे तात्त्विक ज्ञान घेतले आहे व त्यावर अंतिम परीक्षेमध्ये १०० गुणांची परीक्षाही दिलेली आहे. त्यामुळे व्दितीय वर्षात त्यांना ललित कलांमधील प्रात्यक्षिक सादरीकरणाचा अनुभव घेता येणार आहे.

- **उद्दिष्टये :-**
  १) मनातील भाव-भावना व्यक्त करण्याची संधी देणे.
  २) संगीत -नाट्य शिकण्यासाठी प्रवृत्त करणे.
  ३) शास्त्रीय नृत्य, लोकनृत्य, लोकगीते यांचा परिचय करून देणे.
  ४) अभिनयाचे प्रकार व नवरस यांची माहिती देणे.
  ५) सभाधिटपणा, समयसूचकता व संवाद कौशल्यांचा विकास करणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**

कलाभिव्यक्ती घटकाची मौखिक परीक्षा शालेय शिक्षणातील प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम -२०१२ (इयत्ता १ ते ८) करिता निर्धारित केलेल्या कलाशिक्षण विषयातील **नृत्य, नाट्य, संगीत** या कलागटाच्या अभ्यासक्रम/पाठ्यक्रमावर ( उदा. माहिती / परिचय / प्रात्यक्षिक इत्यादी ) आधारित असावा.

**१) नृत्य -**

- असंयुक्त व संयुक्त हस्तमुद्रांचा परीचय व सादरीकरण.
  (**असंयुक्त हस्तमुद्रा** - अर्धचंद्र, मुष्ठी, शिखर, कपित्थ, सूची. **संयुक्त हस्तमुद्रा** - शंख, गरूड, मत्स्य, उत्संग इ.)
- **रस परिचय** - नवरसांपैकी आवडीच्या कोणत्याही एका रसाचे ध्वनी व चेहऱ्यावरील भावदर्शनातून सादरीकरण.
- विविध प्रांतातील लोकनृत्याद्वारे तेथील संस्कृती, भाषा आणि वेशभूषा-केशभूषेचा परिचय व माहिती.
  (उदा. भांगडा - पंजाब / गरबा - गुजरात / घुमर - राजस्थान / लावणी - महाराष्ट्र इत्यादी.)

- नृत्यप्रकारातील कोणतेही एक नृत्य (भरतनाट्यम, कथ्थक, गरबा, भांगडा, बाल्यानृत्य, कोळीनृत्य, गोंधळ, भोंडला, वाघ्या-मुरळी, जोगवा यांसारखे) साभिनय सादरीकरण.
- एखादा शास्त्रीय किंवा आवडीच्या विशेष, नावीन्यपूर्ण नृत्यप्रकाराचे सादरीकरण. (वैकल्पिक)
- कोणत्याही एका नामवंत नर्तक/नर्तिका कलावंताचा थोडक्यात परिचय.

२) **नाट्य -**

- परिचित व्यक्ती, प्राणी, पक्ष्यांची हालचाल व आवाजाची नक्कल सादरीकरण.
- दैनंदिन प्रसंगाचे मूक अभिनयाद्वारे सादरीकरण.
- नाटक किंवा चित्रपटातील एखाद्या विशिष्ट व्यक्तिरेखेच्या तोंडचे संवाद अभिनयातून सादरीकरण. (वैकल्पिक)
- प्राथमिक कला शिक्षणातील वर्ग नाट्यगृह (Classroom Theatre) संकल्पना विशद करणे.

**३) संगीत -**

**गायन - राष्ट्रगीत, वंदेमातरम् किंवा देशभक्तीपर गीताचे ताल-सुरात गायन.**

- महाराष्ट्रातील लोकसंगीत प्रकारातील कोणत्याही दोन लोकगीतांचे गायन/सादरीकरण. (उदा. पोवाडा, भारूड, कोळीगीत, भोंडल्याची गीते, वासुदेव गीत, जात्यावरची गाणी, शेतावरची गाणी इ.)
- आरोह-अवरोह, स्वरालंकार इत्यादीचे प्रात्यक्षिकाद्वारे सादरीकरण.
- कोणत्याही नामवंत गायक कलावंताचा थोडक्यात परिचय.

**वादन - ध्वनिमुद्रिकेद्वारा ऐकविलेल्या गीतावर हातांच्या टाळ्यांचा ठेका धरुन टाळ्या वाजविणे.**

- टिपऱ्या, खंजिरी, टाळ, बासरी यांसारख्या एका वाद्यांवर ठेका धरून सादरीकरण.
- स्वतंत्रपणे कोणतेही एखादे वाद्य वाजविण्यासाठी संधी व प्रोत्साहन. (वैकल्पिक)
- वाद्यप्रकारानुसार वर्गीकरण करून वाद्याची माहिती विशद करणे.
- कोणत्याही एका नामवंत वादक कलावंताचा थोडक्यात परिचय.

- **मार्गदर्शक सूचना :-**

१) प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम -२०१२ नुसार कलाशिक्षण विषयाची पुढील तीन गटात नव्याने विभागणी केली आहे. **१) चित्र-शिल्प, २) संगीत** (गायन-वादन-नृत्य), **३) नाट्य** (पूरक माहितीसाठी अभ्यासक्रमाचे अवलोकन करावे.)

२) कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षातील प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाला कलाभिव्यक्ती सादरीकरण करण्यासाठी पूर्वसूचना देऊन आवश्यक त्या बाबी शोधून संकलित करून ठेवण्यास सांगावे. उदा. एखादे गीत, नाट्य उतारा, कविता इत्यादी. ज्याचा वापर त्यांना प्रयोगात्मक कलेतून सादरीकरण करण्यासाठी करता येईल.

३) दैनंदिन व्यवहारातील गोष्टींतूनच विद्यार्थी अनेक विषय शिकत असतात. अदबशीरपणा, समूहाची शिस्त, राष्ट्रभक्ती, नीटनेटकेपणा यांसारखी मूल्ये अंगी बाणवतात, त्यामुळे

कलाभिव्यक्तीच्या तोंडी परीक्षेतून प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाकडूनही अशाप्रकारचे सादरीकरण करून घेणे अपेक्षित आहे.

४) एकावेळी एकाच प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाची मौखिक परीक्षा घेण्यात यावी.

५) **मौखिक परीक्षेकरीता जास्तीतजास्त १० मिनिटांचा कालावधी असेल.**
(नृत्य, नाट्य आणि संगीत प्रात्यक्षिक सादरीकरणासाठी जास्तीत जास्त दोन ते तीन मिनिटांचा वेळ असेल.)

**गुणदान योजना :-**

| स्पष्ट शब्दोच्चार किंवा ध्वनी | स्वर-तालाचे तंत्रकौशल्य | देहबोली वापर | विषय निवड | आत्मविश्वास | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | १० |

टीप :- मौखिक परीक्षेचे स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१. प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - २०१२, म. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

२. शिक्षक प्रशिक्षण मार्गदर्शिका (इयत्ता १ ते ५), म. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

३. कलाशिक्षक पालक हस्तपुस्तिका (इयत्ता १ ते ८) बालभारती, पुणे.

४. कला म्हणजे काय ? लेखक महर्षि टॉलस्टॉय, (अनुवादक-साने गुरूजी) जगताप पब्लिशींग हाऊस, पुणे.


*एक विषय म्हणून कलेची, सर्व स्तरांवर शिफारस करण्यात आलेली आहे, व त्यात संगीत, नृत्य, दृककला व नाटय/रंगभूमी या चार मुख्य क्षेत्रांचा समावेश असावा. त्यात निव्वळ निर्देशनवजा अध्यापनावर नव्हे तर आंतरक्रियात्मक पद्धतींवर भर द्यावा. कारण कलाशिक्षणाचे ध्येयच आहे, की सौंदर्यदृष्टी, वैयक्तिक जाणीव व विविध कलामाध्यमांद्वारे स्वतःला व्यक्त करण्याची क्षमता यांचा विकास व्हावा. भारताच्या पारंपरिक हस्तकलांचे सौंदर्यमूल्य व आर्थिक मूल्य शालेय शिक्षणात समर्पक व अर्थपूर्ण आहे हे ओळखले पाहिजे.* (पान क्र. ०८) ***राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा -२००५***

***नाटकाचे शिक्षण -***

*नाटक हा सर्वात जास्त सामर्थ्यवान प्रकारापैकी एक आणि तरीही सर्वात कमी वापर होणारा शिक्षणाचा प्रकार आहे. 'स्व' च्या इतरांशी असलेल्या संबंधाचा शोध घेण्यासाठी 'स्व' बद्दलची जाण विकसित होण्यासाठी आणि इतर माणसांप्रतीच नव्हे तर नैसर्गिक, भौतिक व सामाजिक जगाशी चिकित्सक सहवेदना वृध्दींगत होण्यासाठी नाटक हे सर्वोत्कृष्ट माध्यम आहे.*

(पान क्र. ६७) ***राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा -२००५***

कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम - द्वितीय वर्ष

## ७. विषय :- वर्गकाम (Class Work)

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| 80 | PRACTICAL & THEORY | 20 | -- | -- | 100 | INTERNAL MARKS |

**प्रस्तावना :-** कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रम द्वितीय वर्षाच्या अभ्यासातून परिपूर्ण कलाशिक्षक घडणे अपेक्षित आहे. प्रथम वर्षातील प्रात्यक्षिक व सैध्दांतिक विषयांतील अभ्यासाने त्यांच्या अनुभवात वाढ होणार आहे. द्वितीय वर्षात वर्गकाम नियमितपणे पूर्ण करणे आवश्यक आहे, प्रत्येक घटक विषयात निर्धारित केलेले वर्गकामाचे मूल्यांकन योग्य पध्दतीने झाल्यास प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाची विविध कौशल्ये समृध्द व विकसित होतील.

सराव पाठात घटक निहाय दिलेल्या अपेक्षा पूर्ण होतील. शैक्षणिक साधने व संगणकाचा योग्य वापर करणे आवश्यक असणार आहे. मौखिक परीक्षा, प्रकल्प, वर्षभरातील सैध्दांतिक व प्रात्यक्षिक यातील कौशल्ये विकसित होऊन सुजाण कलाशिक्षक निर्माण होईल.

- **मार्गदर्शक सूचना :-**

१. प्रथम आणि द्वितीय सत्रातील स्वाध्याय (Tutorials) / प्रात्यक्षिक कामाचा वर्गकामात समावेश राहील.

२. वर्गकामाचे मूल्यांकन (गुणदान) नियमित करणे व नोंदविणे आवश्यक आहे.

३. पोर्टफोलिओ मधील प्रात्यक्षिक/स्वाध्याय कामासाठी १/२ इंपिरिअल आकाराचा कार्टीज पेपर वापरण्यात यावा. **(व्यक्तिरेखांकन प्रात्यक्षिक / स्वाध्याय कामासाठी १/४ इंपिरिअल आकाराचा कार्टीज पेपर वापरण्यात यावा. )**

४. प्रत्येक घटक विषयासाठी निर्धारित केलेल्या वर्गकाम संख्येच्या किमान वर्गकाम (प्रात्यक्षिक व ट्युटोरिअल) पूर्ण असणे अनिवार्य आहे.

५. वार्षिक परीक्षेला प्रवेश मिळण्यासाठी वर्गकामाचे किमान ४० टक्के गुण आणि ७५ टक्के उपस्थिती असणे अनिवार्य आहे.

६. कार्यानुभव विषयाच्या स्वाध्यायातील छायाचित्रे पोर्टफोलिओमध्ये जमा करुन घ्यावे.

७. प्रथम वर्षात फलकरेखन व सुलेखन विषयाचा अभ्यास प्रशिक्षणार्थींनी केलेला आहे. त्यामुळे त्याचा नियमित सराव करून घेणे व दैनंदिनीमध्ये तशी नोंद ठेवण्यावर भर देणे आवश्यक आहे.

## ८. विषय - प्रकल्प (PROJECT)

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | PRACTICAL | -- | -- | 40 | 50 | EXTERNAL |

**प्रस्तावना :** प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकांमध्ये सर्जनशीलतेचा विकास होऊन संशोधकवृत्तीचे बीजारोपण करण्यासाठी तसेच स्वयंअध्ययनाद्वारे नवविचार, नवीन कल्पना रूजविण्याच्या दृष्टीने आणि प्रशिक्षणार्थीची विचार करण्याची क्षमता वाढीस लागावी, याकरिता **ललित कला** (Fine Arts ) यावर आधारित प्रकल्प (Project) या प्रात्यक्षिक कार्याचा समावेश केलेला आहे.

प्रात्यक्षिकाची प्रत्यक्ष कार्यवाही, निवेदन /अहवाल लेखन आणि सादरीकरणाचे कौशल्य विकसित करण्याची प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकांना संधी उपलब्ध होऊन त्यांच्यातील तर्कसंगत व सर्जनशील विचारांना चालना मिळण्यास मदत होणार आहे.

- **उद्‌दिष्टे :-**

  १) स्वयं अध्ययनाची संधी उपलब्ध करुन देणे.

  २) तर्कसंगत विचार करून अनुभव मांडणे.

  ३) निरीक्षण, संकलन, निवेदन इत्यादी कौशल्यांचा विकास करणे.

  ४) ललित कलांशी निगडीत विषयांची माहिती संकलित करून सादरीकरण करणे.

  ५) क्षेत्रिय अनुभवाद्वारे अध्ययन प्रकिया व शोधकवृत्ती प्रगल्भ करण्यास प्रोत्साहन देणे.

  ६) नवविचार, सर्जनशीलता व कल्पकता यांना प्रकल्पाद्वारे साकारण्याची संधी उपलब्ध करून देणे.

  ७) संग्रहप्रवृत्ती, श्रमप्रतिष्ठा, स्वयंशिस्त, चिकाटी, नीटनेटकेपणा, सौंदर्यदृष्टी, सृजनशीलता इ.गुणांचा विकास घडवून आणणे.

  ८) संकलित केलेल्या माहितीचे योग्य पध्दतीने सादरीकरणास प्रोत्साहन देणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**

  - महाराष्ट्र राज्यस्तरावरील ललित कला जसे - चित्र, शिल्प, वास्तू, नृत्य, नाट्य, संगीत, लोककला, इत्यादी तसेच कलामहोत्सव, कलाप्रदर्शने, कला संग्रहालये, ललित कलेतील नामवंत व लौकिकप्राप्त कलावंत यांसारख्या घटकांवर आधारित स्वयं अध्ययनाव्दारे माहितीचे संकलन व सादरीकरण.
  - **आकारमान** - ११ इंच X १५ इंच ते १५ इंच X २२ इंच (१६५ चौरस इंच ते ३३० चौरस इंच) आकारमानाच्या कागदाचे फोल्डर. (बाजारात मिळणाऱ्या जाडसर पोत असलेल्या कागदाचा फोल्डरसाठी वापर करता येणार नाही.)

❖ **प्रकल्प लेखनासाठी मुद्दे -**

- मुखपृष्ठ ( प्रकल्पाच्या शीर्षकासह)
- प्रस्तावना -
- गरज व महत्त्व -
- उद्दिष्टे -
- कार्यपध्दती (नियोजन) -
- निष्कर्ष (समारोप) -
- संदर्भग्रंथ सूची -

- **मार्गदर्शक सूचना :-**

१) प्रकल्प स्वयंअध्ययनाद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित व स्वनिर्मित असावा, इतर कोणत्याही प्रकल्पाची नक्कल असू नये.

२) प्रकल्पाचे मुखपृष्ठ विषयाशी सुसंगत व अर्थबोध होईल असे असावे. तसेच मुखपृष्ठावर प्रकल्पाचे शीर्षक, प्रकल्पकाचे नाव, वर्ग, वर्ष इत्यादी बाबींची नोंद घेऊन त्यावर प्रकल्पक प्रशिक्षणार्थी /मार्गदर्शक शिक्षक / प्राचार्य यांच्या स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असावा.

३) प्रकल्प विषयात आंतरिक लेखन आणि माहितीला प्राधान्य असावे.

४) उपरोक्त अभ्यासक्रम/पाठ्यक्रमामध्ये सूचित केलेले घटकविषय किंवा तत्सम कोणत्याही एका घटक विषयाची प्रकल्पासाठी निवड करता येईल.

**५) प्रकल्प लेखन सहज आकलन होईल, समजेल अशा सहज सोप्या शब्दांत, शुध्दलेखनासह वळणदार व स्वहस्ताक्षरतच लिहिलेला असावा. काव्यात्मक पध्दतीने लिहीलेला नसावा.**

६) प्रकल्प सजावटीसाठी रंग, रंगछटा वा कागद कोलाजचा वापर करता येईल. परंतु त्यावरील मजकूर वाचनीय असावा याची दक्षता घ्यावी.

७) प्रकल्प लेखनात आवश्यकतेनुसार चित्रे, रेखाटने, छायाचित्रे, नकाशे, तक्ते (सारणी), बोधवाक्ये यांसारख्या बाबींचा समावेश करता येईल.

८) प्रकल्प लेखनाची शब्दमर्यादा किमान ६०० ते १००० शब्द असावी.

९) प्रकल्प लेखनाला पृष्ठ क्रमांक देणे आवश्यक आहे, ज्यामुळे क्रमशः वाचन करणे सोयीचे होईल.

१०) प्रकल्पाच्या शेवटी संदर्भग्रंथ सूची असणे आवश्यक आहे.

**गुणदान योजना :-**

| माहितीचे संकलन | मांडणी व निवेदन | मुखपृष्ठ | कल्पकता / सादरीकरण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | ५० |

टीप :- प्रकल्पाचे स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**


१०) नावीन्यपूर्ण प्रकल्प कसे करावेत ..? अंजली तळेगांवकर - ज्ञान-प्रबोधिनी, ५१०,सदाशिवपेठ, पुणे-३०

११) शैक्षणिक कृतिसंशोधन - डॉ. ना. के. उपासनी - बालभारती, पुणे.

१२) छात्र प्रबोधन (१ सप्टेंबर २०११) प्रकल्प विशेषांक, ज्ञान-प्रबोधिनी, ५१०,सदाशिवपेठ, पुणे-३०

१३) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे - मुळे रा. शं. आणि उमाठे वि. तु. - महाराष्ट्र साहित्य निर्मिती मंडळ, नागपूर.

१४) कृतिसंशोधन व नवोपक्रम - स्वाती गाडगीळ, सनसाईट पब्लिकेशन, नाशिक.

१५) दिशा नवोपक्रमाची - मा. संचालक - महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

१६) प्राथमिक शिक्षकांसाठी निवडश्रेणी हस्तपुस्तिका (सप्टे. २००९), - म. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

१७) कृतिसंशोधन व नवोपक्रम - सुमन गायकवाड, उज्ज्वला डोणे - मानसी प्रकाशन, कोल्हापूर.

१८) कृतिसंशोधन व नवोपक्रम - संजय क्षीरसागर, दीपक कदम, विद्याभारती प्रकाशन.


*विविध शैक्षणिक उपक्रम, प्रकल्पांच्या अनुषंगाने विश्लेषणात्मक दृष्टिकोनातून संशोधन साहित्य निर्माण होत राहणे गरजेचे असते. जेणेकरून त्याचा वापर छात्राध्यापकांना त्यांच्या सेवापूर्व प्रशिक्षणात होऊ शकेल.*
( पान क्र.१०). ***शिक्षक शिक्षणाचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा -२००९***



## ९. घटक - सरावपाठ (PRACTICE LESSON)

| MIN. ASGMT. | NATURE OF ASGMT. | TUTORIAL | EXAM. HRS. | TEACHING HRS. | MARKS | EVALUATION |
|---|---|---|---|---|---|---|
| 2+2+12 | LESSON | -- | -- | 60 | 50 | INTERNAL MARKS |

**प्रस्तावना :** शाळेत प्रत्यक्ष काम करण्यापूर्वी अध्यापनाची पूर्व तयारी म्हणून सराव पाठांकडे पाहिले जाते. विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठीचे पूरक वातावरण निर्माण करण्यासाठी अध्ययन घटकास अनुरूप नेमकी कोणती तयारी करावी लागेल ? अध्यापनादरम्यान शैक्षणिक साहित्य व तंत्रज्ञानाचा उपयोग कुठे, कसा व का ? करून घ्यावा यासंबंधीची तयारी ही सरावपाठाच्या दरम्यान होणार आहे. सहाध्यायी प्रशिक्षणार्थी कलाशिक्षक यांना पाठनिरीक्षणाची संधी मिळाल्याने त्यातून त्याला पाठासंबंधीचे बरेचसे बारकावे जाणून घेता येतील. सराव पाठांमुळे प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकात आत्मविश्वास निर्माण होणार आहे व त्यांच्या ज्ञानात भर पडणार आहे.

- **उद्दिष्टे :-**

  १) अध्ययन-अध्यापन प्रकिया समजून घेण्याची संधी उपलब्ध करून देणे.

  २) अध्यापनाची विविध कौशल्ये व पद्धतीचा वापर करण्याची संधी देणे.

  ३) पाठाच्या सादरीकरणात सर्वोत्कृष्टता येण्याची गरज समजून घेण्यास मदत करणे.

  ४) अध्यापनात शैक्षणिक साहित्य व तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे कौशल्य विकसित करणे.

  ५) अध्यापनासाठीचा आत्मविश्वास निर्माण करणे.

  ६) अध्ययन-अध्यापनाची परिणामकारकता समजून घेण्यासाठी पाठ निरीक्षणाची संधी मिळवून देणे.

- **अभ्यासक्रम / पाठ्यक्रम :-**
  - आशययुक्त व ज्ञानरचनावादी अध्यापन संकल्पनेचे स्पष्टीकरण.
  - सराव पाठातील पायऱ्या, नवीन संबोध आणि विविध अध्यापन पध्दतींचा परिचय.
  - पाठ्यवस्तूस अनुरूप, मुद्देसूद पाठ टाचण करण्याचे मार्गदर्शन.
  - अध्यापनात विविध शैक्षणिक साहित्य, नमुना चित्रे व तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे कौशल्य मार्गदर्शन.
  - पाठ निरीक्षण पत्रके, नोंदपत्रके, गुणसंकलन तक्ते भरण्याविषयी स्पष्टीकरण व मार्गदर्शन.
  - पाठ्यक्रमातील अध्यापन पध्दतीनिहाय नमुना पाठाचे विषय अध्यापक द्वारा सादरीकरण.

- **मार्गदर्शक सूचना :-**

  १) प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकांना शाळेवर पाठविण्यापूर्वी सराव पाठासाठी एक आठवड्याची अध्ययन-अध्यापन संदर्भात कार्यशाळा घेण्यात यावी.

  २) पाठाचा कालावधी ३० ते ३५ मिनिटांचा असावा.

३) प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावरील सर्व इयत्तांवर पाठ घेणे अपेक्षित आहे.

४) विषय अध्यापक द्वारा प्रशिक्षणार्थीना पाठ टाचण काढण्याचे मार्गदर्शन व अध्यापन पध्दतीनिहाय नमुना पाठाचे सादरीकरण करणे अपेक्षित आहे.

५) प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाने प्रथम कच्चे पाठ टाचण काढून विषय अध्यापकांकडून तपासून घ्यावे.

६) विषयाच्या गरजेनुसार फलक लेखन, रेखन आणि शैक्षणिक साधन-साहित्य व तंत्रज्ञानाचा उपयोग करावा.

७) प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाने आपल्या सहाध्यायींच्या सराव पाठ निरीक्षणातील नोंदी सविस्तर लिहून त्यावर चर्चा व मार्गदर्शन करणे अपेक्षित आहे.

८) सहाध्यायींच्या पाठांची किमान १० निरीक्षणे आवश्यक आहेत.

९) वर्गातील दोन विद्यार्थ्यांची उत्तम व कनिष्ठ दर्जाची दोन चित्रे, त्यांची नावे आणि इयत्ता लिहून स्वत:च्या सरावपाठ टाचणाला जोडणे आवश्यक आहे.

११) सैध्दांतिक विषयाचे किमान २, कलाभिव्यक्तीचे २ आणि प्रात्यक्षिक कार्याचे १२ सराव पाठ घेणे अपेक्षित आहे.

११) शालेय अभ्यासक्रमातील सर्व प्रात्यक्षिक विषयांचा किमान एक सरावपाठ घेणे अपेक्षित आहे.

**गुणदान योजना :-**

| स्पष्ट शब्दोच्चार किंवा ध्वनी | शै. साहित्य/ तंत्र कौशल्य | देहबोली वापर | विषय निवड | सादरीकरणातील आत्मविश्वास | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | १० |

टीप :- सराव पाठाचे स्वरूप व गरजेनुसार गुणदानाचे निकष बदलता येतील.

संदर्भ ग्रंथ :- १) अध्यापन पध्दतीची मूलतत्त्वे - गोविंद प्रभाकर सोवनी

२) शैक्षणिक मूल्यमापन तंत्र आणि मंत्र - एन. के. उपासनी, पी. डी. जोशी, एन. ए. वझे.

------------/\/\/\/\------------

# परिशिष्ट - १

## माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT)

### पार्श्वभूमी

कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षाकरिता कार्यानुभव अंतर्गत **अ) माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT- Information & Communication Technology)** विषयाचा अभ्यासक्रमात नव्याने समावेश करण्यात आलेला आहे. शिक्षण प्रक्रियेतील आदान-प्रदानाचे एक अद्‌ययावत व प्रभावी साधन (तंत्र) म्हणून त्याकडे पाहिले जाते. त्यामुळे प्रस्तुत अभ्यासक्रमातून तंत्रज्ञानस्नेही व शोधकवृत्तीचा सक्षम कलाशिक्षक निर्माण व्हावा अशी अपेक्षा आहे.

काळानुरूप मानवी जीवनाचा जो विकास होत गेला आणि त्या विकासात त्याला जी माहिती मिळत गेली ती त्याने पुढील पिढ्यांमध्ये संक्रमित केली. ही संक्रमणप्रक्रिया सुरूवातीच्या काळात मौखिक स्वरूपात होती. परंतु नंतर मात्र त्यात बदल होत गेला. या बदलातूनच माहिती लेखनाद्वारे काळाच्या सोबत पुढे जाऊ लागली. या सर्व प्रक्रियेत आज अधिक चांगल्या स्वरूपात माहिती मिळविण्यासाठी संगणकाचा प्रभावीपणे वापर होऊ लागला.

तंत्रज्ञानाच्या गतिमान युगात अद्‌ययावत ज्ञान मिळविणे ही काळाची गरज आहे. ज्ञानप्राप्तीसाठी माहितीचे विविध स्रोत शोधणे, वापर करणे व प्राप्त माहितीचे आदानप्रदान करून ती माहिती साठवून तिचा पुनर्वापर करण्यासाठी माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे.

माहिती संप्रेषण तंत्रज्ञान क्षेत्रात झालेल्या प्रचंड प्रगतीमुळे आणि सातत्याने वाढत जाणाऱ्या माहितीमुळेच सध्याच्या काळास **'तंत्रज्ञानाचे युग'** म्हणून संबोधले जाते. माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान या विषयाकडे उच्च शिक्षणात स्वतंत्र विद्याशाखा म्हणून पाहिले जाते आहे, तसेच विविध प्रकारचे शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम जसे B. Ed., / D. El. Ed. (Diploma in Elementary Education) इत्यादी अभ्यासक्रमात अध्ययन-अध्यापनाचे प्रभावी साधन म्हणून अंतर्भाव करण्यात आला आहे. त्यामुळे शिक्षक प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमातून शिक्षकाची सक्षम पिढी तयार होणार आहे. शिक्षकांनी स्वत: ICT चे ज्ञान संपादन करून विविध क्षेत्रात सातत्याने होणारे नवनवीन व विकासात्मक बदल आणि अद्‌ययावत माहितीसह स्वत:ला अद्‌ययावत ठेवण्यासाठी मदत होणार असून ICT अंगभूत घटक म्हणून वापरण्याचे कौशल्य दृढ व्हावे याकरीता कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रमात या विषयाच्या समावेश करण्यात आला आहे.

माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या साधनांमुळे विशेषत: संगणक व इंटरनेटमुळे शिक्षक विद्यार्थ्यांना ज्ञानाची कवाडे उघडली गेली आहेत. संगणक व इंटरनेटचा वापर करून शिक्षक व विद्यार्थी पुस्तकी ज्ञानाच्या पलिकडे जाऊन त्यांच्या विषयाशी तसेच इतर विषयांशी संबंधित नवनवीन माहिती मिळवून आपल्या ज्ञानात भर घालू शकतात. त्यामुळे माहिती मिळविण्यासाठी व अभ्यास करण्यासाठी नवीन मार्ग उपलब्ध झाला आहे.

माहिती व संप्रेषण तंत्रतज्ञानाच्या मदतीने अध्ययन-अध्यापन प्रक्रिया ज्ञानरचनावादी (Constructivism) करण्यास मदत देऊन त्याद्वारे दृक्-श्राव्य माध्यमांमध्ये ग्राफिक्स आणि ॲनिमेशनच्या साहाय्याने प्रभावी व आकर्षक चित्रे, चलत्‌चित्रे, कार्टून्स, थ्री डी चित्रे, पॉवर पॉईंट , स्लाईडस् तयार करणे, स्लाईड शो

यांसारख्या शैक्षणिक साधनांची निर्मिती करून पारंपरिक शिक्षणाच्या जोडीला संगणकासारख्या तंत्रज्ञानाचा वापर केल्यास शिक्षणाच्या गुणवत्तेत वाढ होण्यास मदत होणार आहे.

माहिती संक्रमणासाठी संगणकाशिवाय इतरही साधने उपलब्ध आहेत. उदा. रेडिओ, टेपरेकॉर्डर, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, दूरदर्शन, चित्रे, जाहिराती, प्रतिकृती, वृत्तपत्रे, नियतकालिके इत्यादी साधने माहिती हाताळण्यासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत. म्हणून या साधनांचा देखील प्रस्तुत अभ्यासक्रमातून परिचय व्हावा आणि यामधूनच प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकांना ज्ञानाच्या वाटा शोधण्यासाठी प्रोत्साहन द्यावे अशी अपेक्षा आहे.

**विषयाची अपेक्षा :-**

१) शालेय विषयाचे अध्यापन करताना माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करावा.

२) अभ्यासक्रमात दिलेली प्रात्यक्षिके व उपक्रम हे मार्गदर्शनासाठी आहेत. शिक्षकांनी सॉफ्टवेअर व तंत्रज्ञानाचे उपलब्धतेनुसार विविध प्रात्यक्षिके व उपक्रम पूर्ण करणे अपेक्षित आहे.

३) अध्ययन-अध्यापन प्रक्रिया रंजक व आनंददायी होण्यासाठी माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा दृक् -श्राव्य साधन म्हणून उपयोग करता येईल.

४) माहिती संप्रेषण तंत्रज्ञान साधनांच्या वापराबाबत काही प्रशिक्षणार्थी अधिक कुशल असू शकतात. म्हणून सर्व उपक्रम व प्रात्यक्षिके विद्यार्थी तसेच शिक्षकांनीही स्वत: करणे अपेक्षित आहे.

५) अभ्यासक्रमातून तर्कशुध्द विचारसरणी विकसित ह ोणे अपेक्षित आहे.

६) माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान हा विषय प्रयोग दिग्दर्शन (Demonstration) व प्रात्यक्षिके (Practicals) या पद्धतीने शिकविणे अपेक्षित आहे.



# परिशिष्ट - २

## भाषा अध्यापनशास्त्र - पार्श्वभूमी

कोणत्याही शिक्षणाची सुरुवात मातृभाषेपासून होते. मातृभाषेतूनच आपण आपल्या भावभावना व्यक्त करीत असतो. जीवनात आलेले अनेक अनुभव बोलके करण्याचे काम मातृभाषाच करीत असते. कलाविषयाचे उत्कृष्ट अध्यापन करण्यासाठी कलाशिक्षकांनासुध्दा मातृभाषेची नितांत गरज असते. म्हणून प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकांनी जाणीवपूर्वक भाषेचा अभ्यास केला पाहिजे. भाषेच्या सखोल अभ्यासातूनच त्यांचा बौद्धिक, भावनिक, मानसिक तथा सांस्कृतिक विकास होत असतो. त्यांच्या अंगी कलात्मक आणि सृजनात्मक दृष्टीची वाढ होऊ शकते. शिक्षक मातृभाषेतून वर्गातल्या विद्यार्थ्यांशी सहज संवाद साधू शकतात. विद्यार्थ्यांशी प्रेमळ आपुलकीचे नाते निर्माण करू शकतात. त्यांच्या आशा-आकांक्षा फुलवू शकतात. शिक्षकांच्या मनातले, विद्यार्थ्यांच्या मनापर्यंत, म्हणजे-'ये हृदयीचे, ते हृदयी' पोहोचविण्याचे काम मातृभाषाच करू शकते. त्यामुळेच अध्ययन आणि अध्यापनाची ही प्रक्रिया अधिकाधिक प्रभावी होण्यासाठी भाषा अध्यापनशास्त्र या विषयाचा कलाशिक्षक पदविका पुनर्रचित अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे.

कलाविषयाच्या अभ्यासातून सहिष्णुता, सौजन्यशीलता, औदार्य, प्रेम, न्याय, समता आणि बंधुत्व भाव इत्यादी जीवनमूल्यांचा प्रत्यय यायला हवा. वैयक्तिक, सामाजिक आणि राष्ट्रीय मूल्यांचीही जोपासना सहजपणे व्हायला हवी, म्हणून नवीन शैक्षणिक धोरणानुसार पूर्व प्राथमिक स्तरापासून ते उच्च माध्यमिक स्तरापर्यंत मातृभाषेतून शिक्षण देणे अनिवार्य आहे. मातृभाषेतून अध्ययन-अध्यापन केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये श्रवण, भाषण, वाचन, लेखन आणि संभाषण इत्यादी भाषिक कौशल्ये जलदगतीने विकसित होतात. तसेच कलेच्या अभ्यासाबरोबरच प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकांनी मातृभाषेचाही अभ्यास केला, तर विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यात एक वैचारिक बैठक तयार होऊ शकते. शिक्षकांमध्ये बहुश्रुतता येते. त्यांच्यात सौंदर्यदृष्टी, रसिकता, इत्यादी मूल्ये रुजू शकतात. शिवाय आपल्या प्रभावी भाषेतून, बोलण्यातून, संवादातून कलाशिक्षक इतर विषयांशीसुध्दा सहसंबंध निर्माण करू शकतात. भाषेवर त्यांचे प्रभुत्त्व आल्यामुळे त्यांच्या फलक लेखनात, रेखनात नीटनेटकेपणा येतो. त्यांची वक्तृत्त्व व अभिनय क्षमता वाढते. त्यांचा आत्मविश्वास वाढतो. शिक्षकांची अध्ययन-अध्यापन प्रक्रिया आनंददायी होते. कला-कार्यानुभव या विषयांच्या अध्यापनाबरोबरच स्वतंत्रपणे भाषा विषय शिकविण्याची सुसंधी कलाशिक्षकांना मिळू शकते. म्हणून **'भाषा अध्यापनशास्त्र'** विषयाचे महत्त्व फार आहे.



# परिशिष्ट - ३

## राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ - कलाशिक्षणातील अपेक्षा

**कलाशिक्षणासंबंधी काही महत्त्वाचे मुद्दे :-**

१) विद्यार्थ्यांमध्ये सौंदर्यदृष्टी निर्माण करणे व त्यानुसार सौंदर्यानुभूती देणे हा कलाशिक्षणाचा उद्देश आहे.

२) विद्यार्थ्यांना रेषा, आकार, रंग, गती व ध्वनी यांमधून स्वत:ची अभिव्यक्ती करता येणे.

३) कलेचा अभ्यास व सांस्कृतिक वारसा हे हातात हात घालून एकमेकांना समजून घेण्यासाठी पूरक ठरतात.

४) स्थानिक लोककला, कलापरंपरा, यांमधून राष्ट्रीय परंपरेची जागरूकता निर्माण होते. यामुळे भारताचा समान सांस्कृतिक वारसा, स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास आणि पर्यावरणाचे संरक्षण या घटकांशी निगडीत असलेली मूल्ये वर्धित होतात.

५) कलाशिक्षणाच्या कार्यक्रमात चित्रकला, रंगकाम, कोलाज, मातीची शिल्पे, कठपुतळ्या बनविणे (बाहुलीकाम) याबाबतची सामग्री हाताळणे, यासंबंधीच्या पद्धतीची व विशिष्ट मुद्याची माहिती देणे यांचा अंतर्भाव असावा, अशी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCF) मध्ये शिफारस आहे.

६) निरीक्षण, श्रवण, आस्वाद याही कलाशिक्षणातील आवश्यक पायऱ्या आहेत.

७) व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी कला विषयाचा अंतर्भाव शिक्षणात करण्यात आला आहे.

८) विविध उपक्रम, प्रकल्पकार्य, नैसर्गिक तसेच ऐतिहासिक वारसास्थळांना क्षेत्रभेटी सहली, अशा विविध प्रकारच्या उपक्रमांसाठी तासिकांची सोय असावी.

**कलाशिक्षणातून NCF 2005 ची अपेक्षा :-**

१) सर्वसामान्य उद्दिष्टे ठरविणे.

२) पर्यावरणविषयक जाणीव -जागृती निर्माण करणे.

३) विविध कला व परंपरांचा परिचय करून देणे.

४) व्यावसायिक दृष्टिकोन विकसित करणे.

५) उपलब्ध साधन-साहित्याबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहन देणे.

६) स्थानिक कला, कलापरंपरा आणि कलावंतांच्या परिचयाची संधी उपलब्ध करून देणे.

७) कलाविष्कार किंवा कलाशिक्षणाचा इतर विषयाशी सहसंबंध जोडणे.

८) कलानिर्मितीसाठी मुक्ताविष्काराची संधी उपलब्ध करून देणे.

९) सौंदर्यदृष्टी, एकाग्रता व आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करणे.

१०) विविध प्रकारची मूल्ये, जीवन-कौशल्ये, गाभाघटक व संवैधानिक मूल्ये इत्यादींना कला अभ्यासक्रम निर्मितीत प्राधान्य देणे.

११) कलाशिक्षणातून सुंदर जीवन जगण्याचा सकारात्मक दृष्टिकोन वाढीस लावण्याचा प्रयत्न करणे.

१२) देशातील सांस्कृतिक वारसा, विविध कलापरंपरांची ओळख व त्यांचे संवर्धन करण्याविषयीची जाणीव आणि जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करणे.

१३) मुक्ताविष्कारातून सृजनशीलता, भावभावना, संवेदनक्षमता आणि मानसिक आरोग्य सुदृढ करण्याचा प्रयत्न करणे.

१४) कलाशिक्षणातून मुक्त अभिव्यक्तीचा आनंद घेण्याची संधी उपलब्ध करून देणे.

१५) क्षेत्रभेटी, उपक्रम, प्रकल्प, गटकार्य यांमधून कलाभिव्यक्ती करणे.

## परिशिष्ट - ४

## राज्य अभ्यासक्रम आराखडा - धोरणात्मक शिफारशी

**राज्य अभ्यासक्रम आराखडा मधील कला व कार्यानुभव विषयासाठी धोरणात्मक शिफारशी :-**

❖ **कलाशिक्षण :-**

१) कलेमुळे मानवी जीवन समृद्ध होते हे विचारात घेऊन अभ्यासक्रमात आणि त्याच्या कार्यवाहीत कला विषयाला विशेष महत्त्व द्यावे.

२) कला अभ्यासक्रम मुलांच्या विकासाच्या टप्प्याला अनुसरून ठेवण्यासाठी व क्लिष्टता कमी करण्यासाठी त्याची व्याप्ती मर्यादित ठेवावी.

३) इतर विषयांच्या अध्ययन व अध्यापनात कला विषयाचा समन्वय (Co-relation) साधला जावा.

४) बदलत्या काळानुसार आगामी काळात अभिजात कला क्षेत्राव्यतिरिक्त जाहिरात, ॲनिमेशन, उद्योगक्षेत्रे यांतही कलाविषयातील प्रशिक्षित मनुष्यबळाची मोठी गरज लागणार असल्याने उच्च माध्यमिक स्तरावर उपयोजित कला विषयाचा अंतर्भाव करावा.

५) कलेमध्ये विशेष प्रयोगशील गती असलेले विद्यार्थी शोधून त्यांना त्या कलेतील तज्ज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन मिळण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी.

❖ **कार्यानुभव :-**

१) एकविसाव्या शतकातील विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन कार्यानुभव विषयाचा अभ्यासक्रम विकसित करावा.

२) कार्यानुभव विषयाच्या पाठ्यक्रमातील घटकांची मांडणी वयोगटानुरूप करून ओझे कमी करावे. सलगतेच्या दृष्टिने एका घटकाचा अभ्यासक्रम तुटक स्वरूपात अनेक इयत्तांमध्ये विभागून देऊ नये.

३) कृतिकेंद्रित शिक्षण या संकल्पनेवर भर देण्यात यावा.

४) शिक्षकांसाठी कार्यानुभव विषयाकरिता इयत्तानिहाय, उपक्रमनिहाय स्वतंत्र हस्तपुस्तिका/ मार्गदर्शक साहित्य, सीडीज असावयात.

५) कुशल कारागीर/स्थानिक कलावंत/व्यावसायिक यांच्या ज्ञानाचा व कौशल्याचा लाभ विद्यार्थ्यांना मिळवून देण्यासाठी कही तरतूद असावी.

६) प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील कार्यानुभव विषयाच्या पाठ्यक्रमात समन्वय असावा.

# परिशिष्ट - ५

## गाभाघटक / जीवन-कौशल्ये /सामाजिक व राष्ट्रीय मूल्ये

❖ **राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार निर्धारित - गाभाघटक ( The Key Elements) :-**

गाभाघटक म्हणजे अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आलेला स्वतंत्र विषय नव्हे हे कटाक्षाने लक्षात घेतले पाहिजे. गाभाघटक हे अभ्यासक्रमात सर्वत्र विखुरलेले आढळून येतील. ते अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट, आशय व पाठ्यपुस्तकात आढळतील, अभ्यासक्रमाच्या आशयांत आढळतील, पाठ्यपुस्तकांत आढळतील किंबहुना कोणताही विषय अध्यापन करताना त्यामध्ये एखाद्या गाभाघटकाला स्पर्श करून जाईल. कलाशिक्षक अभ्यासक्रमातील अनेक घटक विषयांमधून देखील गाभाघटकांचा समावेश झाला आहे.

१) भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास. (History of Indias Freedom Movement).

२) संवैधानिक जबाबदाऱ्या. (Constitutional Responsibilities).

३) राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यासाठी आवश्यक आशय.(Content Essential to Nature National Identity)

४) भारताचा सामाजिक, सांस्कृतिक वारसा. (Indias Common Cultural Heritage).

५) समानता, लोकशाही व धर्मनिरपेक्षता. (Equality- Democrocy and Secularism).

६) स्त्री-पुरूष समानता. (Feminine Equality).

७) पर्यावरण संरक्षण. (Environmental Protection).

८) सामाजिक अडसरांचे निर्मूलन. (Removel of Social Barriers).

९) लहान कुटुंबाचा आदर्श. (Ideal for a Small Family).

१०) वैज्ञानिक दृष्टिकोन. (Scientific Approach).

११) महिला व अन्य दुर्बल घटकांचे सबलीकरण. (Empowerment of Women & Other Vulnerable Factors).

१२) बुद्धी, भावना व कृती यांचा समन्वय. (Coordination of Intellect, Emotions and Actions).

१३) जागतिकीकरण व स्थानिकीकरण यांचा मेळ. (Combination of Globalization & Localization).

**संदर्भ ग्रंथ -** गाभाघटक (१ ते १०), भा. दो. पाटील, साकेत प्रकाशन.
www : bookganga.com/R/38KGO

## ❖ जागतिक आरोग्य संघटनेने निश्चित केलेली - जीवन-कौशल्ये ( Life Skills ) :-

दैनंदिन जीवनात निर्माण होणाऱ्या विविध समस्या व गरजांना प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी व्यक्तिने स्वत:च्या वर्तनात स्वीकारात्मक व सकारात्मक बदल घडवून आणण्याची क्षमता म्हणजे जीवनकौशल्य होय.

आजच्या जीवनामध्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थितीमधे झपाट्याने बदल होत आहे. ह्या बदलामुळे विद्यार्थी गोंधळून गेलेला आहे. पालक आणि शिक्षकांच्या मोठ्या अपेक्षांच्या ओझ्याखाली विद्यार्थी दडपला गेला आहे. त्यामुळे स्वत:ला समजून घेण्याची क्षमता विकसित होण्यास त्यास अडसर निर्माण होत आहे. व्यक्तिचा सर्वांगीण विकास करणे हे शिक्षणाचे अंतीम उद्दिष्ट मानले जाते. त्या सर्वांगीण विकासामध्ये मानसिक क्षमतांचा जास्तीत जास्त उपयोग करून शिक्षण अधिकाधिक जीवनकेंद्रित करून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास साधता येतो. व्यक्तिविकास हा चारित्र्य निर्मितीशी निगडित असतो. चारित्र्याची उत्तमप्रकारे जडणघडण होण्यासाठी मानवाला महत्त्वपूर्ण जीवन कौशल्याची आवश्यकता आहे. म्हणून जीवन कौशल्यांचा विकास शिक्षणातून होणे गरजेचे आहे. यास मानसशास्त्रीय कौशल्य म्हणूनही ओळखले जाते.

सर्व स्तरांवरील अभ्यासक्रमातून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या जीवन कौशल्यांचा विकास होणे अपेक्षित आहे. कलाशिक्षक पदविका अभ्यासक्रमाची पुनर्रचना करताना त्याचा प्रामुख्याने विचार करण्यात आला आहे. जागतिक आरोग्य संघटनेने पुढील दहा जीवन कौशल्यांचा पुरस्कार केला आहे.

१) 'स्व' ची ओळख (Self Awareness)

२) समानानुभूती (Empathy)

३) निर्णयक्षमता (Decision Making)

४) समस्या निराकरण / समस्यांची उकल (Problem Solving)

५) परिणामकारक संवाद साधणे (Effective Communication)

६) व्यक्ती-व्यक्तींमधील सहसंबंध (Inter-Personal Relation)

७) सर्जनशील विचार (Creative Thinking)

८) चिकित्सक आणि विश्लेषक विचार (Critical Thinking)

९) भावनांशी समायोजन (Coping with Emotions)

१०) ताण-तणावांचे समायोजन (Coping with Stress)

**संदर्भ ग्रंथ -** १) जीवन कौशल्ये शिक्षण (शिक्षक मार्गदर्शिका) भाग १ व २,

२) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३०

३) जीवन कौशल्य हस्तपुस्तिका, राज्य साधन केंद्र, पुणे,

४) जीवन कौशल्य शिक्षण मार्गदर्शिका इयत्ता १ ते४ (२००८) म. रा. शै. संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

५) जीवन कौशल्य शिक्षण मार्गदर्शिका इयत्ता ५ ते ७ (२००८) म. रा. शै. संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

६) जीवन कौशल्य शिक्षण मार्गदर्शिका जीवन कौशल्ये आणि नमुना पाठ भाग १ (इयत्ता १ ते ८) - २०११

७) इयत्ता ८ वी चे पाठयपुस्तक (२००८) म. रा. पाठयपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे.

८) जीवन कौशल शिक्षा (प्रशिक्षक प्रशिक्षण मार्गदर्शिका) राज्य संसाधन केंद्र प्रा. लि. इंदौर.

९) www : unicef.org/lifeskills/index_whichskill.html

१०) www : srjis.com>pdf files

## ❖ वैयक्तिक, सामाजिक व राष्ट्रीय - मूल्ये ( Moral Values ) :-

मूल्यांचे संस्कार विद्यार्थ्यांवर व्हावेत, विद्यार्थ्यांमध्ये चारित्र्य, शील, संस्कार त्यांच्या मनावर व्हावेत, त्यांना शिस्त लागावी अशी अपेक्षा समाजाने शाळा व शिक्षणामधून केली आहे. शिक्षणाच्या माध्यमातून बाहेर पडणारे विद्यार्थी नम्र, शीलसंपन्न, शिस्तबध्द, सभ्य, सुसंस्कृत, हुशार, चौकस, स्वावलंबी, शोधबुध्दी विकसित झालेले असायला हवेत, अशी समाजाची अपेक्षा आहे. त्यासाठी विविध सामाजिक, राजकीय मूल्यांचे शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. यालाच 'नैतिक मूल्यांचे शिक्षण' असेही म्हणता येईल.

शालेय स्तरापासून महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत अध्यापन करणाऱ्या अध्यापकांनी मूल्यांचे शिक्षण हा आपला विषय समजून आपला विद्यार्थी सुसंस्कृत नागरिक घडला पाहिजे या तळमळीने अध्यापन करणे अपेक्षित आहे. शिक्षण प्रक्रियेमध्ये आधुनिता, विकास, प्रगती व ज्ञानाचे धडे देण्यासोबतच मानवता, तत्त्वज्ञान व मूल्यांचे धडे देणे देखील गरजेचे वाटू लागले आहे. त्यातूनच मूल्यशिक्षणाची गरज अभ्यासक्रमामध्ये प्रकर्षाने जाणवू लागली आहे. त्यासाठी पुढील दहा मूल्ये निश्चित करण्यात आलेली आहेत.

१) संवेदनशीलता (Sensitivity)
२) वक्तशीरपणा (Punctuality)
३) नीटनेटकेपणा (Neatness)
४) वैज्ञानिक दृष्टिकोन (Scientific Approach)
५) श्रमप्रतिष्ठा (Dignity of Labour)
६) सौजन्यशीलता (Courtesy)
७) स्त्री-पुरूष समानता (Gender Equality)
८) सर्वधर्मसमभाव (Equality of all Religions)
९) राष्ट्रभक्ती (Patriotism)
१०) राष्ट्रीय एकात्मता (National Integration)

गाभा घटक, जीवन-कौशल्ये व मूल्यांचा परिचय व्हावा याकरिता वरील प्रमाणे थोडक्यात माहिती देऊन केवळ यादी दिली आहे. अधिक माहितीसाठी संबंधित विषयाच्या संदर्भ पुस्तकांचा अभ्यास करता येईल.

**संदर्भ ग्रंथ -** १) भारतीय समाजातील नैतिकमूल्ये, डॉ. दिलीप खैरनार - डायमंड पब्लिकेशन.

२) मूल्यशिक्षण शिक्षक हस्तपुस्तिका, डॉ. क्षमा लिमये - विद्या विक ास पब्लिकेशन प्रा. लि., नागपूर.

३) www : bookganga.com/R/6ESI0

सहपत्र - १

## स्वाध्याय नोंद पत्रक - नमुना (प्रथम वर्ष)

## NAME OF COLLEGE WITH ADDRESS

**Deptt. of Teacher's Training - ART TEACHER'S DIPLOMA ( FIRST YEAR )**

**Name : Shri/Smt./Kum. :** .................................................................................... **Roll No.** ....................

**Present Address :** ..........................................................................................................................

.................................................................................................... **Exam. Seat No.** ..........................

**ASSIGNMENT RECORD 20.... -20....**

| Sr. | Subject / Unit / Sub - unit | Per Year Min. No. of | | No. of Asgmt. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Asgmt. | Tutorial | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | TOTAL |
| 01 | **Drawing & Painting** • Memory & Imagination. | 10 | -- | | | | | | | | | | | | | |
| | • Object (Manmade & Nature) | 10 | -- | | | | | | | | | | | | | |
| | • Perspective Drawing. | 08 | -- | | | | | | | | | | | | | |
| | • Outdoor Study (Sketching & Landscape) | 04 | -- | | | | | | | | | | | | | |
| | • Blackboard Draw. & Calligraphy | 04 | -- | | | | | | | | | | | | | |
| 02 | **Design** • Fundamentals of Art | 05 | -- | | | | | | | | | | | | | |
| | • 2D & 3D Design (08+03) | 11 | -- | | | | | | | | | | | | | |
| 03 | **Colour** | -- | 04 | | | | | | | | | | | | | |
| | • Theory & Practical | 08 | -- | | | | | | | | | | | | | |
| 04 | **Work-Experience** • a) Clay Work | 10 | -- | | | | | | | | | | | | | |
| | • b) Paper & Cardboard Work | 10 | -- | | | | | | | | | | | | | |
| 05 | **Theory** • Indian History (Art & Culture). | -- | 04 | | | | | | | | | | | | | |
| | • Edn. Psychology & Child Art | -- | 04 | | | | | | | | | | | | | |
| | • Language Teaching Metho. | -- | 04 | | | | | | | | | | | | | |
| 06 | **Art Expression** (Dance / Drama / Music) | -- | 04 | | | | | | | | | | | | | |
| 07 | Class Work | 80 | 20 | | | | | | | | | | | | | |
| 08 | Project | 01 | -- | | | | | | | | | | | | | |
| 09 | Micro Teaching Lession (2+2+8) | 12 | -- | | | | | | | | | | | | | |

| | |
|---|---|
| **Grand Total** | |
| **Percentage** | % |

Date : **Class Teacher** **Head of Deptt.**



एन २२३--१५

## स्वाध्याय नोंद पत्रक - नमुना (मागची बाजू)

## ACADEMIC REPORT 20....... -20.......

| | |
|---|---|
| • Receipt No. & Date. | |
| • Total No. of Working Days. | |
| • 75 % of Working Days. | |
| • No. of Attendance. | |
| • Actual Percentage of Attendance. | |
| • Sick Leave Granted. | |
| • Terminal Result. | |
| • Percentage of Marks (Terminal Exam.) | |
| • Class or Rank if any. | |
| • Progress. | |
| • Conduct. | |
| • Age on 31st March .................. Years. | |
| • Special Status SC/NB/ST/VJ/NT/OBC. | |
| • Freeship/ Scholarship/Prizes Etc. | |
| • Sports/Drama Etc. | |

• Remarks : ..........................................................................................................................

..........................................................................................................................................

Date : / / Class Teacher Principal

## सहपत्र - २

## स्वाध्याय नोंद पत्रक - नमुना (द्वितीय वर्ष)

**NAME OF COLLEGE WITH ADDRESS**

**Deptt. of Teachers Training - ART TEACHER'S DIPLOMA ( SECOND YEAR )**

**Name : Shri/Smt./Kum. :** .................................................................................. **Roll No.** ....................

**Present Address :** ..........................................................................................................................

.............................................................................................. **Exam. Seat No.** ..............................

**ASSIGNMENT RECORD 20.... -20....**

| Sr. | Subject / Unit / Sub - unit | Per Year Min. No. of Asgmt. | Per Year Min. No. of Tutorial | No. of Asgmt. 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | **Drawing & Painting** | | | | | | | | | | | | | |
| | • Memory & Imagination | 10 | -- | | | | | | | | | | | |
| | • Head Study | 10 | -- | | | | | | | | | | | |
| | • Time Sketch | 10 | -- | | | | | | | | | | | |
| | • Perspective Drawing | 06 | -- | | | | | | | | | | | |
| | • Outdoor Study (Sketching & Landscape) | 05 | -- | | | | | | | | | | | |
| 02 | **Design** | | | | | | | | | | | | | |
| | • Organization | 05 | -- | | | | | | | | | | | |
| | • Pictorial Composition | 05 | -- | | | | | | | | | | | |
| | • Functional Design | 05 | -- | | | | | | | | | | | |
| | • Print-Making | 02 | -- | | | | | | | | | | | |
| | • Poster Design | 02 | -- | | | | | | | | | | | |
| 03 | **Still Life** | 10 | -- | | | | | | | | | | | |
| 04 | **Work-Experience - a) ICT** | -- | 05 | | | | | | | | | | | |
| | **b) Any One of Following -** | 05 | -- | | | | | | | | | | | |
| | • Educational Teaching Material | * | * | | | | | | | | | | | |
| | • Stage & Functional Decoration | * | * | | | | | | | | | | | |
| | • Mural Painting | * | * | | | | | | | | | | | |
| | • Interior Decoration | * | * | | | | | | | | | | | |
| | • Doll & Mask Making | * | * | | | | | | | | | | | |
| | • Screen Printing | * | * | | | | | | | | | | | |
| 05 | **Theory** • Western History (Art & Culture). | -- | 05 | | | | | | | | | | | |
| | • Edu. Psychology & Edn. Theory | -- | 05 | | | | | | | | | | | |
| | • School Edu., Art Edu. & Evaluation | -- | 05 | | | | | | | | | | | |
| 06 | **Art Expression** (Viva-Practical) | 05 | -- | | | | | | | | | | | |
| 07 | Class Work | 80 | 20 | | | | | | | | | | | |
| 08 | Project | 01 | -- | | | | | | | | | | | |
| 09 | **Practice Lession** (2+2+12) | 16 | -- | | | | | | | | | | | |

| | |
|---|---|
| **Grand Total** | |
| **Percentage** | % |

**Date :** **Class Teacher** **Head of Deptt.**

## स्वाध्याय नोंद पत्रक - नमुना (मागची बाजू)

### ACADEMIC REPORT 20....... -20.......

| | |
|---|---|
| • Receipt No. & Date. | |
| • Total No. of Working Days . | |
| • 75 % of Working Days. | |
| • No. of Attendance. | |
| • Actual Percentage of Attendance. | |
| • Sick Leave Granted. | |
| • Terminal Result. | |
| • Percentage of Marks (Terminal Exam.) | |
| • Class or Rank if any. | |
| • Progress. | |
| • Conduct. | |
| • Age on 31st March .................... Years. | |
| • Special Status SC/NB/ST/VJ/NT/OBC. | |
| • Freeship/ Scholarship/Prizes Etc. | |
| • Sports/Drama Etc. | |

• Remarks : ..............................................................................................................................

..............................................................................................................................

Date : / / Class Teacher Principal

# सहपत्र - ३

## सूक्ष्मपाठ टाचण - नमुना

| महाविद्यालयाचे नाव (ठळक अक्षरात) |
|---|

**सूक्ष्मपाठ टाचण**

**विद्यार्थ्याचे नाव :** ..............................................................................................

**घटक :** .................................. **उपघटक :** .................................. **सूक्ष्मपाठ क्र. :** ..........................

**दिनांक :**     /     /          **गटाचे नाव :** ..............................

**कौशल्य :** ..............................................................................................

**शैक्षणिक साधने -साहित्य :** ..............................................................................................

| ● उपकौशल्ये :- | ● प्रशिक्षणार्थी निरीक्षकांची नावे :- |
|---|---|
| १) ________ | १) ________ |
| २) ________ | २) ________ |
| ३) ________ | ३) ________ |
| ४) ________ | ४) ________ |
| ५) ________ | ५) ________ |
| ६) ________ | ६) ________ |

● **अध्यापन :-**

प्रशिक्षणार्थी - विद्यार्थी कृती : ______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

● **पुनरावलोकन :** ______________________________

______________________________

______________________________

______________________________

**● फलक लेखन ●**

**● विषय अध्यापकाचे निरीक्षण :**

**● विषय अध्यापकाच्या सूचना :**

प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाची स्वाक्षरी

पाठ निरीक्षकाची स्वाक्षरी

प्राचार्यांची स्वाक्षरी

विषय अध्यापकाची स्वाक्षरी

## सहपत्र - ४

## सरावपाठ टाचण - नमुना

महाविद्यालयाचे नांव (ठळक अक्षरात)

पाठ टाचण (LESSON NOTE)

शिक्षकाचे नाव :

शाळेचे नाव :

इयत्ता : ______ तुकडी : ______ सरासरी वय : ______

दिनांक : / / वेळ :

विषय : कला घटक : ______ उपघटक : ______

❖ अध्ययन मुद्दा/पाठ्यांश :

❖ अध्ययन अनुभवाचे स्वरूप :

❖ उपयोगात आणावयाची साधन तंत्रे :

❖ आवश्यक साधन-साहित्य :

❖ अध्यापन पद्धती :

१) पूर्व तयारी (प्रस्तावना) -

(१)

❖ हेतू कथन :

❖ कार्य संचालन/आयोजन :

(२)

❖ साहित्य वाटप :

❖ विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष कृती :

❖ मार्गदर्शन व रसग्रहण :

❖ मूल्यमापनाचे साधन तंत्र :

❖ मूल्यमापनासाठी वापरलेले निकष :

❖ गृहकार्य/स्वाध्याय :

(३)



(शा.म.मु.) एन २२३--१६ (१,००५--७-२०२१)

## फलक लेखन/रेखन

❖ अभिप्राय

❖ प्राचार्य/ मुख्याध्यापकाची स्वाक्षरी

❖ अध्यापन पध्दती शिक्षकाची स्वाक्षरी

## सहपत्र - ५

## सरावपाठ निरीक्षण पत्रक - नमुना

| महाविद्यालयाचे नाव (ठळक अक्षरात) |
|---|

शिक्षकाचे नाव : ..............................................................

शाळेचे नाव : ..............................................................

वर्ग : .......................... विभाग : .......................... सरासरी वय : .......... वर्षे

दिनांक : / / वेळ : ..........................

विषय :- कलाशिक्षण घटक : .......................... उपघटक : ..........................

- शिक्षकाची पूर्व तयारी :
- प्रस्तावना :
- हेतू कथन :
- कार्यसंचालन/विषय प्रतिपादन :
- पुनरावलोकन :

• **मार्गदर्शन / रसग्रहण :**

• **मूल्यमापन :** (मूल्यमापनासाठी उपयोगात आणावयाचे साधनतंत्र / निकष)

• **वर्गातील शिस्त :**

• **सामान्य अभिप्राय :**

प्रशिक्षणार्थी कलाशिक्षकाची स्वाक्षरी

प्रशिक्षणार्थी पाठ निरीक्षकाची स्वाक्षरी

प्राचार्य/मुख्याध्यापकाची स्वाक्षरी

अध्यापन पध्दती शिक्षकाची स्वाक्षरी

# शासकीय उच्चकला परीक्षेकरीता विषयनिहाय गुणदान योजना (प्रथम वर्ष)

### परीक्षेकरीता विषयनिहाय गुण विभागणी

| अ. क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| ०१ | स्मरणचित्र/कल्पनाचित्र | १०० |
| ०२ | वस्तुचित्र (मानवनिर्मित व नैसर्गिक) | १०० |
| ०३ | संकल्पचित्र | १०० |
| ०४ | भारतीय इतिहास (कला व संस्कृती) | १०० |
| ०५ | शैक्षणिक मानसशास्त्र व बालकला | १०० |
| ०६ | कलाभिव्यक्ती (नृत्य, नाटय, संगीत) | १०० |
| | एकूण गुण ... | ६०० |

### अंतर्गत विषयांकरीता गुण विभागणी

| अ. क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| ०१ | कार्यानुभव अ) मातकाम | ५० |
| ०२ | ब) कागद व पुठ्ठाकाम | ५० |
| ०३ | भाषा अध्यापनशास्त्र | १०० |
| ०४ | प्रकल्प | ५० |
| ०५ | सूक्ष्म अध्यापन | ५० |
| ०६ | वर्गकाम | १०० |
| | एकूण गुण ... | ४०० |

**DIRECTORATE OF ART, MAHARASHTRA STATE, MUMBAI**

## ART TEACHERS DIPLOMA (FIRST YEAR)

HIGHER ART EXAMINATION- 20....

**EXTERNAL (VIVA / ORAL) MARKS SHEET**

**CENTRE NO.:** .................................... **CENTRE NAME :**..........................................................................................

| Sr. No. | Exam. Roll No. | Name of Students | Work Experience A Clay | Work Experience B Craft | Language Teaching Methodology | Project | Micro Teaching | Class Work | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Maximum Marks ..... | 50 | 50 | 100 | 50 | 50 | 100 | |
| 01 | | | | | | | | | |
| 02 | | | | | | | | | |
| 03 | | | | | | | | | |
| 04 | | | | | | | | | |
| 05 | | | | | | | | | |
| 06 | | | | | | | | | |
| 07 | | | | | | | | | |
| 08 | | | | | | | | | |
| 09 | | | | | | | | | |
| 10 | | | | | | | | | |
| 11 | | | | | | | | | |
| 12 | | | | | | | | | |

Examinar                                                                 Moderator

# शासकीय उच्चकला परीक्षेकरीता विषयनिहाय गुणदान योजना (द्वितीय वर्ष)

**परीक्षेकरीता विषयनिहाय गुण विभागणी**

| अ. क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| ०१ | स्मरणचित्र/कल्पनाचित्र | ५० |
| ०२ | व्यक्तीशीर्ष | ५० |
| ०३ | व्यक्तिरेखांकन | ५० |
| ०४ | संकल्पचित्र | १०० |
| ०५ | स्थिरचित्र | १०० |
| ०६ | पाश्चिमात्य इतिहास (कला व संस्कृती) | १०० |
| ०७ | शैक्षणिक मानसशास्त्र व शिक्षणशास्त्र | १०० |
| | एकूण गुण ... | ५५० |

**अंतर्गत विषयांकरीता गुण विभागणी**

| अ. क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| ०१ | कार्यानुभव अ) माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान | ५० |
| ०२ | ब) सहा घटकांपैकी कोणताही एक ... | ५० |
| ०३ | शालेयशिक्षण, कलाशिक्षण व मूल्यमापन | १०० |
| ०४ | कलाभिव्यक्ती मौखिक परीक्षा | ५० |
| ०५ | प्रकल्प | ५० |
| ०६ | सरावपाठ | ५० |
| ०७ | वर्गकाम | १०० |
| | एकूण गुण ... | ४५० |

**DIRECTORATE OF ART, MAHARASHTRA STATE, MUMBAI**

## ART TEACHERS DIPLOMA (SECOND YEAR)

HIGHER ART EXAMINATION- 20....

**EXTERNAL (VIVA / ORAL) MARKS SHEET**

**CENTRE NO.: ................................... CENTRE NAME :..........................................................................**

| Sr. No. | Exam. Roll No. | Name of Students | Work Experience | | School Edu. Art Education and Valuation | Project | Practice Lesson | Viva/ Oral | Class Work | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | A ICT | B Any One | | | | | | |
| | | Maximum Marks ..... | 50 | 50 | 100 | 50 | 50 | 50 | 100 | |
| 01 | | | | | | | | | | |
| 02 | | | | | | | | | | |
| 03 | | | | | | | | | | |
| 04 | | | | | | | | | | |
| 05 | | | | | | | | | | |
| 06 | | | | | | | | | | |
| 07 | | | | | | | | | | |
| 08 | | | | | | | | | | |
| 09 | | | | | | | | | | |
| 10 | | | | | | | | | | |
| 11 | | | | | | | | | | |
| 12 | | | | | | | | | | |

Examinar

Moderator

## संक्षिप्त शब्द सूची

| | | |
|---|---|---|
| ATD | - | Art Teachers Diploma<br>कलाशिक्षक पदविका |
| CCE | - | Continious Comprehensive Evaluation<br>सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन |
| D. El. Ed. | - | Diploma in Elementary Education<br>प्राथमिक शिक्षण पदविका |
| ICT | - | Information & Communication Technology<br>माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान |
| MSCERT | - | Maharashtra State Council of Educational Research and Training<br>महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (पुणे) |
| NCERT | - | National Council of Educational Research and Training<br>राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (नवी दिल्ली) |
| NEP | - | National Education Policy<br>राष्ट्रीय शिक्षण धोरण |
| NCF | - | National Curriculum Framework<br>राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा |
| NCFTE | - | National Curriculum Framework for Teachers Education<br>शिक्षक शिक्षणाचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (२००९) |
| NCTE | - | National Council for Teacher Education<br>राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद |
| RTE Act | - | Right of Children to Free and Compulsory Education Act.- 2009<br>बालकाच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ |
| SCF | - | State Curriculum Framework<br>राज्य अभ्यासक्रम आराखडा |
| PPT | - | Power Point Presentation<br>ऊर्जा केन्द्रित सादरीकरण |
| OHP | - | Over Head Projector<br>उर्ध्वशीर्ष प्रक्षेपक |